

दिवाळी
विशेषांक
२०१४



# नवा वास्तुविचार

-: संपादक :-

## डॉ. विलास पवार


प्रकाशन : आम पाब्लकेशन

ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा ठाणे. फोन. - ०२२-२५३६४१४१ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

E-mail - info@ompublication.com • Website - www.ompublication.com

# अनुक्रमणिका


संपादकीय ३

**लेख**

१. ... आणि वास्तू 'तथास्तु' म्हणाली ! - सुनंदा यशवंत शिंदे ५

२. कावळा - सरोज आपटे ९

३. सुंदर माझं घर - सुनीता सुरेश देहेरकर ११

४. अजब गजब सोसायटी - राजश्री रामचंद्र खरे १९

५. शेजारी - सरोज आपटे २१

६. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड - विनोद अच्युत बांदोडकर २५

७. घराला घरपण देणारी माणसे - चारुलता कुळकर्णी २९

८. वास्तुशास्त्राचे गूढ - राजेश पाटील ३३

९. वास्तू सुखाचे द्वार - ओमनी फीचर्स ३७

१०. वास्तुशास्त्र म्हणजे काय ? - मुकेश भानूशाली ४१

**कथा**

१. मुकी घरं - भाग्यश्री ऐगळीकर ५१

२. विमानाला जलसमाधी - नि. श. गुळवणी ५९

३. थप्पड - गोपाळ गोरवाडकर ७९

४. उडून जा पाखरा ! - भाग्यश्री ऐगळीकर ८७

**काव्यसृष्टी** ९३

**पाककृती** १०१

# संपादकीय !

## नात्यांच्या समृध्दीने घरे सजतात...

आधुनिक जगाच्या वेगवेगळ्या स्तरावर अनेक प्रकारे प्रगती होत आहे. नवनवीन वाहने, नवनवीन साधने, उपभोग्य अनेक गोष्टींची मांदियाळी आपल्या भोवती आहे. याचबरोबर आपले स्वत:चं घर असावे आणि सर्व सुखसुविधांनी युक्त असावे असे सर्वांना वाटते आहे आणि हे वाटणे प्रत्यक्षातसुध्दा उतरते आहे.

नवनवीन कल्पनांनी युक्त अशी रचना श्रीमंत इमारती, वास्तू आपल्याकडे उभारल्या जात आहेत आणि या वास्तूंमधील आंतर सजावट (इंटेरियर) अगदी लोभस अशी केले जाते. स्वर्गाची कल्पना या सर्व वास्तू बघितल्या तर निश्चित येऊ शकेल असे वाटते. परंतु या सर्व मोठ्या वास्तू सजावटीयुक्त याचाच अर्थ फक्त ज्यांच्याकडे 'आहे' त्याच्यासाठीच आहेत. जे 'नाही' या गटात मोडतात त्यांचे याच्या विपरीत आहे. गलिच्छ वातावरणात जेथे छप्पर आहे तेथे घर बांधणाऱ्यांना कुठे आलय वास्तुशास्त्राचे नियम, आणि आधुनिक कलाकुसर ती फक्त निवाऱ्याची गरज भागविण्यासाठी केलेली ओढाताण आहे.

असं जरी असले तरी प्रत्येक माणसाचे मग तो श्रीमंत असो वा गरीब त्यांचे त्यांच्या वास्तूवर, त्यांच्या घरावर प्रेम असतेच आणि हे प्रेम त्या घरांच्या भिंतीवर नसते तर त्या घरात जिव्हाळ्याची माणसे असतात, त्यांच्या प्रेमाने पावन झालेली ती वास्तू असते म्हणून असते. प्रत्येक घरात आठवणी म्हणजेच खजिना असतो मग वास्तू श्रीमंतीचे दर्शन घडविणारे असो वा श्रीमंतीची लवलेश नसलेली असो. याचाच अर्थ पुन्हा तोच प्रत्येक निवारा हा घर असू शकत नाही. एखाद्या वास्तूला 'घरपण' मिळते त्या जिवाभावाच्या माणसांचे अस्तित्व त्या निवाऱ्यात वास्तूत निर्माण झाल्यावरचं आणि त्यामुळेच वास्तुविचार हा खऱ्या अर्थाने जिव्हाळ्याच्या माणसांच्या वास्तव्यानेच पूर्ण होणारा आहे. अनेक नात्यांच्या एकत्रित असण्यामुळे घराचं घरपण स्वर्गाच्या श्रीमंतीला सहज लाजवू शकेल. परंतु धकाधकीच्या जगात 'मी', 'माझे' आणि 'माझेच' या संज्ञेत आपण घर नावाची 'खुराडी' निर्माण करत आहोत आणि त्यात सजावट करीत आहोत. हे चित्र खरं तर बदलायची गरज आहे. कदाचित ते बदलायला सुरुवात झाली आहे. आता अनेकांना आपली माणसे काहीतरी 'साजरे' करण्यासाठीच हवीहवीशी वाटू लागली आहेत..... आणि ही सुरुवात आश्वासक आहे उद्या नात्यांनी समृध्द झालेली, सजवलेली घरे आपल्याला पाहायला मिळतील असा आशावाद दिवाळीत प्रकट करायला काही हरकत नाही. मगच नवा वास्तुविचार खऱ्या अर्थाने सर्वांपर्यंत पोहचू शकेल.

**दिवाळीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!**




V.I.P
happy journey

# ... आणि वास्तू 'तथास्तु' म्हणाली!

**सुनंदा यशवंत शिंदे**



अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा. त्या असल्या की खरे तर आणखी काय हवे ? सुखी जीवनाची हीच तर खरी ओळख.

मनुष्य प्राण्याला सतत आणखी काहीतरी, आणखी काहीतरी करत राहणे आवडते. ते खरे तर त्याच्या प्रगतीचे लक्षण होय. सतत काहीतरी मिळविण्याच्या इच्छेने तो झपाटलेला असतो. स्वत:साठी, कुटुंबासाठी समाजासाठी सतत प्रयत्न करणे, करत राहणे, त्याचा ध्यास घेणे यातून माणूस आतापर्यंतची अकल्पित प्रगती करू शकला. यात प्रत्येकाची आवड व कुवत वेगवेगळी असते एवढेच.

आम्ही शुभमंगल घेऊन गृहस्थाश्रमी झालो तेव्हा खऱ्या अर्थाने या सर्व गोष्टींची, स्वतंत्रपणे व जाणीवपूर्वक सुरूवात झाली. आतापर्यंत आई-वडिलांच्या छत्रछायेत सुरक्षित असल्याने इतर कोणती चिंता नव्हती. स्वकर्तृत्वाला सुरुवात करताना नोकरी असल्याने अन्न व वस्त्र होतं, पण गरज होती ती निवाऱ्याची. सुरुवात करताना अनेक अडचणी आल्या. चाळीतली एक खोली घेऊ शकत होतो. मनात आलं चाळीतली एक खोली असली तरी ती स्वत:ची असणार आहे. खूप प्रयत्नांनी ती जागा मिळविली. म्हटलं, जमेल तसे बघू नंतर ब्लॉक.

चाळीतल्या एका खोलीत खरंच सांगते, आनंदाने संसार सुरू झाला. अगदी सुखात, आनंदात नवीन सुखी संसाराचे स्वप्न. जिथल्या तिचं निटनेटकेपणा. ब्लॉकसाठी पैसे साठविणे चालू होते. त्यासाठी इतर सर्व हौस-मौज मर्यादित, अनाठायी खर्च अजिबात नको. खरेतर नवीन लग्न, नवीन संसार पण मोठ्या व स्वत:च्या मालकीच्या घराच्या स्वप्नासाठी

आमच्या अनेक गोष्टींवर आम्ही स्वखुशीने मर्यादित बंधने घातली होती. चाळीतल्या घरानेही आम्हाला आनंद दिला व प्रगतीसाठी प्रोत्साहन दिले. घरसुध्दा आमच्यासारखेच आनंदी होते. काहीतरी चांगलं करणाऱ्याला 'तथास्तु' म्हणणारं होतं.

तीनच वर्षांत आमची इच्छा पूर्ण झाली.साठविलेले पैसे आणि बँकेचे कर्ज छान योग जुळून आला. स्वत:चा ब्लॉक कुठलीही अडचण न येता व्यवहार पूर्ण झाला. संसार ही वाढला. कर्ज व वाढता संसार ! काटकसर सुरूच. इथेही स्वकर्तृत्वाचा आनंद व अभिमान होताच. पण......एक गोष्ट का कोण जाणे सतत मनात होती की, चवथ्या माळ्यावरचं घर आहे. आपण बदलू नंतर. या एका विचाराने गरजेचे व अत्यावश्यक तेवढेच सामान होते. उगीचच जास्त पैसे कशाला खर्च करा ? आपल्याला घर बदलायचे आहे हा विचार सतत मनात असायचा.

या घरानेही आमची खूप प्रगती घडवून आणली. मुलं लहानाची मोठी झाली. त्यांना चांगले शिक्षण मिळाले. आम्हा दोघांची नोकरीसुध्दा चांगली झाली. एकेक पद वर चढत आम्ही आनंदी व खूश होतो. वास्तू ही आनंदी, शांत होती. मनाने पुन्हा नवीन दुसऱ्या घराचा विचार करायला सुरुवात केली. पण तो कधीच पुढे जात नव्हता. प्रत्येकवेळी बजेटपेक्षा जास्त किंमत असायची. नवीन चांगल्या घराचा योग येणे ही इच्छा कमी होत चालली.

आणि.......ठरवलं की, याच घरातच आता आपल्याला राहायचं आहे. नव्या उमेदीने घराचे नूतनीकरण करून घ्यायचे ठरले. नवीन सोयीने युक्त स्वयंपाकघर, टॉयलेट-बाथरूममध्ये चांगल्या टाइल्स पूर्ण लावून घेतल्या. खिडक्या मोठ्या हवेशीर बॉक्सटाइप केल्या. चांगली रंगसंगती झाली. मुख्य दरवाजा आकर्षक वाटावा असा प्रयत्न केला. अशाप्रकारे पहिल्यांदाच



मनासारखे घर सजवले. घरात शांतता, समाधान होतेच, पण आता छान प्रसन्न वाटायला लागले. माणसाला स्वत: केलेल्या कामाचे खूप कौतुक असते. त्यामुळे मुळात आवडत असेललं घर आणखी मनापासून आवडायला लागले.

या आनंदात तीन-चार वर्षे गेली. मुलांच्या लग्नाच्या निमित्ताने पुन्हा घराचा विषय निघाला. घराच्या किमती आवाक्याबाहेरच्याच होत्या. तरीसुध्दा असा विचार केला. हे घर ठेवून दुसरे वन रूम , वन रूम

किचन असे घर मिळाले तरी चालेल. तेवढीच सोय तरी होईल. शोध सुरू झाला. पण घर घेणं कठीणचं होतं. आर्थिक नियोजन जमत नव्हते. नेमके अशावेळी मिस्टरांच्या मित्राचा निरोप झाला. अमूक –अमूक ठिकाणी मोठं कॉम्प्लेक्स आहे. मी तिथे ब्लॉक घेतला आहे तर तू हीती जागा बघ.

बघायला काय हरकत आहे म्हणून 'ही' जागा आम्ही पाहिली आणि पाहताक्षणी प्रचंड आवडली. बघता बघता अपेक्षेपेक्षा मोठा हवेशीर, सगळ्या सुखसोईनी युक्त, सर्वांना स्वतंत्र स्पेस देणारा ब्लॉक व त्याचा व्यवहार उत्तमरीत्या पटकन जमून आला.

पहिल्या जागेबद्दल प्रेम ठेवून प्रगतीचा मार्ग अनुसरला व तो पूर्ण झाला. दुसऱ्या वास्तूबद्दल प्रेम होतेच पण आपुलकी, आपलेपणा कुठेतरी कमी पडत होता. आणि म्हणूनच अडथळे येत राहिले. काम तडीस जात नव्हते. शेवटी आपुलीने, प्रेम जपण्याचा प्रयत्न केला तेव्हा मात्र 'वास्तू तथास्तु' म्हणाली. याचा मी प्रत्यक्ष अनुभव घेतला. याचे मला खरेच समाधान आहे. 'वास्तूचे' जीवनातील स्थान किती महत्त्वाचे असते याचा प्रत्यक्ष अनुभव आला. म्हणूनच म्हणावेसे वाटते. 'वास्तू विचार' खरेच विचार करायला लावणारे वास्तुशास्त्र आहे. त्याचा सर्वंकष विचार सर्वांनी करायलाच पाहिजे.

◆◆◆




With Best Compliments From

# Asphalt India
## CORPORATION


**Mumbai Infracture Developers**

**Ph : 0222-6206808**

**Email :asphaltindia@hotmail.com**

# कावळा

सरोज आपटे



कावळा हा एक पक्षी आहे. तो अतिशय हुशार व चतुर पक्षी आहे. पहाटेचे ३-४ वाजले की तो कावकाव ओरडून सर्व सकल जनांना सांगतो की आता साखरझोपेतून हळूहळू जागे व्हा.

संत ज्ञानेश्वरांनी त्यांच्या ज्ञानेश्वरीत त्याच्याबद्दल ओवी लिहून कावळा किती चांगला आहे हे सकल जनांना सांगितले आहे. ती ओवी अशी आहे.

पैल तो गे काऊ कोकताहे
सकुन गे माये सांगताहे
उड उड रे काऊ, तुझे सोन्याने मढविन पाऊ
ही भाताची उंडी लावीन तुझे तोंडी

त्याचप्रमाणे गजानन महाराजांच्या गजानन विजय या पोथीत कावळ्याचे वर्णन फार सुरेख केले आहे.

त्यांचा शिष्य वैकुंठी गेला साचार. हा पितृलोकांवर मुळी न राहिला. दहा दिवसापर्यंत प्राण अंतरिक्षात राहे परिभ्रमण करीत सपिंडी होता जाय पुढे. त्या अकराच्या दिवशी बळी देती. काक जेव्हा स्पर्शेल त्यासी तेव्हाच प्राण जाते पुढे. जयाला न ऐशी गती त्याच्यासाठी पिंड देती कावळ्याची वाट पाहती पिंड ठेवून क्लेशावर म्हणून आपण दहाव्या दिवशी पिंडदान करून कावळ्याने मधल्या पिंडाला काकस्पर्श केला की आपण म्हणतो की मेलेल्या माणसाची काही इच्छा न राहता त्याचा आत्मा अंतराळात विलीन होऊन वैकुंठाला गेला.

आपल्या समाजात आणखी एक अतिशय चांगली प्रथा आहे की आपल्या घरात कार्य असो वा दु:खाचा प्रसंग असो, आपण जेवायला बसायच्या आधी जसा गोग्रास बाजूला ठेवतो तसा काकवळी देण्याची प्रथा आहे. याचे कारण आपण सर्व प्राणिमात्रांना अन्न देऊन त्यांचा आत्मा तृप्त करतो. त्यात कावळ्याचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे.


घराच्या खिडकीवर बसून अगर खेड्यातील घरे मोठी असल्यामुळे तो अंगणात बसून कावळा कावकाव करून ओरडू लागला तर घरांतील सासुरवाशीण बाहेर येऊन त्यास म्हणतात की काय रे काव काव करून ओरडतोस, माझा भाऊराया येणार आहे का ? मी त्याची वाट पाहत आहे व माहेरवाशिणी आल्या तर त्या म्हणतात की माझे पतीराज येणार आहेत का, मी त्यांची वाट पाहत आहे. ते मला आपल्या

घरी न्यायला येणार आहेत.

लहान मुलांना पण कावळा आवडतो बरं का. लहान मूल नीट जेवत नसेल तर आपण काऊचिऊची गोष्ट सांगतो. एक घास काऊचा, एक घास चिऊचा अशी गोष्ट सांगून ते मूल जेवू लागते. त्याचप्रमाणे काऊचं घर शेणाचं, चिऊचं घर मेणाचं अशी गोष्ट सांगतो. मूल जरा मोठ झालं की, आपण कावळ्याची आणखी एक गोष्ट सांगतो. कावळ्याला लागली तहान. त्यास एका मडक्यात थोडं पाणी दिसत होते पण ते कसे प्यावे, याचा विचार करत तो युक्ती लढवून कावळा मडक्यात एकेक एक दगड टाकू लागतो तसे पाणी वर येते व तो ते पाणी पितो असा आहे चतुर कावळा.

कावळा चोरी करण्यात प्रसिध्द आहे. चोर जसे कोणाचे लक्ष नाही असे पाहून दागिने, पैसे वगैरे चोरतात त्याप्रमाणे कावळा टेहळणी करून चोरी करण्याचा प्रयत्न करतो. त्याला कितीही हाकलला तरी तो उडून न जाता कशाची चोरी करावी याचा विचार करतो. त्यास चोरी करण्यास काहीही चालते. चमचा चालतो, कपडयांना घालायाचा हँगर चालतो. वेळप्रसंगी तो दागिनेसुध्दा चोरतो. असा आहे कावळा लबाड नटखट.

कावळा हा कुशल डॉक्टर व सर्जन आहे असे आपणास म्हणावे लागेल. सर्जन लोक जसे कुशलतेने ऑपरेशन करतात त्याप्रमाणे कावळा उंदराला पकडून आणतो. आपले भक्ष्य कोणी पळवीत नाही ना याकडे त्याचे बारीक लक्ष असते. त्याला सर्वात जास्त भीती



घारीची असते. ती आपल्या भक्ष्यावर झडप घालून पकडून नेऊ नये म्हणून त्याची नजर सर्वबाजूंनी भिरभिरत असते व त्याची पक्की खात्री झाली की घार आता येत नाही तेव्हा तो एखाद्या सर्जनप्रमाणे आपल्या चोचीने आपल्या भक्ष्याचा प्रत्येक अवयव कुशलतेने फाडून त्याला मारून टाकून मगच त्याला खाऊन टाकतो पण आपले डॉक्टर पेशंटचे प्राण वाचवतात तर हा डॉक्टर कावळा त्याच्या पेशंटला म्हणजे उंदराला मारून खाऊन टाकतो. कारण तो सकाळपासून उपाशी असतो.

असा हा कावळा पक्षी, त्यास काय म्हणावे ते मला अजूनपर्यंत समजून आले नाही तरी पण मी त्याला चतुर हुशार पक्षी आहे असेच समजेन.

कावळ्याला आपण कितीही शिव्या दिल्या तरी तो सकलजनांचा मित्र आहे असे समजावे.

◆◆◆

# सुंदर माझं घर

सुनीता सुरेश देहेरकर



प्रत्येकालाच आपलं घर सुंदर वाटत असते त्याला मीही अपवाद नाही. घर म्हणजे नुसत्या चार भिंती नव्हेत. घराला घरपण येते ते तिथे राहणाऱ्या माणसांमुळे व शहाणपण येते ते वडीलधाऱ्या व थोरामोठ्यांमुळे. घरात राहणाऱ्या माणसांना एकमेकांविषयी वाटणारे प्रेम, आपुलकी, जिव्हाळा यामुळे घर टिकून राहते. त्या घरात जर भानगडी, कटकटी असतील, भांडण–तंटा असेल, हेवे–दावे असतील तर घर दुभंगायला वेळ लागत नाही. घरातल्या साऱ्यांना एकमेकांचा विश्वास वाटला पाहिजे, आधार वाटला पाहिजे. सुखदु:खातही घरातल्या मंडळींनी एकोप्याने व एकजुटीने राहायला पाहिजे. संकटाशी सामना करायला पाहिजे तर रे घर सुंदर घर म्हणता येईल. या उलट जर घरात वातावरण असेल तर ते घर, घर न वाटता लॉजिंग–बोर्डींग वाटेल. घरचे मंदिर बनवायचे की कोंडवाडा याचा निर्णय घरात राहणाऱ्या साऱ्यांनी घ्यायला पाहिजे. बाहेरच्यांनी नव्हे! सुदैवाने माझे घर खरंच एक मंदिर होते व आजही आहे. याला कारण लहानपणापासूनच आई–वडिलांनी आमच्यावर केलेले संस्कार!


माझा जन्म पूर्वीच्या कुलाबा व आताच्या रायगड जिल्ह्यातला. माझे गाव जासई. हे रायगड जिल्ह्यातल्या पनवेल व उरण या दोन शहरांच्या बरोबर मध्यभागी आहे. पनवेल व उरण आम्हा जासईवासीयांना खूप जवळ आहे. एस.टी.ने फार फार तर अर्धातास लागतो त्यामुळे शिक्षण घ्यायला कधी अडचण भासली नाही.

आमच्या गावाला निसर्गाचे वरदान लाभले आहे. गावाजवळ खाडी आहे. डोंगर–दऱ्या आहेत आणि मुख्य म्हणजे शानदार तळे आहे. या तळ्यातच आम्ही भावंडे पोहणे शिकलो. आमच्या घरापासून तळे १० मिनिटांच्या अंतरावर आहे. या तळ्यात उगवणाऱ्या

कमळांना पाहून मला माझी प्रतिभा कळली व मी ७ वीत असताना माझी पहिली कविता लिहिली. ती खालीलप्रमाणे:-

**कमळ**

चिखलातून उगवते जरी कमळ
देवादिकांना प्रिय आहे कमळ
देवी-देवतांचे आसन आहे कमळ
साऱ्यांच्या पूजेमध्ये असते कमळ
कमळ देवाच्या हातात आहे
कमळ देवाच्या नाभीत आहे
देवीचे नाव कमला आहे
स्वत: देवही कमलाकर आहे.



कमळावर केलेली ही छोटीसी कविता मी जेव्हा आईला ऐकवली तेव्हा तिला खूप आनंद झाला. ती मला म्हणाली, ''लता, (माझे माहेरचे नाव) तू कविता करत जा. तुझ्याजवळ काव्यप्रतिभा आहे. त्याचा तू उपयोग कर. तू जर कविता केल्यास तर मी तुला एका कवितेला एक रुपया देत जाईन. उत्तेजन म्हणून.'' आमची आई नेहमीच आमच्या कलागुणांना उत्तेजन द्यायची. आई स्वत: प्राथमिक शाळेत शिक्षिका होती व ती स्वत: चांगल्या कविता करायची. तिच्यातला तो गुण माझ्यातही उतरला आहे.

सुरुवातीला आमचे घर बैठे होते. आता जुन्या घरावर एक मजला चढल्याने (बांधल्याने) ते उभे राहिले आहे असे म्हणायला हरकत नाही. पूर्वी घरासमोर अंगण होते. मागे परस. त्यावेळी अण्णा (माझे वडील) ओटीवर बसून सोनारकाम करायचे. गिऱ्हाईकांची वर्दळ असायची. ओटी ऐसपैस व लांबरुंद होती. ओटीवरच पण एक बाजूला झोपाळा टांगला होता. त्यावर बसून आम्ही भावंडे झोके घ्यायचो. खूप मजा यायची. ओटीच्या शेवटच्या टोकाला पाहुण्यांकरता एक खोली काढली होती. माजघरात देखील एक खोली बाळंतीण बाईसाठी राखीव ठेवलेली होती. त्या खोलीत मात्र अंधार असायचा. एक छोटीशी खिडकी हवा आत येण्यासाठी होती तेवढीच. पुढे मोठी झाल्यावर कळले की, बाळंतिणीच्या खोलीत त्यावेळी जाणीवपूर्वक अंधार करत असत. खऱ्या अर्थाने त्यावेळी ती मनात म्हणत असेल की, 'अंधार माझा सोबती' म्हणून आता मात्र जुन्या संकल्पना मागे पडून भरपूर उजेड व प्रकाश ठेवला जाते. 'कालय तस्मै नम:' म्हणतात ते काही खोटे नाही. आमचे बैठे घर एवढे प्रशस्त व लांबरुंद होते की, जागेची कमतरता भासू नये. मला तर ते एखाद्या जाडजूड व फतकल घालून बसलेल्या बाईसारखे वाटायचे. घरातली मुले अंगणात खेळत तर मुली परसदारी. आमचे घर वडलोपार्जित नव्हते. वडलोपार्जित घरावर हक्क सांगणारे बरेचजण असल्याने अण्णांनी त्यावेळी स्वत:च्या पैशांनी जागा विकत घेऊन ते

प्रशस्त व ऐसपैस घर बांधले होते. आमच्या कुंटुंबात ४ मुलगे व ५ मुली आणि आई-वडील मिळून ११ जण होते. त्यामुळे आम्हाला प्रशस्त, लांबरूंद घराची आवश्यकता होतीच. अण्णा सोनारकाम करत पण त्यांनी आपली सचोटी कधी सोडली नाही आणि म्हणून गावात इतर सोनार असताना आमच्या दुकानात गर्दी व्हायची. अण्णा साधे-भोळे, देवावर प्रचंड श्रध्दा असणारे ,देवपूजा व भजन-कीर्तन यात रमणारे होते. गावात त्यांना खूप मान होता व सर्वजण त्यांना 'देवमाणूस' म्हणत. मला वाटते सोनाराला देवमाणूस म्हणणाऱ्याला कुणीही वेड्यात काढेल पण आमचे अण्णा याला अपवाद होते आणि म्हणून आम्हा सर्व भावंडांना व आईला त्यांचा खूप अभिमान वाटायचा. अण्णांनी सोनारकामाबरोबरच शेतीपण केली. आमची बरेच ठिकाणी शेती होती व आम्ही भावंडे पावसाळ्यात भाताची रोपे लावायला अण्णांबरोबर जात असू. आमची आई शिक्षिका होती तरी देखील ती अण्णांबरोबर शेतात उतरायची व अण्णांना मदत करायची.

आमच्या परसदारी काय नव्हते, फुलझाडे होती. फळझाडे होती. गुलमोहराचे झाड होते. त्याची रंगीत फुले खाली पडत तेव्हा जमिनीवर लाल फुलांचा खच पडायचा. एक गुलमोहर लाल होता तर दुसरा पिवळा. एक नारळाचे (माड) उंच झाड होते. ते पहिल्यावर उंच माणसाला ताड-माड उंच असे का म्हणतात ते कळून यायचे. आंब्याचे झाड, शेवगा, फणस अशी इतरही झाडे होती. एक पेरूचे व जांभळाचे अशी आणखी झाडे होती. शेवग्याच्या शेंगा तर एवढ्या येत की शेजाऱ्या-पाजाऱ्यांना आम्ही फुकट वाटत असू. तेव्हा शेजारी एकमेकांच्या सहाय्याला धावून जात. आता ते शेजारी गेले आणि दिवसही.

फुलझाडांमध्ये पारिजात, जास्वंद, गुलाब, मोगरा, चाफा अशी फुलझाडे होती. त्यामुळे परसात फिरायला मजा येई. आमच्याकडे सर्व तऱ्हेचे गुलाब होते. लाल-पिवळा, सफेद वगैरे वगैरे. मी लावलेल्या गुलाबांच्या झाडावर जेव्हा गुलाब फुलले तेव्हा मला खूप आनंद झाला व माझ्यातली कवयित्री जागी झाली व मला एक कविता स्फुरली. ती अशी:

**गुलाब**

लाल, पिवळ्या गुलाबाचे सुंदर फूल
पाहूनी साऱ्यांना पडते भूल
त्याचे विविध रंग पाहून
मन जाते आपले मोहरून

देवाचे हास्य मला गुलाबात दिसते
मरगळलेल्या माझ्या मनाला उभारी देते
सुखाबरोबर दु:खही असते
गुलाबाच्या काट्यावरून ते कळते



आईकडून मला लगेचच दुसरा रुपया मिळाला व पाठीवर शाब्बासकीची थाप. परसदारी खेळणे, झाडांखाली बसून पुस्तक वाचणे मला खूप आवडायचे. आई म्हणायची, माझी लता फुलवेडी आहे. होय, मी फुलवेडी च होते. आईला मी एक दिवस म्हटले, ''आई मी फुलवेडी आहे कारण माझे नाव लता आहे. लता म्हणजे वेल आणि वेलीवर फुले यायचीच. ती न आवडून कसे चालेल.''आई हसली व म्हणाली, ''शहाणं माझं बाळ!''मी लगेच आईच्या कुशीत शिरले.

परस म्हणजे माझे उठण्याचे, बसण्याचे, खेळण्याचे आवडते ठिकाण होते. तिथल्या झाडांशी फळा–फुलांशी माझे अतूट नाते होते. आता फ्लॅट संस्कृती आली आहे. अंगण, ओटी, पडवी, परस या गोष्टी आता कालबाह्य झाल्यात. मला मात्र आमचे जुने घरच आवडते. ज्या घराला अंगण नाही, ओटी नाही, ओटीवर झोके घ्यायला झोपाळा नाही, त्याला काय घर म्हणायचे. तसेच ज्या घराला परसदार नाही, बाग नाही, तुळशी वृंदावन नाही, गुरा–ढोरांचा गोठा नाही, घराच्या मागील भागात फळझाडे व फुलझाडे नाहीत त्या घरला 'सुंदर माझ घरं' म्हणता येईल का? घर म्हणजे ओटी, माजघर, देवघर, स्वयंपाकघर पाहुण्यांची खोली, बाळंतिणीची खोली, धान्याची कोठी. एवढे असून चालत नाही तर घराला लागून परस हवा. हल्लीच्या मुला–मुलींना परस म्हणजे काय ते कळत नाही. माहीतही नाही. माहीत असण्याचे कारण ही नाही. हल्लीची मुले फ्लॅट संस्कृतीत वाढलेली. त्यांना ओटी, पडवी, अंगण व परस काय कळणार? मग मीच माझ्या मुलांना सांगितले की, ''हे बघा बाळानो, परस म्हणजे घराच्या मागे असलेली जागा. या जागेत भाजी लावतात. झाडे लावतात, फुलबाग करतात. शिवाय अगोदरच तिथे असलेली फळझाडे व फुलझाडे यांचीही घरासारखीच गरज असते. शुध्द हवा, फळे, फुले आपल्याला मिळतात व ताजा – ताजा भाजीपाला परसात असलेल्या व लावलेल्या भाज्यांमुळेच मिळतो. परसदाराला (Back Door) परसदार म्हणण्याचे आणखी एक कारण आहे ते म्हणजे प्रात:विधीसाठी स्त्रिया परसात जात असत. परसात स्त्री–पुरुषांसाठी शौचालय बाकी बांधले जाते व त्याचा उपयोग घरातील सर्वांना करता येतो. कळलं!'' एवढे विस्तारपूर्वक सांगितल्यावर मुलांचे समाधान झाले.

प्रत्येक फुलझाडाशी कळत – नकळत नाते निर्माण होते आणि मग उरतात त्या आठवणी. मी लावलेला मोगरा जेव्हा फुलला तेव्हा मला खूप आनंद झाला. मी मोगऱ्याची वेणी करून केसात माळली. त्यावेळी मी एक चारोळी लिहिली ती अशी :

**मोगरा**

मोगरा फुलला
त्याचा सुगंध दरवळला
सुंदर बालेच्या वेणीत तो शोभला
अत्तरात जाऊन लपला

मोगऱ्याचे अत्तर करतात हे मला माहीत होते. पारिजाताच्या फुलांचाही सडा पडायचा. त्या फुलांचे देठ पोवळ्यासारखे वाटायचे. मी अण्णांना मग देवपूजेसाठी सुंदर सुंदर हार करून द्यायचे. आमचे

देवघरही खूप मोठे होते. उदबत्त्याचा धूर, कापराने केलेली आरती व अण्णांची प्रसन्न मूर्ती आजही माझ्या नजरे समोरून जात नाही. देवांच्या मूर्तीवरील भाव व देवघरातले मंगलमय वातावरण यामुळे माझ्या मनाला उदात्त भावना निर्माण होऊन आपोआप हात जोडले जायचे. देवघरात अपवित्रेला थारा नव्हता. सारे वातातरण पवित्र असायचे. संध्याकाळी आम्ही सर्व भावंडे देवघरात बसून प्रार्थना व शुभंकरोति म्हणायचे. अण्णा प्रार्थना सांगत. त्यांच्या गोड आवाजात प्रार्थना ऐकणे मला खूप आवडायचे. हल्लीची मुले मात्र देवघरात न बसता टी.व्ही. समोर बसतात. संध्याकाळची प्रार्थना आता जवळ जवळ बंदच पडली आहे. याला जबाबदार आम्ही देखील आहोत.




आमच्या गोठ्यात एक गाय, एक म्हैस व दोन बैल होते. गायीचे नाव तांबू होते. कारण तिचा रंग तांबूस होता. बैलांना अण्णांनी हिरा आणि मोती अशी नावे दिली होती. खूप छान खिलारी जोडी होती. बैलगाडीला जुंपले की सुसाट पळत. मला मात्र भीती वाटायची व मी अण्णांना म्हणायची, ''अण्णा, हे तर पंजाबमेलसारखे जोरांनी पळतात. यांची भुसावळ पॅसेंजर करा.'' त्या वेळी पंजाबमेल सर्वात फास्ट ट्रेन होती. तर भुसावळ पॅसेंजर सर्वात हळू चालणारी. अण्णां हसत व कासरा ओढून वेग कमी करत. आमच्या म्हशीची शेपटी अर्धी तुटलेली होती म्हणून आम्ही तिला लांडी म्हणायचो. पण ती लांडी म्हैस दूध मात्र भरपूर द्यायची. तिच्याकरता अण्णा भुईमुगाची व खुरासणीची पेंड आणायचे. अण्णांची ती खूप लाडकी होती. एकदा मी शेंगदाण्याची पेंड कशी लागते हे बघण्यासाठी तोंडात पेंडेचा तुकडा टाकला. नेमके त्यावेळी अण्णा तिथे आले व म्हणाले, ''लता, ते म्हशीचे खाणे आहे. माणसाचे नव्हे! टाक ती पेंड नाहीतर उद्यापासून तुलापण गोठ्यात बांधावी लागेल.'' अण्णा हसत-हसत म्हणाले. मला माझ्या मूर्खपणाची लाज वाटली. अशा कितीतरी गमतीजमती घडत असत.

आमच्या घरी गणेश चतुर्थी व दिवाळी हे दोन सण धूमधडाक्यात साजरे करत. आमचे एक काका ठाण्याला राहत तर एक कल्याणला. ते व त्यांची मुले सर्वजण गणपतीच्या सणाला आवर्जून येत. मग पाच दिवस नुसता धांगडधिंगा चालायचा. झिम्मा, फुगडी, पत्ते कुटणे व गाण्याच्या भेंड्या लावणे असले खेळ आम्ही खेळायचो. नुसती धम्माल यायची. असे पाच दिवस चालायचे. गणपती व गौरीचे विसर्जन एकाच दिवशी व्हायचे. महिला मंडळाकडे गौरीची सजावट असे तर पुरुष वर्ग व मुले गणपतीचे मखर

आदल्या दिवशी तयार करत. त्यावेळी झुंबर, हंड्या व इतर कागदी व रंगीत पताका मखराच्या छताला लावल्या जात. मखर करताना साऱ्यांना किती आनंद वाटायचा. तो हल्ली विकत घेणाऱ्या मखरवाल्यांना कसा कळणार ? खाण्यापिण्याची चंगळ असायची. गणपतीकरता विविध प्रकारचे मोदक बनविले जात. खव्याचे मोदक, उकडीचे मोदक आणि इतर पंच पक्वान्न. खूप मजा यायची. दिवाळीत आम्ही अंगणात खूप फटाके फोडायचो. ओटीवर आकाशकंदील लावायचो. माझे भाऊ आकाशकंदील बनवत. आता मिळणाऱ्या विकतच्या आकाशकंदीला पेक्षा त्यावेळी रंगी-बेरंगी कागद घायचे त्याला तोड नाही. पैशांनी वस्तू मिळतात पण आनंद नाही. हेच खरं! अंगणात ओटा करून त्यावर रांगोळी काढण्यात जो आनंद होता त्यालाही आपण मुकलो कारण ओटाच नाही तर रांगोळी कुठली.

दिवस भराभरा जात होते. वडील व आई जिवंत असतानाच आम्हा सर्वांची लग्ने झाली. मोठे दोन भाऊ मुंबईला. एक नवी मुंबईला कामानिमित्त शिष्ट झाला. छोटा भाऊ आई-वडिलांजवळ राहिला. आम्हा सर्व बहिणींना लग्न होऊन सासरी जावे लागले. छोट्या भावाचे लग्न झाल्यावर त्याने जुन्या बैठ्या घराचा आकार न बदलता घरावर एक मजला बांधला व आतून वर जाण्याकरता तसेच बाहेरून दोन जिने काढले. तेवढाच काय तो बदल. नूतनीकरण केलेल्या आमच्या घराला त्याने 'आनंद निवास' असे नाव दिले. आम्हा सर्वानाच ते आवडले.

वडील छोट्या भावाला म्हणाले, ''हे बघ संजय, आपल्या घराचे नाव आनंद भुवन आहे. तेव्हा या घरात नेहमी आनंदच असायला हवा. आपल्या घरात दु:खाला थारा नाही. सारेजण गुण्यागोविंदाने रहा.'' भावांनी वडिलांना तसे वचन दिले व ते वचन आजतागायत पाळत आला आहे. आता आमचे वडील हयात नाहीत पण आमच्या सर्वांचं सुंदर घर मात्र आहे. आजही आम्ही सर्वजण गणपतीच्या सणाला आमच्या गावी जातो तेव्हा भूतकाळ जागा होतो. परवा मी शाळेच्या दाखल्यासाठी आमच्या गावी गेले, सर्वांनी माझे स्वागत केले. मी परसात जाऊन माझ्या आवडत्या गुलमोहराला भेटले. मला खूप आनंद झाला व माझ्याकडून नकळत काव्य लिहिले गेले. कारण तो माझा बालपणापासूनचा मित्र होता.



**गुलमोहर**

गुलमोहराच झाड खरंच खूप आहे वाढलं
आणि आता ते आकाशाकडे आहे झेपावलं
गुलमोहराला पाहून मला खूप बरं वाटलं

फुलांचा सडा पाडून तेही मनापासून  हसलं

मी  पण गेले मग अगदी त्याच्याजवळ
स्पर्श करून म्हणाले, मला ओळखलं
फांद्यांनी पाठीला स्पर्श करून ते 'होय' म्हणाले
माझ्या डोळ्यांत मात्र पाणी तरळलं

लहानपणापासूनच त्याची माझी मैत्री होती
त्याच्या सावलीखाली खेळण्यात गंमत होती
कधी लंगडी तर कधी लगोरी
तर कधी खेळायचो आम्ही चेंडू रबरी

दमून-भागून आम्ही त्याच्याजवळ बसायचो
गुलमोहराच्या सावलीत थकवा विसरायचो
त्याची सुंदर-सुंदर फुले पाहून आनंदी व्हायचो
ओंजळीत फुले घेऊन घरात पळायचो.

ऊन- पावसातही त्याची आम्हाला साथ होती
गुलमोहराला पाहून पळून जायची भीती
सुंदर फुलांचा सडा पाडून तेही हसायचे
वाऱ्याच्या झुळकीने मान डोलवायचे

खरंच वृक्ष असतात माणसाचे खरेखुरे  मित्र
माणसाच्या सेवेकरता उभे असतात अहोरात्र
माणसे मात्र करतात त्यांच्यावरती प्रहार
उपकारकर्त्यालाच ते का बरे करतात ठार ?

आमचे सुंदर घर व माझा आवडता गुलमोहर पाहून मला खूप बरं वाटलं व पुन्हा परत येईन असे छोट्या भावाला सागूंन घर सोडलं.

◆◆◆



*With Best Compliments From*

# G. L. Construction Pvt. Ltd.

**304, Gokul Arcade B Building**
**Subhas Road, Vile Parle, Mumbai -59**
**Ph. 28395099/107**
**Email: gic.pvtltd@hotmail.com**

# अजब गजब सोसायटी

राजश्री रामचंद्र खरे



आमची अजब गजब सोसायटी म्हणजे खरोखरच अजबच आहे. आता नावावरून तुमच्या लक्षात आले असेलच म्हणा. मोजून आठ बिऱ्हाडे असलेली छोटीशी सोसायटी. तिथे राहणारे लोक मात्र नमुनेदार शोधून सापडणार नाहीत. असे इथले एकेक नमुने पाहिले की वाटतं आता जर पु.ल. असते तर त्यांनी नक्कीच व्यक्ती आणि वल्ली भाग दोन काढला असता किंवा आचार्य अत्रे असते, तर म्हणाले असते दहा हजार वर्षांत असे नमुने कोणी पाहिले नसतील. तर आमची ही पात्रे व. पु. काळ्यांनी आपल्या कॅलेंडरवर छान रेखाटली असती.

आता हेच बघा ना, आमच्या शेजारीच राहणाऱ्या आनंदी काकू 'नाव सोनूबाई आणि हाती कथलाचा वाळा' अशी त्यांची गतं नाव आनंदी पण सदा रडका चेहरा पाहिला की वाटते की जणू साऱ्या जगाची चिंता, काळजी यांच्याच डोक्यावर ठेवली आहे. सदा करवादलेल्या अंगांनी सुध्दा अगदी काठी. गालावरची खळी हे खरे म्हणणे सौंदर्याचे लक्षण ते देवाने उदार हस्ते यांना बहाल केलेले. आता हे सौंदर्य लोकांना दिसायला हवे असेल तर कधी हसायला हवे का? यांना कधी हसताच येत नाही. काय सांगू तुम्हाला त्यांच्या या सुंदर खळीचा शोध इतक्या वर्षांनी मला अलीकडेच आला. पहिल्यांदाच त्यांना खळखळून हसताना पाहिले आणि गालावरची ही खळी मला दिसली आणि मनाशीच म्हटले, अरेच्च्या! काकू काय छान दिसतात हसल्या की. एक दिवस न राहवून ती त्यांना म्हटले देखील काकू, तुमच्या गालाला खळी किती छान पडते, तुम्ही हसत का नाही कधी? तेवढाच लांबट रडका चेहरा करून म्हणाल्या, माझं मेलं नशीबच तसलं. हसते कसली? आता आमच्या सोसायटीतील मुले तरी कमी इरसाल आहेत का? प्रत्येकाला काहीना काही नावे ठेवली आहेत त्यांच्या स्वभावामुळे. मुले त्यांना जळाऊ लाकूडच म्हणतात. मुलांवर तर त्या कायम करवादत असतात. मुले बाहेर खेळत असली

आणि त्या येताना दिसल्या की मुले हळूच एकमेकांच्या कानात कुजबुजतात, अरे सांभाळा, जळाऊ लाकूड येतंय. कोणीही काहीही केले तरी यांची तक्रार. कोणी सोसायटीतल्या बाकावर बसले. कोणी गच्चीत गेले, कोणी खेळले, सदा यांचा जळफळाट मात्र रडगाणे गाऊन सगळ्यांकडून आपली कामे साधून घेण्यात नंबर पहिला.

विसूभाऊ म्हणजे तर पुऱ्या सोसायटीचे मालकच. मुलांनीही एकेकाला अशी इरसाल नावे ठेवली आहेत, की विचारू नका. मुले त्यांना तैमूरलंग म्हणतात. त्यांच्या एका पायात जन्मजात दोष आहे. ते चालताना तो पाय ओढीत चालतात. वय म्हणाल तर 'म्हातारा इतुका न अवघे पाऊणशे वयमान' पण कामाची जिद्द तरूणाला लाजवेल अशी. कंटाळा कसा तो माहीतच नाही. पण ऑफिसव्यतिरिक्त इतर कामात मात्र शून्य. हे म्हणजे सगळ्या विषयतले तज्ज्ञ. त्यामुळे सोसायटीचे सेक्रेटरीपद 'गांधी' घराण्यासारखे आजन्म बहाल केलेले. सदा दुसऱ्याची अक्कल काढणार. ह्यांचे इतर कुटुंबीय म्हणजे हे विश्वची माझे घरप्रमाणे सारी सोसायटी माझीच समजून धिंगाणा घालणार पण बाकीच्यांनी बोलायचे नाही. चूपचाप बघायचे. इतरांकडे कोणाचे नातलग आले, त्यांनी आपल्या गाड्या पार्क केल्या तर लगेच नियम दाखवणार पण यांच्या ओळखीच्यांनी येऊन मोडतोड केली, गाड्या पार्क केल्या... सारे मंजूर.

सुमित्रा काकू म्हणजे गरगरीत भोपळा. तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फाची लादी. यांची खास सवय म्हणजे समोर माणूस दिसला की, या काही ना काही काम सांगणारच. त्या राहतात दुसऱ्या मजल्यावर त्यामुळे ह्यांच्याकडे कोणालाच जिना चढणे होत नाही. मग काय करणार ? ह्यांच्याकडे येणारे कोणीही वेळीअवेळी दुसऱ्यांच्या ब्लॉकसमोर उभे राहून काकूंच्या घरातल्यांना हाका मारणार. विशेष म्हणजे घरातले कधीच पहिल्या कमीतकमी तीन चार हाकांना तरी ओ देणार नाहीत. खालच्या ब्लॉकवाल्यांचे कान बहिरे झाले की, घरातून कोणीतरी खिडकीत डोकावणार कोण हाका मारतोय म्हणून बघायला. तर काकूंना जिना चढणे नेहमीच जिवावर येते. मग जरा माझ्या चपल्या ठेवा हं ! अहो जरा छत्री द्याना, हे दळण ठेवा हं, मी संध्याकाळी घेऊन जाईन. आमच्या ना घरातले पाणीचं गेलंय जरा तुमच्याकडे आंघोळीला येऊ का ? असा सतत दुसऱ्यांना त्रास. चुकून जरी एखाद्या वेळेस दुसऱ्यांनी काही मदत मागितली तर सबब सांगून नकार घंटा वाजलीच समजा. मुले तर त्यांना घाबरतातच. त्या दिसल्या की, काही तरी काम सांगतील म्हणून आधीच त्यांना चुकवतात. मुले खेळत असताना त्या दिसल्या की, ज्याला त्या दिसतील तो ठरावीक पध्दतीची शिट्टी वाजवितो की बाकीची मुले सावध होतात.

आणखी एक खास नमुना म्हणजे काळे काका. वास्तविक गोरे आडनावाची माणसे नेहमी खरेच बोलतात. तर खरे... थापा मारण्यात पटाईत. पण काळे काकांचे तसे नाही. ते अगदी नावाप्रमाणे आतून बाहेरून काळेच बरं कां. काळे काकूंनी साथ सोडून खूप वर्षे झाली. काकू मेल्याबरोबर मुला सुनांनीही पाठ फिरवली. काकांचा स्वभावच तसा. कोण जवळ येणार.

तब्येत ठणठणीत. आर्थिक परिस्थिती उत्तम त्यामुळे मुलांच्या तोंडाकडे बघायची गरज नाही. पण पाच मिनिटे जरी बोलायला उभे राहिलात की जगातल्या सर्व शिव्या माहीत होतील. सतत दुसऱ्याला जोड्याने मारायच्या गोष्टी. सुतावरून स्वर्ग गाठण्यात अगदी तरबेज. त्यामुळे तिखट मीठ लावून बातम्या पसरविण्यात हुशार. सोसायटीतले चालते बोलते वर्तमानपत्रच म्हणाना.

पवार काकांबद्दल तर काही विचारूच नका, त्यांच्या डोक्यावरचे टक्कल हीच त्यांची ओळख. त्यामुळे पवार आडनांवापेक्षा 'टकलू काका' नावानेच प्रसिध्द. सरकारी कुबड्या घेऊन हे वरच्या पदापर्यंत पोहोचले. पण बोलताना मात्र माझ्यासारखा शहाणा मीच. इन्कमटॅक्सच्या ऑफिसने भरभरून दिले. क्रिकेटचा आणि त्यांचा छत्तीसचा आकडा त्यामुळे मुले क्रिकेट खेळायला येतात केव्हा आणि त्यांची बॅटबॉल जप्त करतो केव्हा यासाठी टपलेले. ह्यांच्याशी भांडण झाले नाही अशी व्यक्ती सोसायटीत सापडणे कठीण. सोसायटीत मॅनर्स काय ते फक्त पवारांनाच आहेत बाकी सारे अक्कलशून्य.

तर अशीही अजब माणसांची अजब सोसायटी आहे छोटीशीच पण नमुनेदार.

◆◆◆

*With Best Compliments from*

# Architect T. N. Hussan

*With Best Compliments From*

# M/s. Pragati Construction

A-4/624 Link Place Co.Op.Hsg.Society Ltd., Ranjanpada,
Off Link Rd., Opp Toyato Showroom,
Malad (W), Mumbai -400064
Mob : 9867151026

# शेजारी

**सरोज आपटे**

शेजारी असे हा सखा शेजारी
निंदकाचे घर असावे शेजारी

कधी तो परीक्षक होतो तर कधी टीकाकारही होतो. शेजारी असे हा सखा शेजारी. आपल्या नातलगास जी आपल्याविषयी माहिती नसते, ती शेजाऱ्यास आपला संपूर्ण इतिहास माहिती असतो. तसेच तो आपल्या आनंदात तसेच कठीण प्रसंगात उपयोगी पडतो तो शेजारी. म्हणूनच मुला मुलीची पसंती झाली तर मुलाकडची व मुलीकडची माणसं आधी शेजाऱ्यांकडे चौकशी करतात व मग विवाह ठरवतात. पण काही खट शेजारी असतात ते सांगतात की, आम्हाला त्यांच्याबद्दल काही माहिती नसते. पण काही शेजाऱ्यांवर विश्वास टाकून 'अहो, जोशीकाकू आम्ही दोघेजण काही कामानिमित्त बाहेर जात आहोत तर मुलांना शाळेतून आल्यावर त्यांची खाण्यापिण्याची तजवीज कराल का ? कारण आम्हास येण्यास उशीर होणार आहे.' तर त्या जोशीकाकू त्यांचा आनंदाने सांभाळ करीत. आपल्या मुलांबरोबर त्यांचा शाळेचा गृहपाठ घेत व त्यांना आपल्या मुलांबरोबर बागेत घेऊन जात.


हल्लीच्या काळात असे शेजारी क्वचितच दिसतात. चाळीत गणपुले आजोबा फारच चांगले. ते मुलांकडून परवचा, शुभं करोति वगैरे ८ ते १२ वयोगटातील मुलांना एकत्र जमवून म्हणून घेत. गणपती, नवरात्र तर दरवर्षी अजूनही चालतात बर कां ! भोंडला हा तर लहान मुलींचा आवडता खेळ. दर दिवशी पाटावर हत्ती काढून तो मध्ये ठेवून लहान मुली भोंडल्याची गाणी म्हणतात. एक लिंबू झेलू बाई, अवकण माती चिकण माती अशी गाणी म्हणून फेर धरला जायचा ९ दिवस.

याप्रमाणे प्रत्येक दिवशी एक खिरापत म्हणजे पहिल्या दिवशी १, दुसऱ्या दिवशी २ याप्रमाणे नवव्या दिवशी नऊ खिरापती बरोबर ओळखेल तिला बक्षीस दिले जायचे. लहान मुलंमुली मोठी होत गेली, शिक्षण संपवून नोकरी करू लागली तरी एकमेकांचे शेजार सोडायला तयार नसत. त्यातच पाध्ये आजींचा नातू नितीन व वैद्य आजींची सुलभा एकमेकांच्या प्रेमात पडून विवाहित झाली. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. पण काही इंटरकास्टसुध्दा विवाह झाले आहेत. पण काही जणांनी उपनगरात ब्लॉक घेऊन तेथे संसार थाटले आहेत. एकदा ब्लॉक बंद झाला तर आपल्या शेजारी कोण हेसुध्दा त्यांना माहीत नसते. तर ते काय शेजाऱ्याच्या उपयोगी पडणार. ब्लॉक संस्कृती आणि चाळ संस्कृती यात खूपच तफावत दिसून येते. त्यामुळे ब्लॉकच्या शेजाऱ्यांपेक्षा चाळीतील शेजारी हा केव्हाही श्रेष्ठ मानावा. म्हणूनच म्हणतात, शेजार कसा असावा तो आपल्यातलाच आपणास मानतो, आपली काळजी, व्यथा आपणास निःसंकोचपणे सांगतो तो खरा शेजारी. आपणही शेजाऱ्याप्रमाणे वागावे म्हणजे झाले, कारण आपण शेजारी सखे शेजारी आहोत हे लक्षात ठेवावे.

*With Best Compliments From*

# Kshetriya Infracture Pvt. Ltd.

## Prop. Sanjay Singh



**Shop No. L.3.47, Dream Mall Bhandup (W) Mumbai.**

# हाऊसिंग सोसायटी लिमिटेड

**विनोद अच्युत बांदोडकर**



सोसायटीच्या वार्षिक सभेमध्ये दर वर्षाप्रमाणे जे अनेक मुद्दे मांडण्यात आले त्यापैकी एक झाड लावणे. सोसायटीच्या परिसरात भरपूर मोकळी जागा असल्यामुळे झाडे लावण्यास वाव. नेहमी अशा सभा १४ ऑगस्टपर्यंत घेण्यात याव्या असं 'बायलॉज' सांगतो. त्याप्रमाणे सर्व सोसायट्यांना त्या लवकरात लावकर उरकण्याची घाई असते आणि हे दिवस नेमके पावसाचे असल्यामुळे वातावरणात गारवा असतो. तसा मनातही, नवीन कार्यकारिणीचा प्रस्ताव, जुन्या कमिटीचे असणारे वर्चस्व फार कमी सभासद नवीन कार्यकारिणीवर येण्यास उत्सुक. जबाबदारी टाळणारे, त्यामुळे काही सभासद जाणून बुजून गैरहजर राहणे हांत हो मिळवणारे किंवा फक्त माना डोलावणारे, फक्त तोंड दाखवण्यापुरते येणारे असे विविध प्रकार आपणास बघावयास मिळतात.

कामे करणारे, यांना फक्त नावे ठेवण्यात येणारी मंडळी, कधी तरी भांडणापर्यंत त्यांची मजल जाते, 'अहो', 'तुम्ही एवढ बोलता ना ?' मग तुम्हीच हे पद का नाही सांभाळत ? 'बोलणं सोपं असतं काम करणे कठीण' असे प्रसंग पण उद्‌भवतात. त्यांना शांत करण्यास पुन्हा वेळ वाया जातो. मुळ मुद्दा राहतो बाजूलाच अशा अनेक गोष्टी आपल्याला तिथं अनुभवायास मिळतात. प्रसंगी हमरी–तुमरीवर येणारी मंडळी, वेळप्रसंगी त्यांना आवरणे कठीण होते.

झाडे लावण्याचा विषय जेव्हा ऐरणीवर आला तेव्हा अनेकांकडून त्याविषयी मते मांडण्यात आली. झाडे न लावण्याच्या बाजूला पण मतप्रवाह होता. झाडे लावल्यामुळे होणारा त्रास यावर त्या मंडळींचा जोर होता. काही जणांचा त्याला ''हां'' होती तर काहींचा त्याला ''ना''होता.

कंपाऊंड गेटच्या परिसरात उंच झाडे लावण्यास दुकानदारांचा मज्जाव. त्यांच म्हणणं की आमचा (view) जाणार, दुकान न दिसल्यामुळे आमच्या गिऱ्हाईकांवर त्याचा परिणाम होईल. उंच झाडे लावली तर त्याची मुळे खोलवर जाऊन बिल्डिंगच्या फाऊंडेशनमध्ये ती मुळे जाऊन बिल्डिंग कमजोर होईल असं काहींच मत होते. कार पार्किंगच्या ठिकाणी उंच झाडे लावली तर पावसात झाडे कोलमडून आपल्या गाड्यांचे नुकसान होईल. पालापाचोळा पडून कचरा

होईल. झाडामुळे डासांचा पण उपद्रव होण्याची शक्यता होती, अशा सर्व शक्यता पाहून, पर्यावरणप्रेमी जी झाडे लावण्याच्या बाजूला सरसावलेली मंडळी त्याचा जरा भ्रमनिरास झाला.


एका सभासदाने असे सुचविले की अशी, झाडे लावण्यात यावी जेणेकरून व्हिववर पण परिणाम होणार नाही किंवा त्याच्या मुळांपैकी बिल्डिंगला पण धोका पोहचणार नाही. सर्वजण त्या सभासदाचं कान लावून ऐकत होते. ते 'काय' बोलतात, ते त्यावर लक्ष देत. ते झाड कुठले असेल ? यावर त्यांचे भाष्य चालू होते. अशोकाचं झाड लावणे सर्वात उत्तम ते का ? काही सभासदांनी त्यांना विचारल्यानंतर ते म्हणाले, एकतर हे झाडं टॉवरसारखं उंच वाढते. आजूबाजूला त्यांच्या फांद्या पसरत नाही. पूर्ण झाड हे बाराही महिने हिरवगार असते. कंपाऊंडवालाच्याजवळ लावल्यामुळे परिसरही सुंदर दिमाखदार दिसेल. त्यांची मुळे जास्त न पसल्यामुळे बिल्डिंगला पण धोका नाही आणि हे झाड, सहसा पडत नाही. त्यामुळे नुकसानीचा प्रश्न उद्‌भवत नाही. बाराही महिने ते झाड हिरवंगार असते, पालापाचोळा पण होत नाही. एका सभासदाने विरोधात जाण्याचा प्रयत्न केला. म्हणे, ही झाडे जास्त प्रमाणात पाणी खेचतात. त्यावर ते म्हणाले, आपल्याकडे पाण्याची काय कमतरता आहे का ? जमिनीत पाणी मुबलक आहे. त्याची काळजी तुम्ही करू नका. त्या झाडांना पाणीपण नैसर्गिकरीत्या मिळते. त्यांना स्वत: पाणी घालण्याची पण आवश्यकता नाही. पुढे तेही म्हणाले की पण, एक लक्षात ठेवा. अशोकाचं झाड हे फक्त पुरुष (मेल) असावे. झाड लावताना याची काळजी घेणे फार गरजेचे आहे. स्त्री (फिमेल) अशोकाचं झाड असेल तर त्याच्या फांद्या आडव्या पसरतात. तर पुरुष अशोकाच्या झाडाबद्दल तसं होत नाही. त्याच्या फांद्या जास्त पसरत नाहीत.

अशा संवादामुळे आपल्या ज्ञानात भरच पडत असते. अशोक हे झाड स्त्री–पुरुष असते हे कळले. पर्यावरणप्रेमी आणि बिनपर्यावरणप्रेमी यांच्यामध्ये एकमत होण्याचा मार्ग खुला झाला. पुरुष अशोकाचं झाडे लावावीत असे सर्वानुमते ठरवण्यात आले. पर्यावरणप्रेमींचा एक गट निर्माण करून त्यांना ती जबाबदारी देण्यात आली.

काहींनी नारळाचे झाड लावण्यास किंवा आब्यांची, फणसाची झाडे लावण्यास आपली मते मांडली. त्यावर काही मंडळींनी आक्षेप घेतला. पुढे ती झाडे फळं देणारी झाली तर बाहेरून येणाऱ्या मुलांकडून दगडांचा मारा पण सहन करणार का ? त्यावर सर्व शांत झाले किंवा येणाऱ्या फळांचे वाटे करण्यासाठी वेगळी समिती नेमणार का ? वगैरे, वगैरे.......

यावरून एक प्रसंग आठवला, एका सोसायटीमध्ये एकाने नारळाचे झाड लावले होते, ग्रहस्थ स्वत: ग्राऊंडच्या फ्लॅटमध्ये राहत असत. काही वर्षांनी त्या झाडाला फळ येण्यास सुरूवात झाली. सोसायटीच्या सर्वांचे लक्ष त्या आलेल्या भरगच्च नारळांवर ! त्या नारळावर अधिकार गाजवण्याचा प्रत्येक जण सरसावल्यावर ज्यांनी ते झाड लावले, त्यांनी त्याला

खतपाणी घातले, त्याची योग्य तऱ्हेने देखभाल केली त्याचे श्रेय इतरजण कसे काय घेऊ शकतात? मुद्दा राहिला जागेचा . ते झाड ज्या ठिकाणी होतं ती जागा सोसायटीची त्याचे काय? तेथील रहिवाशी जरा समजूतदार असल्यामुळे हा प्रश्न जास्त चिघळला नाही. ज्यांनी ते झाड लावले त्यांनाच त्याचा उपभोग घेऊ देत, असे ठरले. माणुसकी दाखवत ते गृहस्थ आलेल्या नारळाचे वर्षातून एकदा गोड करून सर्व सभासदांना देत असत. हा त्यांचा चांगुलपणा होता. असो!



महानगरपालिकेने ठराव केल्याप्रमाणे रस्त्याच्या दुतर्फी असणाऱ्या सोसायट्यांनी आपली बिल्डिगची रंगरंगोटी करावी. आपला परिसर स्वच्छ ठेवण्यास पालिकेला मदत करावी. नसेल तर पालिका स्वखर्चाने ते करील आणि झालेला खर्च सोसायटीकडून वसूल करण्यात येईल. असा तो ठराव होता. त्याप्रमाणे तसं करणं सोसायट्यांना भाग होते.

सभासदांनी आपल्या ग्रीलमधील सर्व कुंड्या, इतर अडगळ काढून टाकावी असं सर्वानुमते झालं नसेल तर त्यांना दंड लावण्यात येईल. त्याला सर्वांनी सहकार्य केले. काहींचा त्याला काही प्रमाणात विरोधही झाला. त्याचं म्हणणे असे होते की आपण सर्व हिंदू, आपल्या घरात एक तुळस तरी असावी असं शास्त्र सांगते. सूर्याला अर्ध्य देण्यासाठी पण अर्ध्य देताना खोलगट भांड्यामध्ये तुळशीची कुंडी ठेवून पाणी खाली सांडणार नाही. याची काळजी त्या-त्या सभासदांनी घ्यावी असं ठरलं.

मुंबईत उंच उंच टॉवर तर झाले. पण कपडे वाळवण्याची सोय बाहेरच्या ग्रीलमध्ये होत असल्यामुळे ते टॉवर अगदी विद्रूप दिसायला लागते. ग्रील म्हणजे अडगळीची जागा जणू. पूर्वी मुंबईत सर्वांकडे चाळी होत्या. कपडे व्हरांड्यात सुकण्यासाठी ठेवत असत. पण ते दिसण्यात येत नसे. पण आता चाळीचे टॉवर झालेत. पण प्रवत्ती बदलली नाही. आता ही लक्तरे दुरूनही दिसावयास लागल्यामुळे टॉवरची शोभा निघून जाते. काही उच्चभ्रू वस्त्यांमध्ये असे चित्र दिसत नाही. कारण त्यांना ड्राईंगस्पेसची सोय असते. टॉवरची शोभा राखणे आपल्याच हाती आहे.

खिडक्यांची ग्रील म्हणजे विविध उपयोगी अशी ही जागा असते. अडगळीचं सामान ठेवण्यासाठी ही हमखास जागा असते. नको असलेल्या सामानासाठी ही जागा आहे असे वाटते. कपडे सुकवण्यासाठी त्याचा

उपयोग होतो. तसेच चिमुकल्यासाठी ती बैठकीची जागा असते. काऊचिऊच्या गोष्टी सांगत आजी नातवंडांना भात भरवत असते. काहीजण छान झाड लावून सुशोभित करतात. पुन्हा ती मेन्टेन करणं हे आलेच. झाडांना पाणी घालताना अतिरिक्त पाणी बाहेर सांडल्यामुळे बाहेरील भिंती मातीच्या डागांमुळे खराब होतात. पाणी बाहेर सांडू नये म्हणून उपाययोजना, ट्रेमधील पाण्याचा निचरा होत नसल्याने त्यात डासांच्या अळ्यांची पैदास होऊ नये यासाठी ती ट्रे वेळोवेळी साफ करणे गरजेचे असते. वेळेच्या अभावामुळे ते राहून जाते आणि आपण आजारांना निमंत्रण देत असतो. ग्रीलमध्ये पसरट कुंड्यांमधून भाज्या उगवण्याचा मोह काही गृहिणींनां आवरत नसतो. शेती करण्याची काहींना आवड असल्यामुळे दुधाची तहान ताकावर भागवण्याचा प्रयत्न असतो.

किचनच्या खिडकीमधील ग्रील, हॉलमधील फ्रेंच विंडोतील ग्रील, बेडरूममधील ग्रील यांचा उपयोग वेगवेगळ्या तऱ्हेने होत असतो. किचनच्या ग्रीलमध्ये कावळ्यांच्या नजरा घरातील गृहीणी काय अन्न शिजवते त्यावर असते. छोट्याशा ट्रेमध्ये अन्न ठेवून ते कावळे फस्त करताना बघून त्यात त्यांना आनंद मिळतो. पक्ष्यांना ती सवय होते आणि पुन्हा-पुन्हा कावळे येतात हे (स्केवेंजर) पक्षी असतात. ते एक प्रकारे शहराची सफाई करणारे पक्षी आहेत. त्यांना आपण शिजवलेले अन्न पुरवून त्यांना आपण एका प्रकारे आळशीच करत असतो. त्यात चिमण्याही असतात. अनेक वेळा इतर पक्ष्यांची ये-जा असते. मैना, डोक्यावर तुरा असणारे रॉबीन पक्षी यांचे पण दर्शन होते. उन्हाळ्यात अशा पक्ष्यांना कटोरीमध्ये पाणी ठेवण्यात यावे असे पक्षीप्रेमी सुचवतात. त्यामुळे पक्ष्यांची तहान भागते. सिमेंट काँक्रीटच्या वस्त्यामध्ये पक्ष्यांना भूतदया दाखवण्यासाठीही असेल.

बेडच्या ग्रीलमध्ये लहानग्यासाठी भातुकलीचा खेळ खेळण्याची ती जागा असते. हॉलच्या ग्रीलमध्ये शोभेची झाडे लावण्याची जागा असते.

सोसायटी म्हटलं तर सर्वांचे सहकार्य असावे लागते. सर्वानुमते जो निर्णय होतो त्याचा आदर राखणे हे सर्वांचे कर्तव्य असते. काही मुद्दयांवर असहमती असू शकते. पण ते सामंजस्याने सोडवणे. आपण अनेक सोसायट्यांमध्ये कार पार्किंगच्या मुद्यावरून भांडणे होत असताना बघतो. सोसायटीचा परिसर साफ ठेवणे, जसं आपण आपले घर स्वच्छ ठवतो तशी सोसायटीपण स्वच्छ असावी यासाठी प्रत्येक सभासदांनी त्यासाठी प्रयत्नशील असावे. फ्लॅटची अंतर्गत सजावट करताना बिल्डिंग कोसळण्यासारख्या घटना घडू शकतात. शेअर सर्टीफिकेटवर वारसदार नेमणे ह्या अशा गोष्टी योग्य वेळी केल्यानंतर सोसायटी चालवणाऱ्यांसाठी ते त्रासदायक ठरत नाही.

सोसायटी ही लोकशाही पध्दतीने चालत असते. याचा अर्थ असा नव्हे मनाला येईल तसे वागणे. शेवटी प्रत्येकाला शिस्त ही पाळावीच लागते. सोसायटीत एकोपा राहण्यासाठी वार्षिक कार्यक्रमात सहभाग सर्वांचा असणे गरजेचे असते. महिनोनमहिने एकमेकांची भेट न होणे अशा कार्यक्रमाने ते साध्य होते. मिळून मिसळून राहणे हेच सुदृढ सोसायटीचे द्योतक ठरेल.

◆◆◆

# घराला घरपण देणारी माणसे

चारुलता कुळकर्णी



ज्या घरांत प्रार्थना, संस्कार, परस्परांचा आदर, कौतुक,एकमेकांच्या विकासाची ओढ ज्या लोकांमध्ये असते त्यालाच आपण घर किंवा कुटुंब असं म्हणतो. पण जिथं केवळ स्त्री आणि पुरुष राहतात, नात्याची ओढ संबंध नसतो , घरांतील मुंल फक्त प्रॉडक्ट म्हणून असतात त्यांच्यातील बहीण-भावाचा संबंध ठेवत नाहीत.आई-वडील ,मुलं यांचे विचार जुळत नाहीत,मुलं आईवडिलांना विचारत नाहीत. आईवडिलांना आपल्या मुलांविषयी काळजी-प्रेम नसेल अशी ही कुटुंब व्यवस्था आता ज्वालामुखीच्या तोंडावर उभी आहे. अशा कुटुंबाना घर ही संज्ञा लागत नाही.

बारा तेरा वर्षांपूर्वी कोर्टांत घटस्फोटाच्या चाळीस पंचेचाळीस केसेस यायच्या. आता आठवड्याला चारशे-पाचशे अर्ज येतात. हया अर्जांमध्ये नमूद केलेली कारणसुध्दा हास्यास्पद असतात.जर अशा कारणांनी आपण विभक्त व्हायचं ठरवलं तर रोज कोर्टाचं दार वाजवावं लागेल.

विवाह करून आपलं नवीन कुटुबं तयार करणं म्हणजे फक्त आर्थिकच गरज नसते. पगार दोन माणसांना पुरेसा आहे. बँकेत थोडी शिल्लक आहे, लहानसा ब्लॉक आहे. एवढीच तयारी असली की आपण लग्नाला सक्षम आहोत असं मुळीच नाही. त्यामागे मोठी तयारी असते. ती म्हणजे मनाची ! अशा हया मनाच्या सखोल पायाअभावी इमारत पत्त्यासारखी ढासळते,तसंच हे कुटुंबसुध्दा कोसळतं ! केवळ खांण-पिणं-झोपणं अशा व्यवहारिक कारणांसाठी निवारा हवा म्हणून घर नावांच लॉजिग-बोर्डिंग उरतं. अशा घरांतील नात्यांचा ओलावा मात्र हरवलेला असतो.

सध्याच्या यांत्रिक युगात आपली जीवनशैली देखील ऐहिक होत चालली आहे. प्रत्येक गोष्टीला यंत्राची जडण-घडण दिसून येते. आजचं जीवन म्हणजे कमीत कमी श्रम आणि जास्तीत जास्त चैन हेच आजच्या पिढीचं ब्रिदवाक्य आहे. अशा ठिकाणी नाते रुजत नाही. पूर्वी जमीन राखण्याच्या निमित्ताने जमिनीला, भिंतीला स्पर्श व्हायचा तेव्हा आपुलकी रुजली जायची व आपोआप हे माझं घर हे शब्द मुखांतून बाहेर पडायचे. गणपतीचा मखर सगळी मुलं मिळून करायचे. ते हे मखर आम्ही केलं हे त्या मखरांत ठासून भरलेलं असायंचं! दिवाळीचा आकाश कंदील करणं हा तर प्रत्येक घराचा सोहळा असायचा ! आता तर हे सर्व बाहेरुन आणलेल असते. दिवाळीचा फराळसुध्दा बाहेरुन आणला जातो. तो तर आता बारा महिने उपलब्ध असतो. अशा घरात आतून काहीच आणलं जात नाहीत. अशा घरांत आपली मुलं अधिकाधिक सुपरफाईन कशी होतील हयाची चढाओढ लागते. त्यात मुलांच्या मात्र चिंध्या होतात.

अलीकडे ब-याचशा घरांत ममत्व व मृदुता नसल्यामुळे तेथील माणसं तारस्वरांत केकाटत असतात. एकतर माणसं भांडतात तरी किंवा गप्प तरी बसतात. अशी माणसं एकत्र आली की घराला घरपण कसं निर्माण होईल ? घरपण देणारी माणसं नसतील तर घर व कुटुंबव्यवस्था कशी निर्माण होईल ?

हया नव्या युगात कुणासाठी कुणालाच वेळ नाही, कुटुंब नावाच्या झाडाला खतपाणी घालायला, रुजवायला कोणालाच वेळ नाही. धपापणारी घरं,



ओक्साबोक्सी पैशाच्या मागे लागणारी घरातील स्त्री पुरुष ! आता कुटुंबव्यवस्थाच नाहीशी होऊ लागली आहे.त्याग,समर्पण भक्ती ही मूल्ये ऐकली तरी माणसांना हसू येतं. पूर्वीच्या काळी या मूल्यांमुळेच कुटुंब आनंदी होते. चार-पाच भावांपैकी एखादयाची नोकरी सुटली किंवा अपंग झाला तर बाकीचे भाऊ म्हणायचे काळजी करू नकोस. आम्ही आहोत ना ! आता हे शब्दच ऐकायला मिळत नाहीत. आता कानावर शब्द पडतात. त्याच तो बघेल! हा मस्तवाल शाप कुटुंबामध्ये शिरला आणि कुटुंबव्यवस्था खिळखिळी झाली. अलीकडे आई-बाबांची वाटणी करणारे मुलं दिसुन येतात. माझं घर म्हणजे पंढरपूर ! माझे आई-बाबा घरात असंण म्हणजेच विठ्ठल-रखुमाई ! असं मानणारी मुंल दिसंत नाहीत. अशा अमीर मुलांच्या अमिरीचा काय उपयोग ?

प्रत्येक कुटुंबाकडे पाहिलं तर वाटतं, पाश्चिमात्य देशांच्या पावलावर पाऊल टाकून चालणारी आजची पिढी दिसून येते. कुटुंबाचे कपडे. बुफेसारख्या जेवणाच्या पध्दती, फादर्स डे, मदर्स डे, व्हॅलेंटाइन डे, हेही साजरे होतात. वर्षातून एकदा मुलांनी आपल्या आई-बाबानां भेटण्यासाठी मोकळे! आपला समाज हयाचाच मागे वेगाने चालला आहे. खरं तर कुटुंबव्यवस्था ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे ! परिस्थितीत घरातील एकटा-दुकटा माणूस कोणाच्या साथीने काय कमावणार? आपला जय पराजय तो कोणाला सांगणार? मनमोकळं हसणार कुंठं? कुणासमोर आपले आसू गाळणार ? कारण घराला घरपण उरलेलंच नाही. घरपण देणारी माणसंच पैशांच्या मागे धावताहेत. हयासाठीच माणसांना हवं असतं एक घर ! तर घराला तडे पडले तर बाहेर ही आधार मिळत नाही.

घर संकेत देते ,कधी कधी समजावून सांगत, कधी आईच्या मुखातून तर कधी बाबांच्या! पण उन्मत तरुण पिढी ऐकत नाहीत. मग घरं कोसळतं. अशी घरं आतून कोसळतात. अशा वेळी ते घरं राहत नाही तर नाटकाचा रंगमंच उरतो, अभिनय करणारी मुलं! आपल्या वास्तूला आनंद वाटेल असं घरांत राहणाऱ्यांनी असायला हवं. प्रत्येकाच्या विकासाला पूर्ण मोकळीक असावी, उंबरठयाशी असलेली संयमाची लक्ष्मणरेषा पाळली तरच ते घर !

घरातील माणसं सगळी घराचीच असतात. केव्हातरी नात्यांत कुरबुरी होते. तेव्हा घर कान टवकारते, मनातील राग डोळयांवाटे बाहेर पडतो. कधी कधी वादाचे रूपांतर वितंडवादात झाला तर मात्र घराचा पायाच हादरतो, हात-पाय लटपटतात. सहज संवादाने सुटणारे प्रश्न हातोडयानेसुध्दा सुटत नाहीत तेव्हा ती फुटतात, संपतात, कोसळतात!

एका तरी कलेचं अधिष्ठान प्रत्येक घराला हवं असंतं. आपल्याला वाटतं ,माणसंच गाणं ऐकतात, माना डोलावतात, कौतुकाने वाह म्हणतात. भिंतीसुध्दा ऐकतात. आनंदाने माना डोलावतात. घराचे डोळे घरांतील चित्रही पाहतात. आपल्याला आपल्या घरांत आनंदवन उभारता येणार नाही पण एखादं रोप तरी सहज लावता येईल! मग घर मनमोकळं हसेल. त्यांत समाधानाचा गंध असेल!

घरातील ज्येष्ठ पिढी हे प्रत्येक घराचं वैभव असतं कारण तरुण पिढीचा सर्व आनंद या पिढीच्या अस्तित्वावरच तर उभा असतो. काही वेळा ज्येष्ठ पिढीच्या अस्तित्वावरच तर उभा असतो. काही वेळा ज्येष्ठ पिढीला नव्या गतीचा सूर पकडणं अवघड होतं, त्यामुळे संवाद सांधण्यात अडचण येते. काही प्रसंगात ताणतणाव निर्माण होते. अशा वेळी तरुण पिढीने त्यांना समजून घेतलं पाहिजे. वय, वार्धक्याने दिलेल्या आजारपणाच्या देणग्या हाती असलेला पुष्कळ मोकळा वेळ, भग्न रिकामपणा त्यामुळे ज्येष्ठ नागरिक अस्वस्थ होतात आणि हीच अस्वस्थता नव्या पिढीच्या गतिमान आयुष्यात अडथळे निर्माण करते. ज्येष्ठांचा आशीर्वादानं घर आपल्याला कल्पतरूची छाया देतात. त्याचबरोबर जीवन जगलेल्या आणि जीवन उपभोगलेल्या ज्येष्ठ पिढीचे मार्गदर्शन, सूचना, सल्ले

दीपस्तंभाप्रमाणे मार्ग दाखवतात. तरुण पिढीने थोडा समजूतदारपणा दाखवून ज्येष्ठांनी दिलेलं संचित स्वीकारले तर घर तालासुरांत नक्कीच गाऊ शकतं !

घराला हे सर्व हंव असतं, घर सुंदर तेजस्वी होतं. परंतु काही घरांत वर्षानुवर्ष छोटासाही समारंभ घडत नाही .एकही उत्सव चार जणांच्या हसण्या खिदळण्याने मोहरत नाही. जवळचे चार पैसे संपतील, या भयानं अर्धा कप चहा देण्याची दानत अनेकांकडे नसते. त्यामुळे अशा घराला कोणी आल्या–गेल्याची सवय राहत नाही. कुणी आलंच घरी तर एखादा कुरीअरवाला, टेलिफोन बिलवाला, नाहीतर सोसायटीचा गुरखा. सगळा संवाद–विसंवाद दाराबाहेर ! त्यामुळेच एक सुंदर घर तेलकट चौकोनी होऊन जातं. घरात टी व्ही, कॉम्प्युटर, व्ही सी आर, ओव्हन, एसी, लॅप टॉप, हॉलमधील फर्निचर म्हणजे सोबत नाही. सोबत असते ती माणसांची, प्रेमाने–आपुलकीने एकमेकांशी बोलण्याची, मित्र–मैत्रिणीची, प्रत्यक्ष स्पंदनांची ! हया गोष्टी आपल्या गरजेनुसार कधी मिळत नसतात. घरांतील माणसांच्या विश्वासाची साथ एकमेकांनी जपावी लागतात. मी आणि माझा आनंद या स्वभावामुळे घरांतील नात्यांमधील संबंध दुरावत जातात. आपल्या घराचं सुसंवादाचं दार नेहमी उघड ठेवावं लागतं. या यंत्रयुगात माणसं केवळ एकटी नव्हे, तर एकाकी झाली आहेत. मनाचे दरवाजे आधी बंद होतात, मग घराचे. कुणी आपल्याकडे येऊ नये, कुणाकडे जाऊ नये, अशी मन:स्थिती होते.एकाकी मनाची अवस्था आपणच करून ठेवली.

आता घरबंद हाच घराचा स्थायिभाव झाला आहे. जो तो पोटासाठी ,पैशांच्या व्यवस्थेखाली ताणतणाव घेत घरट्याबाहेर ! घरटं फक्त वस्तू सांभाळत उदास उदास ! दुपारच्या वेळी एखाद्या गृहवसाहतीत पत्ता शोधायचा झाला तर पत्ता सांगणाऱ्या माणसाचा पत्ता आधी शोधावा लागतो. पत्ता विचारायचा तर माणूस सापडत नाही. बरं माणूस कसाबसा मिळाला तर ते घर उघडं असेलच असं नाही.आजच्या यंत्रयुगातील हीच मोठी शोकांतिका आहे.

◆◆◆


**With Best Compliments from**



*Paresh Soni*

**Real Estate Consultant**



**9323853300 / 9820168708**

# वास्तुशास्त्राचे गूढ


**राजेश पाटील**

भारतीय अध्यात्मशास्त्राची मूलभूत भूमिका 'सर्वेऽपि सुखिन: सन्तु' असल्याने यातील जीवनदायी नियम धर्म, पंथ, जाती या सीमा ओलांडून सर्वांच्या शारीरिक, मानसिक व आत्मिक प्रगतीशी निगडित आहेत. व्यक्ती हा घटक लक्षात घेता आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा त्रिविध आयामांचा विचार या शास्त्रात केला आहे. सुख ही भावना या तीनही आयामांची गरज असून जैविक उत्क्रांतीचे गणितही सुखसापेक्ष आहे. उत्तम बुद्धीची निपज, श्रेष्ठ, भावनांचे कोष हे आत्मिक सुखाशी निगडित आहेत. मन, चित्त, बुद्धी व अहंकार या चार आयामांना अंत:करण चतुष्टय म्हणतात. या चारही सूक्ष्म अस्तित्वांचा पंचमहाभूतात्मक शरीराशी असणारा धागा हाच अध्यात्मशास्त्राचा प्रमुख विषय आहे.

संगीत, आयुर्वेद, ज्योतिष, योग आणि वास्तुशास्त्र ही या दर्शनशास्त्राचीच उपांगे आहेत. व्यक्तीचे समष्टीशी मैत्रीचे नाते निर्माण करण्याचे कार्य या पाचही अंगांच्याद्वारे केले जाते!

अंत:करण चतुष्टयाच्या सीमा या विज्ञानाच्या कक्षांच्या बाहेर असल्याने केवळ विज्ञानाच्या फूटपट्टीने या शास्त्रांची खोली मापणे हे मंदबुद्धीचे लक्षण आहे. ही सर्व शास्त्रे अनुभवजन्य असून व्यक्ती व समष्टीच्या गूढ संबंधांचा ठाव घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

गुरुत्वाकर्षण, उष्णता, प्रकाश, ध्वनी अणुशक्ती, विघटन, शीतलता अशी परस्परावलंबी व परस्परविरोधी सर्व शक्ती रूपेही मूलभूत प्राणशक्तीचीच रूपे आहेत. हा बहुव्यापक विचार या महाशास्त्रांचा पाया आहे. अर्वाचीन विज्ञानातही 'युनिफाईड फील्ड एनर्जी' सारख्या संकल्पना याच प्रकारच्या आहेत.





रेखा चित्र संख्या (3)

ज्याप्रमाणे माती, पाणी, उजेड, वारा यांच्या योग्य संवहनातून वृक्षाची उत्तम वाढ होऊन ते अधिक फुलते व फळते, त्याचप्रमाणे पृथ्वी, आप, वायू, तेज व आकाश या पंचमहाभूतात्मक योग्य आविष्कारणातून व्यक्तीचे जीवन सुख व आनंद प्राप्त करते. यासच व्यक्तीचे भाग्य उमलले असे म्हणतात.

या सर्वच शास्त्रांत वेगवेगळ्या माध्यमातून व्यक्ती आणि समष्टी यांना सुयोग्य जोडून आनंदक्षेम कल्याण प्राप्त केले जाते.

आपल्या धर्मशास्त्रानुसार आकाशतत्त्व हे सर्व शुभ घटनांची जननी आहे. तर अर्वाचीन विज्ञानात Spaces are wombs of creation म्हटले जाते. सर्व शुभघटनांचे मोहोळ शक्याशक्यतेच्या परिस्थितीशी निगडित असतात. या सर्व शास्त्रांचे योह या प्रकृतीचे वेध घेऊन शुभ घटनांचा मधु प्राप्त केला जातो.




वास्तुशास्त्रानुसार या शुभघटनांचा प्रवाह नैसर्गिक ऊर्जाप्रवाहांवर आरूढ असून जर हे नैसर्गिक उर्जाप्रवाह कुठल्याही अडथल्याशिवाय घर्षणाशिवाय व्यक्तीस प्राप्त होतील तर त्याचेही जीवन भाग्यशाली ठरते. या मूलभूत दोन ऊर्जाप्रवाहावरच वास्तुपुरुषमंडळाची संकल्पना मांडली आहे. उत्तर दक्षिण विद्युतचुंबकीय प्रवाहास जैविक ऊर्जा तर पूर्व-पश्चिम सौरउर्जेस प्राणिक ऊर्जा म्हणतात. समष्टीचे जैविक चक्र व व्यक्तीचे जैविक चक्र या जैविक ऊर्जेने जोडलेले असून प्राणिक चक्र हे सौर चक्रात प्रतिबिंबित होते. शरीरातील पंचप्राणांचे कार्यही या दोन चक्रांववरच अवलंबून आहे. उत्तरसुमुख अक्ष करूनच विकसताना अनेक कमळे, बह्मकमळे दिसतात. यातूनही ही जीवरासायनिक जाणीवच दिसते.

आयुर्वेदाने कायाकल्प, योगशास्त्राने मनकल्प तर वास्तुशास्त्राने भाग्यकल्प होतो. हेच उपांगाचे विशेष आहे. समष्टीच्या अथांग ऊर्जेशी पंचमहाभूतात्मक आविष्करणातून अक्षय-वास्तूचे माध्यमातून हा भाग्यकल्प घडतो.

वास्तुशास्त्रानुसार वास्तू हा जीवरासायनिक घटक असून श्रेष्ठ वास्तूचे योगे दिव्यकवच व दिव्यसंकोशाची प्राप्ती होते. योगशास्त्रानुसार उत्तर-पूर्व दिशांवर चंद्र नाडीचा प्रभाव आहे. चंद्रनाडी ही सर्व शुभ कल्याण क्षेम आनंदाची दात्री असून उत्तर व पूर्व दिशाही या चंद्रप्रवाहामुळे सुखशांतीच्या अधिष्ठात्री देवता आहेत. दक्षिण-पश्चिम दिशांवर सूर्यनाडीचा अंमल असून ही नाडी क्रूर व कठीणकर्मी वर्णिली आहे. नेमका हाच संदर्भ वास्तुशास्त्राचा पाया आहे. ज्या वास्तूस उत्तर पूर्वेचा प्रवाह असेल ती श्रेष्ठ गुणदायी तर दक्षिण पश्चिमप्रवाह असणारी तीव्र-विगुणदायी वास्तू ठरते. ज्योतिषशास्त्रातही पूर्व व

उत्तर दिशांवर सूर्य गूरू या प्रसारणात्मक जीवनदायी ग्रहांचे प्राबल्य असून दक्षिण व पश्चिम दिशांवर शनी व मंगळ या पापग्रहांचे प्राबल्य मानले आहे या सर्वच उपांगातून वाहणारे समांतरसूत्र साधकांच्या चित्ताचा ठाव घेते.

वास्तुशास्त्रानुसार उत्तर व पूर्व दिशांचा मूळ स्वभाव उगम असून दक्षिण व पश्चिम दिशाचा मूळ स्वभाव अस्त आहे. या मूलभूत प्रकृती स्वभावास अनुसरून वस्तूंची व वास्तूची मांडणी व उभारणी करणे हा वास्तुशास्त्राचा गाभा आहे.

आपल्या प्राचीन शास्त्रीय संकल्पनात दिशा आणि काळ यांना दिक्काल अशी जोड संज्ञाच उपयोगात आणली जाते. येणाऱ्या काळाच गणित दिशांच्या बेरजेने मांडण्याची कला म्हणजे ही उपांगे होत.

मनाशी निगडित असणाऱ्या सुख आनंदाचे प्रतिबिंब शरीरातील-रासायनिक मूलद्रव्यात दिसून येते व शरीराचा संबंध बाह्य वातावरणाशी जोडलेला आहे. हे बाह्य वातावरण वास्तूच्या दिव्य आवरणाच्या योगे शरीर मन समष्टी यांना जोडते. जगद्विख्यात फेंगशुई या चायनीज वास्तुशास्त्राचाही अर्थ फेंग म्हणजे पवन व शुई म्हणजे पाणी असा आहे. याचेच चांगले रूपांतर म्हणजे 'समिधा' व 'तीर्थ' होय. समिधेचा संबंध अग्नीतत्त्वाशी आहे व उत्पत्ती पृथ्वीतत्त्वात आहे. तीर्थाचा संदर्भ जल व आकाशतत्त्वाशी निगडित आहे. बौद्ध भिक्षूकांबरोबर चीन वगैरे भागात थोड्या वेगळ्या अंगाने पण भारतीयच वास्तुशास्त्र विकसित झाले आहे. बाह्य वातावरण समिधा-तीर्थाचे योगे संशुद्ध करण्याची कला म्हणजे फेंग-शुई शास्त्र होय.

प्रकाश, ध्वनिकंपन व लहरी या चार माध्यमांच्या योगे वास्तूस चंद्रनाडीचा प्रवाह प्राप्त करून देणे ही वास्तुशास्त्राची प्रधान कला आहे. जडत्व, वृक्ष, धातू उपयोगात आणून सूर्यनाडीच्या प्रवाहांना बाधा आणणे हे वास्तुशास्त्राचे प्रधान ध्येय आहे.

आरसे, वृक्ष, आराध्य वनस्पती, आराध्य धातू, पिरॅमिडस् आकार, जडत्व गुरुत्व, प्रकाशाचे नियमन रंग, दंगड, शिल्पे, विषम पातळ्या, यंत्रे, वस्तूंची मांडणी, घंडा, पाणी, स्फटिक अशा विविध आयामांचा उपयोग करून वास्तूस चंद्रनाडीच्या प्रवाहाचे योगे अक्षयत्व आणता येते. या साऱ्यासाठी ज्योतिष, योग विज्ञान व वास्तू यांच्यातून वाहणाऱ्या समान सूत्रांचे अध्ययन आवश्यक आहे.

वरील सर्व आयाम दिशांचे गुणविशेष विचारात घेऊन ईशान्यपात्र भौमयंत्र, शनीतारका, उलटे पिरॅमिडस्, वायव्य संवादिनी अशी अनेक यंत्रे आम्ही 'वास्तुविद्या संशोधन प्रतिष्ठान'तर्फे विकसित केली आहेत व त्याचा लाभ होताना अनेकांनी अनुभवले आहे.

◆◆◆

## हसू नका बरं!

**कारण**

बाळू-काय रे काळू, तू घर बांधणार होतास त्याचे काय झाले ?

काळू-अरे बाबा,वेडी माणसे घर बांधतात व शहाणी माणसे तिथे रहायला जातात.आणि मी वेडा नाही !


**-सुरेश देहेरकर**

With Best Compliments From

# RELCON
## Infraprojects Ltd.

Engineers & Contractors

**Prop. Dipan Shah**




**A-01/101 Krishna Building Opp. Mahavir Jain Vidhyaly,**
**Juhu Lane, Andheri (W) Mumbai – 400088**

# वास्तू सुखाचे द्वार

**ओमनी फीचर्स**

वास्तुशास्त्र आणि फेंगशुई या दोन्ही शास्त्रांमध्ये प्रवेशद्वारास असाधारण महत्त्व दिलेले आहे. दोन्ही शास्त्रांच्या नियमात बराच फरक आहे. वास्तुशास्त्रातील द्वार नियम हे भवन आणि प्लॉटशी दिशांच्या माध्यमातून जोडलेले आहेत. तर फेंगशुईतील द्वार नियम व्यक्तीच्या कुआ नंबरचे माध्यमातून दिशांशी व पंचमहाभूतांशी जोडलेले आहेत. एक प्रकारे वास्तुशास्त्र ही स्थिर नक्षत्र पद्धती असून या पद्धतीत भवनातील अंग व आवरण देवतांना अधिक महत्त्व देऊन घराचा एक निश्चित स्थिर व चिरदायी आराखडा केवा जातो. भवनाच्या आत सीमित अशा आराखड्यात देवता पंचमहाभूतांचा मंडलाकार आविष्कर करून वास्तुपुरुषमंडळ स्थापतात. त्यामुळे बाह्य विक्षेपाचा एकही संदर्भ न वापरताही वास्तुरचना होऊ शकते. रत्न धातू, विधी रंग, शंकू, उपपीठ रचना, मुहूर्त यांचा उपयोग करून कालातीत अशी वास्तुरचना करतात. याउलट फेंगशुई शास्त्र हे 'चलित नक्षत्र पद्धती' किंवा 'शून्य ऊर्जाप्रवाह पद्धती' असल्याने या शास्त्रात भवनाबाहेरील 'विक्षेप ऊर्जेसही समान महत्त्व दिलेले आहे. नैसर्गिक ऊर्जाचक्राचे प्रतिबिंब अष्टतत्त्व पद्धतीतून रचले जाते. प्रत्येक व्यक्तीच्या ऊन्मवर्ष व दिनांकाचा उपयोग करून 'कुआ' नंबराच्या व दिशांच्या विशेषत्वास महत्त्व दिले आहे. फेंगशुई एक प्रकारे ज्योतिषशास्त्राचेच प्रारूप असून




'वास्तुशास्त्र' मात्र भक्कम असे बांधकाम रचनेचे शास्त्र आहे.

जेव्हा एकाद्या घरातील अंग व आवरण देवता प्रबल असतात तेव्हा घराबाहेरील दोषांतून निर्माण होणाऱ्या 'विक्षेपास' फारसे महत्त्व द्यायची गरज नसते. वास्तुशास्त्रात हे देवता दिशा व ऊर्जा यांचे संदर्भ अतिशय अतिशय प्रकट, सुस्पष्ट व ठाम आहेत. प्रत्येक दिशेस एक अंग देवता व आठ आवरण देवता असतात. आठही दिशांची मिळून 'ब्रह्मा' ही अंगदेवता असून प्रत्येक दिशेचे ९ देवतांचे मिळून या 'ब्रह्मा' तत्त्वाभोवती आवरण तयार होते. वास्तुशास्त्रात जी उपपीठ रचना करतात त्यामध्ये धातू, रत्न, वनस्पती यांची 'बीज' म्हणून उपयोग करतात. एका

शिवसूत्रानुसार 'देवताया: तु शरीरं बीजात् उपपद्यते।' असा संदर्भ आहे. जेथे हे बीज रूप जे त्या उपपीठावर ती देवता सदेह प्रकट होते असा अर्थ होतो. एक प्रकारे अध्यात्म योगशास्त्र हे निर्गुण साक्षात्काराचे शास्त्र आहे तर वास्तुशास्त्र मात्र सगुण साक्षात्काराचे शास्त्र आहे. या शास्त्रात जीवनाचा सर्व साक्षात्कार पृथ्वीतत्त्वातून घडतो. त्यामुळे शब्द स्पर्श, रूप, रस व गंध या पंचतन्मात्रांची पूर्ती या शास्त्रांतून केली जाते. भोग, ऐश्वर्य, पराक्रम व पूर्ती ही वास्तुसंकल्पनेची मूर्त चौकट आहे. या शास्त्राची रचना भृगु, अत्री, वसिष्ठ अशा १८ महर्षींनी केली आहे. हे सर्व ऋषी संसारी गृहस्थाश्रमी होते. त्यामुळे आम माणसाचे प्रश्न, त्यांचा गुंता आणि नित्य जीवनातील सुखदु:खे याची पूर्ण जाण त्यांना होती. जीवन प्रवृत्तीपर असून ऐश्वर्य, भोग, पराक्रम, तृष्णा, वासना यांचेही जीवनात एक प्रमुख स्थान आहे. आवश्यकता आहे, अशी सर्वसमावेशक भूमिका या ऋषींची होती. आजकालच्या गोसावड्यांनी व कलियुगातील संतांनी मात्र साऱ्या समाजास निवृत्तीपर कर्मकांडी व जणू निर्बळ करण्याचा विडाच उचलला आहे. त्याचेच प्रतिबिंब म्हणून हे संत, बाबा, महाराज १८ महर्षींनी निर्माण केलेल्या महान वास्तुशास्त्राची निर्भर्त्सना करताना दिसून येतात.

भगवान श्रीकृष्णानेही भगवद्गीतेत 'माम् अनुस्मर युद्ध च' असे प्रवृत्तीपर केले आहे. अतिशय ज्ञान, विज्ञान, सहितं यज्ज्ञात्वा मोक्षसे शुभात्। असे ज्ञान व विज्ञानास समान महत्त्व दिले आहे.

ज्याला अग्नीचे तेज, मंगळाचा पराक्रम, चंद्राचे ओज, शुक्राची समृद्धी, रवीचे स्वत्व, शनीचा धीमेपणा व गुरुची विशालता हवी आहे त्यांना या महान वास्तुशास्त्राचा व १८ महर्षींचा अनुग्रह करणे आवश्यक आहे.

'अकालमृत्यु हरणम् सर्व व्याधी विनाशनम्' अशी शास्त्रांनी आम माणसास ग्वाही दिली आहे.

बालपणी आई वडिलांचा मृत्यू, तरुणपणी जोडीदाराचा मृत्यू व म्हातारणी तरुण कर्त्या मुलाचा मृत्यू याला 'अकालमृत्यू' म्हणतात. 'सर्व व्याधी' या शब्दात सर्व म्हणजे व्यक्तित्वाचा तीन स्तरांचा संदर्भ आहे. शारीरिक, मानसिक व आत्मिक अशा प्रकारे माणूस तीन भागास जोडलेला असून या तीनही पातळ्यांवर त्याला व्याधी होऊ शकतात. शास्त्रानुसार असणाऱ्या भावनात अलौकिक ऊर्जेचे एक वलय, एक कवच माणसांचे काळ, यम, मृत्यू व व्याधीपासून संरक्षण करतो.

ज्या घरात गुन्हेगार जन्माला येतात अशा घरात पंचमहाभूतांचा तीव्र आविष्कार दिसून येतो. अग्नीची ज्वाला आणि ज्योत अशी दोन रूपे आहेत. त्यातील ज्वालास्वरूप जेव्हा घरात प्रगटते तेव्हा अहंकारी, अन्यायी, वासनिक व जुलमी अशी मनाची धारणा होऊन माणूस कपटी, प्रदूषित, क्रूर व हिंसक होतो.

मन, चित्त, बुद्धी व अहंकार या चांराचे मिळून अंत:करण चतुष्टय तयार होत. यातील मन जलतत्त्वाचे, चित्त पृथ्वीतत्त्वाचे, बुद्धी वायुतत्त्वाची तर अहंकार अग्नितत्त्वाचा आहे. उत्तर ईशान्येत जलतत्त्व, पूर्व अग्नेयेत अग्नितत्त्व, दक्षिण नै:त्येत पृथ्वीतत्त्व तर पश्चिम वायव्येत वायुतत्त्व विराजते. अशा प्रकारे माणसाचे अंत:करण चतुष्ट्य आठ दिशांशी जोडलेले


आहे. भवनात ज्या दिशेत दोष असतो, त्याप्रमाणे त्याच्या व्यक्तित्वातील त्या पंचमहाभूताचा तोल जातो व माणूस बेताल होतो.

योगशास्त्र ही वास्तुशास्त्राची जननी आहे. वास्तुशास्त्रातील सर्व नियमांना योगशास्त्रातील तत्त्वांचा भक्कम आधार आहे. किंबहुना वास्तु, योग, ज्योतिष, संगीत व आयुर्वेद पाचही महाशास्त्रांची नावे जरी वेगळी असली तरी एकाच ऊर्जा जडत्व व पंचमहाभूतांवर या शास्त्रांची उभारणी झाली आहे. 'थोडक्यात नैसर्गिक ऊर्जाप्रवाहांना' संशुद्ध करणारे शास्त्र म्हणजे वास्तुशास्त्र असे म्हणता येईल. या ऊर्जांना पंचमहाभूतांचे बळ प्राप्त होण्यासाठी शास्त्रात 'रत्नाध्याय' दिला आहे. बाह्य संस्कारातील विक्षेप देवतांचा ऱ्हास करण्यासाठी धातू अध्याय व कीलकांचा उपयोग केला जातो. वास्तुपुरुष मंडळातील अंग व आवरण देवतांना पुष्टी देण्यासाठी भवनात उपपीठ रचना केली जाते.

योगशास्त्रानुसार वायव्य उत्तर ईशान्य दिशेवर चंद्रनाडीची सत्ता असून ही नाडी स्त्रीदर्शक आहे. त्यामुळे उत्तर प्रभागात जर घरात दोष असेल तर त्याचा परिणाम भवनातील स्त्रियांवर होतो. हा दोष हळूहळू वाढत जातो. योगशास्त्रानुसार दक्षिण, नैऋत्य, पश्चिम दिशांवर सूर्य किंवा पिंगला नाडीचा प्रभाव असून या नाडीचे वर्णन क्रूर आणि कठीण कर्मा असे केलेले आहे. या प्रभागातील दिशा दोषाचा परिणाम घरातील पुरुष वर्गावर होतो. हा परिणाम एखाद्या क्रूर श्वापदाप्रमाणे असल्यामुळे काही काळ जाताच झडप घातल्यासारखा अनुभव देतो. खून, आत्महत्या व अपघातात जेव्हा मृत्यू होतो. तेव्हा घरामध्ये याच दिशेमध्ये महादोष दिसून येतो.

निसर्गाचा भवनाशी आणि भवनाचा व्यक्तींशी संबंध आहे. नवीन पद्धतीच्या फ्लॅट संस्कृतीमध्ये जुने वास्तुशास्त्र वापरताना बऱ्याच प्रमाणात फसगत होते. ऊर्जा जडत्व, पंचमहाभूते, सौरपथ वातावरणशास्त्र, देवतानिधान यांचा सूक्ष्म अभ्यास न करता पोथी पंडित विद्वानांनी आजच्या काळात 'इलाज नको पण रोग चालेल'.


◆◆◆



With Best Compliments From

# M/s. Bhavani Corporation


## Prop. Jayesh



**C-402, Beach Classic Building, Chiku Wadi,
Borivali (W) Mumbai 400092**

# वास्तुशास्त्र म्हणजे काय?

**मुकेश भानूशाली**



सर्व ग्रहांप्रमाणे पृथ्वीच्या भोवतीसुद्धा विद्युत चुंबकीय ऊर्जेचे एक क्षेत्र आहे. वातावरणातील या ऊर्जेशी संपर्क आल्याळे होकायंत्रातील सुई उत्तर दिशेला स्थिर राहते. आपल्या मनावरती व शरीरावरती या ऊर्जेचा सतत परिणाम होत राहतो. मनुष्यप्राणी या ना त्या कारणाने कोणत्या ना कोणत्या वास्तूमध्ये वास्तव्य करून असतो. राहते घर, कार्यालयाचे ठिकाण, व्यवसायाची वास्तू, संस्था इ. अनेक वास्तूंमध्ये आपण वावरतो. वातावरणातील विद्युत चुंबकीय शक्ती आपल्या घरापर्यंत पोचत असताना भोवतालच्या वास्तूच्या माध्यमातून येते. अशावेळी वास्तू निसर्गाशी योग्य संतुलन साधणारी असल्यास मन, शरीर, विचार, कार्य, वर्तन सारेच सुयोग्य पद्धतीने पार पडते. मात्र तसे नसल्यास या गोष्टींमध्ये त्रास होतो. यासाठीच वास्तूची रचना कशी असावी हे सांगा रे शास्त्र म्हणजे वास्तुशास्त्र होय.


राहते घर किंवा व्यवसायाचे ठिकाण शास्त्रानुसार नसल्यास कोणत्या समस्या निर्माण होतात ?

वरील नियमाप्रमाणे मन, शरीर, विचार कार्य, वर्तन यावरती वास्तू परिणाम करते. जर वास्तूमध्ये दोष असेल तर त्याचा परिणाम यश, आरोग्य पैसा, प्रतिष्ठा, मन:शांती यावरही होतो. आरोग्य बिघडणे, वैद्यकीय उपाय करूनही त्याचा प्रभाव न पडणे, अपेक्षित यश न मिळणे, कष्ट वाया जाणे, त्यामुळे आर्थिक विवंचना, घरातील लोकांमध्ये संघर्ष आणि वादविवाद, आरोग्यामुळे संतती आणि वंशवृद्धीच्या समस्या घडणे अशा अनेक समस्या उद्‌भवतात.

दोषयुक्त वास्तू म्हणजे काय ?

वास्तुदोष कसा व का घडतो ?

वास्तुदोषाचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे रचना चुकल्याने घडणारे दोष व दुसरे म्हणजे चुकीच्या वर्तनामुळे, दूषित व्यक्तींच्या वास्तव्यामुळे घडलेले दोष. असे दोष असणाऱ्या वास्तूंना आपण दोषयुक्त वास्तू किंवा दोषयुक्त ठिकाणे म्हणतो. तामसी, घातक प्रवृत्ती असणाऱ्या व्यक्तींच्या वास्तव्यामुळे जशी वास्तू / जागा दूषित बनते त्याचप्रमाणे नैराश्य, आजार, अपयश, कर्ज, नास्तिकता, व्यसने, आत्मघातकी वृत्ती आशा मानसिक स्थितीमधून गेलेल्या व्यक्तींच्या वास्तव्यामुळेसुद्धा वास्तु दूषित बनते. एखाद्या वास्तूच्या भोवती समाधी, स्मशान, मंदिर, उकीरडा अशा तीव्र स्वरूपाची चांगली/वाईट ठिकाणे आल्या कारणांनी जागा वा वास्तू दोषात्मक बनतात.




कोणत्याही स्वरूपाचे वास्तुदोष समूळ दूर करता येतात. श्रद्धा व सबुरी मात्र हवी.

राहताना, बांधकाम करताना, बांधकाम तोडताना आणि वाढीव बांधकाम तसेच पुनर्नूतनीकरण करताना; असा वास्तूंविषयी काम करताना सावधपणे, जागरुकतेने व वास्तुशास्त्राचे नियम पाळून कामे करावी लागतात.

अशा जागांवर जाताच हे दोष दिसतात व जाणवतातही. काही सोपे उपाय आणि दैवी उपासनेद्वारे कार्यसिद्धी होते आणि दोषसुद्धा दूर होतात.

वास्तुशास्त्राचे नियम, घराची उत्तम रचना, मुहूर्त आणि ईश्वरी उपासना याआधारे हे काम यशस्वीपणे पार पडले व आज हे कुटुंब गेली चार वर्षे सुखाने वास्तव्य करीत आहे. त्यांच्या वास्तव्यातच नाही तर बांधकामातही कोणतीच अडचण न येता ते पूर्ण झाले. शास्त्राचे नियम योग्यपकारे पाळल्यामुळेच हे घडले.

आपल्याही भोवती अशा अनाकलनीय घटना घडत असतात. कधी स्वप्ने, पूर्वाभास तर कधी मनातील विचारांद्वारे आपल्याला हे जाणवतत असते. अतंर्मनाची शक्ती फार मोठी आहे. आपले अंतर्मन आपले हितचिंतक आहे. अशा गोष्टींकडे दुर्लक्ष न करता त्यांना समजून घ्या. जीवनाचा प्रवास अनेक गूढ गुपिते उलगडल्याने सोपा होतो.

वास्तुदोषावर उपाययोजना कशा कराव्यात ? व त्यामुळे किती दिवसात समस्या निवारण होते ?

वास्तुदोषावर उपाययोजना करण्यासाठी एकतर वास्तुतज्ज्ञाला आपल्या घरी निमंत्रित करणे उत्तम. ह्यावेळी तज्ज्ञ स्वत:च्या नजरेने आपल्या वास्तूचे परीक्षण करतो. होकायंत्राच्या सहाय्याने वास्तुतज्ज्ञ दिशा अचूक ठरवितो. कारण योग्य मार्गदर्शनासाठी दिशांइतकेच उपदिशांना आणि उप-उपदिशा यांनासुद्धा

तितकेच महत्त्व आहे. यानंतर तज्ज्ञ काही बदल व उपाय सुचवितो. याचा परिणाम एक ते सहा महिने या कालावधीच्या दरम्यान उत्तम प्रकारे दिसून येतो.

दुसरी पद्धत अशी की तज्ज्ञाकडे आपण स्वत: आपल्या वास्तूचा नकाशा व आतील रचना असलेला प्लॅन घेऊन यावा. यामध्ये सुद्धा दिशा अचूक ठरविणे आवश्यक असते. याचाही परिणाम एक ते सहा महिन्यांत उत्तम प्रकारे दिसून येतो.

**वास्तुशास्त्राच्या टीप्स :-**

१. दारातला कोहळा सतत खराब होत असेल तर वास्तुदोष आहे असे मानले जाते.

२. वास्तूमधील अंतर्गत रचना योग्य असल्यास वास्तुदोष सौम्य होतो.

३. स्वत:च्या वास्तूचे स्वप्न पूर्ण व्हायला हवे असेल तर गणेश मंदिरात किंवा शिवमंदिरात वास्तुप्रतिमेचे पूजन करा.

४. आपल्याला राहत्या वास्तूचे सौख्य किती आहे याचा अंदाज चतुर्थ स्थानावरून येतो. त्रासदायक महादशेमध्ये वास्तुसौख्याची फार अपेक्षा ठेवू नये.

५. पूर्वेला दोष घडल्यास घरातील आरोग्य व उत्साह नष्ट होऊन माणसे आजारी पडतात किंवा आळशी बनतात.

६. घराच्या भोवती किंवा फ्लॅटच्या बिल्डिंगभोवती कोठे रस्ता आहे याहून महत्त्वाचे आहे की त्या जागेचा उतार होय.


७. विहीर बुजवणे शक्य नसल्यास वास्तुशास्त्र अनेक पर्यायी उपाय देते.

८. ईशान्य दिशेला दोष घडल्यास राहणाऱ्या माणसांची विचारशक्ती, सद्सद्विवेकबुद्धी नष्ट होत जाते. मेंदूशी संबंधित मज्जारज्जू (स्पायनल कॉर्ड) संबंधित व्याधि निर्माण होतात.

९. घराच्या खिडक्या म्हणजे घराची ज्ञानेंद्रिये होय. ती नीट असल्यास घरात राहणाऱ्या माणसांचा विकास नीट होतो.

१०. घरामधील अनेक वास्तुदोषांवर नैसर्गिक सूर्यप्रकाश हा उत्तम उपाय आहे.

सगळयांनाच वास्तुशास्त्रप्रमाणे घर घेता येणे अथवा बांधणे शक्य नाही. असेही म्हटले जाते की जगातील कोणतेही घर अगदी १००% वास्तुशास्त्राप्रमाणे असू शकत नाही.



यातील ज्या उपदिशा आहेत त्या कमी महत्त्वाच्या नसून खूप खूप महत्त्वपूर्ण आहेत. आणि त्यांच्यावर पंचमहाभूतातील तत्त्वांचा प्रभाव असतो... आग्नेय या दिशेवर नावाप्रमाणे अग्नी तत्त्व, ईशान्येवर जलतत्त्व, वायव्येवर वायुतत्त्व आणि नैऋत्ये दिशेवर भूमितत्त्वाचा प्रभाव असतो... तुलनेने नैऋत्य ही जास्त संहारक आणि परिणाम देणारी दिशा आहे... अर्थात तिथे खोदकाम केले, बोअर, विहीर मारली तर...

स्वयंपाकाचा अग्नींशी संबंध असल्याने अर्थातच स्वयंपाकघर आग्नेय दिशेला असणे उत्तमच, नसल्यास किमान किचन ओटा तरी आग्नेयला असावा. गॅस शेगडी अग्नेयला तर सिंक ईशान्य दिशेला हवे... घराचा मधला भाग शक्यतो मोकळा ठेवावा. देवघर ईशान्य किंवा आग्नेय दिशेला असावे.

देवघरात घरातील जिवंत किंवा मृत व्यक्तींचे फोटो लावू नयेत. त्या आपल्याला प्रिय असल्या तरी त्यांच्या फोटोमधून वाईट स्पंदने येऊ शकतात आणि ती प्रगतीला, उपासना स्थळाला नक्कीच मारक असतात. देवघरात स्वामी समर्थ, साईबाबा, गजानन महाराज, शंकर महाराज, कलावती आई, सिद्धरूढ स्वामी या आणि अशाच इतर अनेक संत आणि सिद्धांचे मूळ, अस्सल फोटो अवश्य लावावेतच... त्यांच्या फोटोमधून येणाऱ्या लहरी अतिशय उपकारक असतात. घरात कोठेही काच, आरसे वापरात असाल तर जपून वापरा. कारण काच ही कोणतीही दिशा आणि वस्तू, वास्तू, चित्रे... काचेत प्रतिबिंबित होणाऱ्या प्रत्येक गोष्टीला गुणित करून दाखवते, वाढवून दाखवते आणि घर, वास्तू, दुकान मोठे असल्याचा भासही होतो... चुकीच्या ठिकाणी अयोग्य वापर झाल्यास वाईट गोष्टी, वस्तू प्रतिगुणीत होतील.

घरात सकाळ संध्याकाळ तेलाचा किंवा तुपाचा दिवा आणि अगरबत्ती लावणे खूप हितावह आहे. त्याचे आध्यात्मिक लाभ असतील ते असतील पण आपले मन मात्र प्रसन्न होते. आनंदाने भरून जाते. आणि देव नेहमीच प्रसन्न असतो. धूप, उदबत्ती लावून प्रसन्न करायचे असते ते आपल्या मनाला... आपल्या घराला... घरात मंगल ध्वनी, जपाची टेप ्सणे आनंददायी का होणार नाही? घरात, देवघरात, पायरीवर, उंबऱ्यावर आपल्याला जी येत असेल ती रांगोळी घालाच. ती घरामध्ये येणाऱ्या वाईट स्पंदनांना अटकाव तर करेलच पण रांगोळी हे एक शुभ्र यंत्रच असल्याने रांगोळी घालणारा आणि ती पाहणारा या दोघांच्याही मेंदूत पर्यायाने मनात सकारात्मक बदल घडवून आणून भविष्य सुधारण्यास थोडी का होईना नक्की मदत करेत यात शंकाच नाही.

स्वयंपाक करत असताना किंवा जेवण्यापूर्वी अग्नीत, चुलीत, गॅस शेगडीवर किंचित तूप लावलेला भात, पोळीचा, चपातीचा, भाकरीचा कशाचा तरी तुकडा असे काहीतरी थोडेसे समर्पित करा... अग्नी हा देवांचा दूत किंवा वाहक आहे. स्वयंपाक बनवीत असताना भगिनी, मातांनी दुसऱ्याची उणीदुणी काढणे, संतापाने भांड्याची आदळआपट करणे, नाराजीने स्वयंपाक बनवणे हे घरातील कोणालाही अजिबात हितकारक नाही. अन्नपूर्ण स्तोत्र म्हणत स्वयंपाक केला तर फारच उत्तम. येत नसल्यास देवाचे नामस्मरण करत स्वयंपाक बनवा.

## १. वास्तुशास्त्र आणि स्वयंपाकघर

वास्तुशास्त्र हे पारंपरिक शास्त्र आहे. या शास्त्राच्या आधारे घरं बांधली असता त्याचा घरातील उर्जेवर सकारात्मक परिणाम दिसून येतो आणि घरात एकूण शांतता आणि समृद्धी नांदते. घराच्या प्रत्येक कोपऱ्याचा विचार करून वास्तुशास्त्रात घराची उभारणी केली जाते. प्रत्येक दिशा आणि त्या दिशेद्वारे मिळणारी ऊर्जा लक्षात घेऊनच घराचा आराखडा बनवला जातो. कोणतीही दिशा वाईट नाही आणि वर्ज्यही नाही मात्र



प्रत्येक दिशेद्वारे मिळणाऱ्या ऊर्जा भिन्न असतात आणि त्यांचे परिणामही भिन्न असतात.

कोणत्याही भारतीय घरातला महत्त्वाचा आणि अविभाज्य घटक आहे... स्वयंपाकघर. वास्तुशास्त्रात स्वयंपाकघराच्या रचनेचा बराच बारकाईनं आणि स्वतंत्र्यपणे विचार केला आहे. 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' असं आपल्या पूर्वजांनीच म्हणून ठेवलेलं आहे. असं हे यज्ञकर्म जिथे रांधलं जातं, तिथली ऊर्जा सकारात्मक असली पाहिजे. ज्या ठिकाणी आनंदी वातावरण असतं त्या वातावरणातल्या प्रसन्न चित्त गृहिणीनं रांधलेलं अन्न मनाला शांतता आणि शरीराला पोषण देणारं असतं हे लक्षात घ्या. निम्म्या रोगांचं मूळ पोटात असतं असं म्हटलं जातं. याचा विचार करून स्वयंपाकघराची रचना करताना या गोष्टी लक्षात घेतल्या जातात किंवा जाव्यात.

- कधीही स्वयंपाकघराच्या वर स्वच्छतागृह असू नये त्याचप्रमाणे झोपण्याची आणि पूजेची खोलीही असू नये.
- कधीही घराच्या आग्नेय दिशेला स्वयंपाकघर असू नये कारण या दिशेचा स्वामी आहे अग्नी.
- स्वयंपाकघराचे दार पूर्वेला किंवा उत्तरेला तोंड करून असावं त्यामुळे आर्थिक तोटे होत नाहीत.
- स्वयंपाकघराला दार असेल तर ते उत्तरेला, वायव्य किंवा पूर्व दिशेला उघडणारं असावं.
- स्वयंपाकघरातली अन्न शिजवण्याची जागा नेहमी आग्नेय दिशेला असली पाहिजे कारण वर उल्लेखिल्याप्रमाणे या दिशेचा स्वामी अग्नी आहे.
- अग्नी आणि पाणी हे कधीच एकत्र नांदच नाहीत. त्यामुळे गॅस आणि पाण्याचा नळ एकत्र म्हणजे अगदी खेटून असू नये.
- घरातला फ्रिज स्वयंपाकघरात ठेवणार असाल तर तो वायव्य दिशेला ठेवला पाहिजे.
- वास्तुशास्त्राच्या सल्ल्यानुसार इलेक्ट्रिक/इलेक्ट्रॉनिक गोष्टी या नेहमी ईशान्य दिशेला असाव्यात.

- वास्तुशास्त्र असं सांगतं की, स्वयंपाकघरापाशी कधीही बाथरूम/संडासची समाईक भिंत असू नये.
- नेहमी जेवणाचं टेबल किंवा जेवणाची जागा वायव्य दिशेला असायला हवं.
- जेवणाऱ्याचं तोंड पूर्वेकडं किंवा उत्तरेकडे असायला हवं. यामुळे पचनसंस्था उत्तम कार्य करते.

**वास्तुशास्त्र आणि साज-सज्जा**

घराची साज सज्जा बाहेरील असो किंवा आतील, ती आमच्या बुद्धी, मन आणि शरीराला नक्कीच प्रभावित करते. घरातील वस्तू जप वास्तूप्रमाणे नसतील तर वास्तू आणि ग्रह राश्यांच्या विषमतेमुळे घरात क्लेश, अशांतीचा वास हतो. घराची बाहेरील साज सज्जा पाहुण्यांना आणि आतील साज सज्जा आमच्या मनाला प्रसन्नता देते. ज्याने सुख-शांती, सौम्यता प्राप्त होते.

भवन बनवताना भवनच्या आतील खोल्यांचे उतार उत्तर दिशेकडे नसावे. असे असल्यास गृह स्वामी नेहमी ऋणी राहतो. ईशान्य कोपऱ्याकडे नाळी नसावी, याने खर्चात वाढ होते.

शौचालयाचे निर्माण ईशान्य कोपऱ्यात नसावे. याने सदैव दरिद्रता लागलेली असते. शौचालयाचा निर्माण वायव्य दिशेत असेल तर चांगले.

**वास्तुशास्त्र - उपाय सर्वांसाठी**

सकारात्मक ऊर्जेशी नातं जोडणं, अदृश्य-दृश्य ऊर्जेच्या पलीकडच्या सूक्ष्म-अतिसूक्ष्म प्राणशक्तीचा वरदहस्त मिळवणं आणि पंचमहाभूतांच्या मदतीने प्रारब्ध संचित क्रियामानावर 'धियोयोन: प्रचोदयात' या विजिगीषु वृत्तीने मात करणं म्हणजे वास्तुशास्त्र होय.

प्रत्येक घरातला कर्ता पुरुष आणि स्त्री, मग ते मध्यमवर्गीय असो वा वयस्कर, सगळ्यांना वेगवेगळ्या ऊर्जेची गरज असते. या गरजेचा पंचमहाभूतांनुसार विचार करून तसंच घराच्या दिशेचा योग्य तो उपयोग करून घराची आखणी करणं म्हणजेच वास्तुशास्त्र.

प्रत्येक व्यक्तीच्या गरजा, महत्त्वाकांक्षा, स्वप्नं आणि आशा – आकांक्षांना निसर्गात असलेल्या अपार ऊर्जेचा या शास्त्राचा आधार घेऊन आधार प्राप्त होऊ शकतो. म्हणूनच आयुर्वेदाने कायाकल्प, योगशास्त्राने मानकल्प आणि वास्तुशास्त्राने भाग्यकल्प होतो असं शास्त्रांमध्ये नमूद आहे.

वृक्षवल्ली, स्फटिक, पिरॅमिड, धातू, आरसे, यंत्रं, तंत्र, रत्न, रंग ही माध्यमं वापरून व्यक्तीच्या नक्षत्रानुसार किंवा राशीनुसार योजून, त्या व्यक्तीच्या भाग्यकल्पाचा उगम होऊ शकतो.

शरीराच्या कणाकणात खेळणारी चैतन्यशक्ती एका बिंदूत केंद्रित करणं आणि केंद्रित शक्तीचं इष्ट तशा प्रकारत रूपांतर करणं म्हणजेच 'योग' सर्वशरीषु चैतन्येकता ध्यानम्। चैतन्यशक्तीचं शरीरातलं स्थूलरूप म्हणजेच प्राणशक्ती. व्यक्तींच्या शरीरांतर्गत वसणाऱ्या अंत:करणात असलेल्या पोकळ्या योगशास्त्राच्या प्रवाही प्राणशक्तीने भारल्या जातात. प्रत्येक व्यक्तीचा पूर्व संस्कारमय संबंध ज्योतिषशास्त्राधारे स्पष्ट करता येऊ

होतो, पण भाग्यकल्पाची सूत्रं वास्तुशास्त्रात सामावलेली आहेत. तेव्हा घरात कुठलेही बदल करताना ग्रहांची गती साधली गेली तरच पूर्ण भाग्यकल्पाचं फळ पदरात पडू शकेल. वास्तूमध्ये अष्टदिशांचा संबंध नवग्रहांशी आहे. नवग्रहांचा संबंध व्यक्तीच्या सुखदु:खाशी जोडलेला आहे. वास्तू, ज्योतिष, संगीत, आयुर्वेद आणि योग या पाचही शास्त्रांचा वापर करून आपलं जीवन सुखी बनवता येऊ शकतं.

ज्याप्रमाणे माती, पाणी, उजेड, वारा हे सगळं मिळून झाड फुलतं त्याचप्रमाणे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश मिळून प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावानुसार त्याचं भाग्य उदयास आणतं.

विद्यार्थ्यांसाठी – रोज सकाळी ६ वाजता उठून पूर्वाभिमुख बसून ३ मिनिटं भस्तिका करावी. त्यानंतर अकरा वेळा ओंकाराचा मोठ्या आवाजात स्वर लांबवून उच्चार करावा. अभ्यासाला उत्तराभिमुख अथवा पूर्वाभिमुख बसावं. विशेषत: दिवसा पूर्व दिशेला तोंड करून आणि सूर्योदयाअगोदर किंवा सूर्यास्तानंतर उत्तरेकडे तोंड करून बसावं. या एकत्रित उपायांनी प्रभावशाली गुण येऊ शकतो.

उपवर तरुणींसाठी – रोज सकाळी २१ उज्जयी श्वास वा मुद्रांचा प्राणायाम घराच्या वायव्य भागात करावा. त्याने ऋतुचक्र नियमित होण्यास आणि त्वचेस तजेलदारपणा प्राप्त होण्यात मदत होते. ज्याचं किचन घरात वायव्य दिशेला आहे त्यांनी ते आग्नेय दिशेला स्थलांतरित करावं. घराच्या वायव्य कोपऱ्यात १० ग्रॅमचं चांदींच नाणं अथवा स्वस्तिक सोमवारी (शुक्ल पक्षाच्या) पुरावं. वायव्य भागात डोकं पूर्वेला करून झोपण्याची व्यवस्था करावी. पश्चिमेला खिडकी असल्यास सहा धातूंच्या नळ्यांचा चाईम लावावा. विवाहासाठी गुरुबळ महत्त्वाचं असल्याने गुरुवारी सकाळी गाईला हरभऱ्याची डाळ भिजवून गुळात कालवून चारावी. पलंगावर हलक्या निळ्या किंवा सफेद रंगाची चादर वापरावी.

महिलांसाठी – ज्योतिषशास्त्रानुसार चतुर्थ स्थान हे कर्त्या स्त्रीचं, मातृत्वाचं दर्शवतो. त्याचप्रमाणे चतुर्थस्थान उत्तर दिशेचं दायित्वही दर्शवतो. कालपुरुषाच्या कुंडलीनुसार कर्क राशीचा संबंध जलतत्त्वाशी असल्यामुळे आणि ती चतुर्थ स्थानाशी संबंधित असल्यामुळे वास्तुशास्त्रात उत्तर दिशा ही स्त्रीचं द्योतक आहे. योगशास्त्रानुसार चंद्रनाडीचा संबंधदेखील उत्तरेशी असल्यामुळे महिलांनी तणावमुक्तीसाठी आणि नोरगी राहण्यासाठी ध्यान, विपश्यना, सोहम साधनासारख्या ध्यानाचे प्रकार करावेत. निसर्गाच्या स्वाभाविक स्पंदनाशी केलेल्या ध्यानाचे प्रकार एकरूप होऊन त्यांच्या पन्नास टक्के समस्या संपण्यात मदत होईल. आत्मस्मरण म्हणजे ध्यान. ध्यान म्हणजे अंत:करणाचं स्नानं. अंतर्गत चैतन्याची अनुभूती म्हणजे ध्यान. ध्यान म्हणजे पूर्ण मौन, विचारांची शून्यता. अक्रिया म्हणजे ध्यान.

स्वयंपाक घर आग्नेय दिशेला असावं आणि ओटा पूर्वाभिमुख असावा. पूर्वेला मोठी खिडकी असल्यास संपूर्ण किचनची शुद्धी प्राणिक प्रवाहांनी होईल. दक्षिणेला खिडकी असल्यास तिथे तांब्याची थाळी ठेवावी. किचनमध्ये लाल रंगाचा वापर बिल्कुल करू नये. लाल रंगाची फरशी अथवा ग्रेनाईट वापरू

नये. स्वच्छ पाण्याची व्यवस्था ईशान्येला करावी. गॅस शेगडी मध्यपूर्व भागात असावी. जड कपाटं, फ्रीज पश्चिम-दक्षिण भागात असावी. ओव्हन मायक्रोवेव्ह आग्नेयला असावं. मसाल्याचे पदार्थ, लोणची वगैरे आग्नेय प्रभागात ठेवावे. सॉस, जाम, च्यवनप्राश आणि औषधं, फळं यांची योजना ईशान्य - पूर्व भागात करावी. बेडरूम दक्षिण नैऋत्य प्रभागात असावी. दक्षिणेकडे अथवा पूर्वेकडे डोकं ठेवण्याची पलंगाची रचना असावी.

पुरुषांसाठी - ज्योतिषशास्त्रानुसार दशमस्थान हे कर्त्या पुरुषाचं, पितृत्वाचं आणि कर्माचं स्थान आहे. योगशास्त्रात पराक्रमाचं दायित्व असणारी सूर्यनाडी दक्षिण दिशेशी संबंधित असते. वास्तुशास्त्रामध्ये कर्त्या पुरुषाची बेडरूम दक्षिण - पश्चिम या प्रभागातच असावी. दक्षिण नैऋत्य प्रभागात दोष असल्यास उदा. ही दिशा कट झाल्यास किंवा इथे शौचालय असल्यास याचा विपरित परिणाम कर्त्या पुरुषावर होत असल्याने काळजी घेणं आवश्यक आहे. त्यासाठी त्याने रुद्राक्षाचा वापर वास्तुतज्ज्ञाच्या सल्ल्याने करावा. दक्षिण / पश्चिम भागात सर्व जड वस्तू ठेवाव्यात. दक्षिण दिशेत दोष असले तर पूर्वेला डोकं करून झोपावं. कर्त्या पुरुषांसाठी सूर्योपासना सर्वश्रेष्ठ असून गायत्री मंत्राचा रोज सकाळी १० वेळा जप करावा. सूर्यनमस्कार घालावेत. दक्षिण दूषित वास्तू असल्यास च्यवनप्राश नियमित घ्यावं. याने शरीर निरोगी राहील आणि दक्षिण दिशा दूषिताचा परिणाम शरीरावर होणार नाही. रात्री तांब्यामध्ये पाणी भरून सकाळी ते अनोशापोटी घ्यावं. योगासनं रोज करावीत.

वृद्धांसाठी -ईशान्य उत्तर पूर्व प्रभाग हे जैविक ऊर्जा आणि प्राणिक ऊर्जेचं उगमस्थान आहे. त्यामुळे वृद्ध व्यक्तींची बेडरूम या प्रभागातच ठेवावी. या भागात ऊर्जेचं संस्करण, सहज आणि नियमित होत असल्याने त्यांच्या औषधांसाठी आणि आरोग्यासाठी या दिशा फलदायी ठरतात. वृद्धांनी प्राणायाम करावा. नियमित नैसर्गिक आहार घ्यावा. या ठिकाणी पांढरा दिवा असलेल्या मंदिराची योजना करावीच. पूर्वेला डोकं करून झोपावं. सकाळी १० मिनिटं आणि संध्याकाळी १० मिनिटं ध्यान करावं. अग्निहोम केल्यास उत्तम.

घर खरेदी करण्यापूर्वी किंवा बांधण्यापूर्वी वास्तुशास्त्राचे काही नियम लक्षात घेणे आवश्यक आहे. वास्तूत काही दोष राहिल्यास आपल्यामागे आयुष्यभरासाठी संकटाची मालिका लागू शकते. जीवनात वारंवार येणाऱ्या अडचणी प्रगतीला बाधक ठरतात. घरातील सुख-शांती हिरावून घेतात. म्हणूनच घर, दुकान किंवा कार्यालय बांधण्यापूर्वी काही बाबी लक्षात घेणे महत्त्वाचे आहेत.

- घराच्या बैठक खोलीत खरकटी भांडी ठेवल्याने घरातील प्रमुख महिलेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असतो. कुटुंबातील सदस्यांचे आपसात जमत नाही.
- बैठकीच्या खोलीत पाण्याने भरलेली वस्तू ठेवू नये.
- बैठकीच्या खोलीत वैयक्तिक किंवा मित्रांसोबत व्यसन करणे प्रगतीला बाधा उत्पन्न करू शकते.

- घरातील जिन्याखाली बसून कोणतेच चांगले काम करू नका.
- घराच्या प्रवेशद्वारासमोर कोणत्याच प्रकारचा अडथळा ठेवू नका.
- प्रवेशद्वाराच्या दिशेने पाय करून रात्री झोपू नका. तस केल्याने लक्ष्मीचा अपमान होत असतो.
- न्यायालयाची फाइल देवघरात ठेवल्याने दावा आपल्या बाजूने लागण्यास मदत होते.
- स्वर्गवासी स्वजनांचे फोटो नेहमी दक्षिण दिशेला लावले पाहिजेत. घरातील घड्याळे कधी बंद पडणार नाहीत, याची काळजी घ्यावी. कारण घरात बंद घड्याळे घराची घडी विस्कळीत करतात.
- घरातील पलंग कधीच भिंतीला खेटून ठेवू नका. तसे केल्यास पत्नी-पतीमध्ये दरी निर्माण होते.
- तीन रस्त्यांवर घर असणे अशुभ असते. अशा घरातील दोष दूर करण्यासाठी घराच्या चारही भिंतीला आरसा लावावा.
- घरात एखादा सदस्य नेहमी आजारी पडत असेल तर त्याला घराच्या नैऋत्य कोपऱ्यात झोपवले पाहिजे. ईशान्य कोपऱ्यात पाणी ठेवल्याने अधिक लाभ होतो.
- घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर काळ्या घोड्याच्या पायाची नाल, दुर्गा यंत्र, त्रिशक्ती, आत बाहेर श्री गणपतीची प्रतिमा दक्षिणमुखी द्वार असेल तर हनुमानाची प्रतिमा किंवा भैरव यंत्र लावल्याने घरातील दोष दूर होतात.
- औषधे नेहमी ईशान्य कोपऱ्यात ठेवली पाहिजे. औषधे घेतानाही तोंड ईशान्य दिशेनेच पाहिजे. असे केल्याने औषधांचा प्रभाव तत्काळ जाणवतो.

◆◆◆


With Best Compliments from

WOOD MALL

Furniture ideas from the world

Opp. Raheja Gardens, Near Tip Top Plaza, L. B. S. Marg,
Thane (W), Tel.: 25838811 / 22. Fax : 25838833.
Website www.woodmall.in Email:info@woodmall.in

*With Best Compliments From*

# Mahendra Realtors & Infrastructure


## Prop. Bhavesh



# मुकी घरं

**भाग्यश्री ऐगळीकर**

घन:श्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला ऽऽ........



या गोड भूपाळीने जाग यायची. पहाटे तांबडे फुटले आणि सूर्य मावळला की चिमण्यांचा किलबिलाट ऐकायला यायचा. चिमण्यांच्या किलबिलाटामुळे जशी जाग यायची तशीच याच आवाजाने सांज झाल्याचे ही समजायचे! या कातरवेळेपर्यंत घरी येणारा माणूस आला नाही तर जिवाला हुरहुर लागायची. ''किरकिरती रातकिडे झाल्या तिन्हीसांजा, अजून कसा येईना, परधाना राजा''अशी काळजी वाटण्याची वेळ! पशू-पक्षी, माणसं यांची तिन्हीसांज ही वेळ जरी परतण्याचीच! प्रत्येकाला एक घर असतं ते संध्याकाळी परतण्यासाठीच! घर म्हणजे एका ओढीने येण्याचे ठिकाण!

घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती,
तिथे असावा प्रेम जिव्हाळा नकोत नुसती नाती।

माणसांचं घर काय अन् पक्ष्याचं घरटं काय, दोन्ही ही आसराच देतात. प्रत्येकाच्या जगण्याचा आधार म्हणजे घर! प्रत्येकाच्या जीवनाचा केंद्रबिंदू म्हणजे घर! जिथे अनेक वाटा एकत्र येतात आणि जिथं आपली पावलं आपो आप वळतात, थांबतात ते ठिकाण म्हणजे घर! व्यक्ती तितक्या प्रकृतीचं विराट दर्शन घडविणारं आणि आनंदाच्या महासागराचा अनुभव देणारे ठिकाण म्हणजे आपल्यापुरते ते एक नंदनवनच असते!

मानवी जीवनात प्रेम, जिव्हाळा, आपुलकी या नात्यांच्या कल्पकतेत बांधलेले घर हे एक सुख-शांतीचे प्रतीक असून जिव्हाळ्याच्या नात्यांनी हवं-हवंसं वाटणारं एक स्थान आहे. मनुष्य संसाराच्या भाराने दमतो, वृध्दापकाळाने शिणतो, आजारपणाने उबगतो आणि रोजच्या धावपळीने थकतो. हा सर्व क्षीण हरण करण्याचे कौशल्य या घरात असते. हक्काच्या विश्रांतीचे आणि सुखाचे ठिकाण म्हणजे घर! म्हणूनच मनुष्य पाय ओढतओढत घरी येतो.

घरातील स्त्री ही गृहलक्ष्मी, गृहदेवता असते, घराची सुखशांती ही तिच्यावर अवलंबून असते. 'अतिथि देवो भव' असा सर्व नात्यांचा आदर राखणारी, मुलांवर संस्कार करून घराचं (घराण्याचं) नाव उज्ज्वल करणारी, घराचं घरपण आणि अस्तित्व टिकविणारी ही देवता म्हणजे घराचा आधारस्तंभ असते. म्हणून घरात स्त्रीचं स्थान मोठं आहे. महत्त्वाचं आहे, स्त्री घराचे नंदनवन बनवते.

ऊन, वारा, पाऊस यांपासून संरक्षण करणारे, आपल्या कुटुंबाशी जवळीक राखणारे, सर्वांचे सुख-दुःख साचेबंद ठेवणारे आणि सर्वांना एकत्र आणण्याचे काम करते ते घर! या घराचा उंबरठा हा घराची लक्षमणरेषा असतो, म्हणून घरातील कोणतीही गोष्ट उंबरठ्याच्या बाहेर पडून चव्हाट्यावर येणार नाही याची प्रत्येकजण काळजी घेत असतो. मनुष्य घरातील नात्यांच्या रंगात रंगतो तो आपले जीवन सप्तरंगी बनवत असतो. त्यामुळे जीवनात आनंदीआनंद असतो. 'जीवनात ही घडी अशीच राहू दे ऽऽ'। असे वाटत असते.

उष:काली सडा-रांगोळीने सजविलेले आणि आतुरतेने वाट पाहणारे अंगण, अंगणात प्रत्येकाचे स्वागत करणारे तुळशी वृंदावन, आणि शुभंकरोतीच्या लयात भारावून गेलेली वास्तू! प्रत्येक सण-वार, रितीरिवाज, रूढी-परंपरा, प्रेमजिव्हाळा अखंडित राखणारे आणि सुखसमृध्दीचा ठेवा असणारे, समाधान शांतीचे छत्र असलेलं घर की जिथे तृषार्थाची तृष्णा, भुकेल्याची भूक जागली जाते आणि भागलीही जाते.



तिथे साधे पाणीसुध्दा अमृततुल्य लागते तिथे लक्ष्मी नांदते; जिथे नात्यांचा मान आणि मोठ्यांचा आदर राखला जातो, सुख-दुःखात एकमेकांना साथ दिली जाणारी आणि आपले अस्तित्व सतत आबाद राखणारी माणसं असतात तेथे समाधान सदैव वास करत असते. अशाच ठिकाणी, 'भगवान देता है तो छप्पर फाडके।' असे कुटुंबाचा साक्षीदार असणारे, सर्वांना हवंहवंस वाटणारे, मजबूत असलेली वास्तू नसून ती तनामनानी, प्रेम-आपुलकीच्या नात्यांनी घट्ट बांधलेली वास्तू असते. ती निर्जीव असून ही सजिवांना जीवन देते!

गरीब- श्रीमंत, मध्यम सर्वच मंडळी या घराच्या प्रेमाने त्याचे भोक्ते बनले आहेत. माणसाचे स्वतः इतकेच प्रेम घरावरही असते.

'असावे घरटे आपुले छान'

असं सर्वांनाच वाटत असतं. पिढ्यानं-पिढ्या आपल्या वास्तुत संततीचा वंशवेल वाढवून, प्रेमळरूपी जिव्हाळ्याचे फळ देण्याचे कार्य ही हे घरच करते. आढे, भिंती, जीर्ण झाल्या तरी उद्याच्या पिढीची मोठ्या आशेने ते वाट पाहत उभे असते.

सिमेंट, वाळू, विटा या मिश्रणातून उंच-उंच बांधलेला घरौंदा या मानवी जिव्हाळ्यानेच सजीव होतो. इमारत बनवायला वेळ लागत नाही. पण घर बनायला वेळ लागतो. आशाआकांक्षांनी बनलेल्या या घराला सत्यात उतरण्यासाठी प्रत्येकजण जिवाची पराकाष्ठा करतो. देवदेवता, देव्हाऱ्यापासून ते मानवी नात्यांची रेलचेल करून, संस्कार-संस्कृती जपणारे एक मंदिर बनवितो आणि या मंदिराचा पुजारी तो स्वत:च असतो.

चांदोमामा, चांदोमामा भागलास कां?
लिंबोणीच्या झाडामागे लपलास कां?
लिंबोणींच झाड करवंदी,
मामाचा वाडा चिरेबंदी.....।

चिरेबंदी हे नाव उच्चारल्यावरसुध्दा स्वर्गसुखाचा आनंद होतो. खरोखरच सुखाचा ठेवा म्हणजे चिरेबंदी वाडा आणि चिरेबंदी वाडा म्हणजे श्रीमंती थाट याचं अनोखं दर्शन असतं यात!

चिरेबंदी म्हणजे एक मोठा टोलेजंग वाडा राहतो डोळ्यासमोर, बाहेरील रस्त्यावरून चिरेबंदी वाड्याच्या असणाऱ्या चार-पाच पायऱ्या चढताना आपलीच मान ताठ होते आणि मानेलाच जणू मान येतो!

घराची कळा जसं अंगण सांगतं ना, तसं चिरेबंदी वाड्याचं देखणं रूप आपल्याला पायरीवरच कळतं! घडविलेल्या दगडांच्या आकृतिबध्द पायऱ्या चढल्यावर प्रथम भेट होते ती चौकटीची! घडविलेल्या दगडांची भली मोठी रूंद आणि उंच चौकट, पाय उचलून टाकावा लागणारा उंच उंबरठा, त्याच्या मानानीच दोन दारे जणूं राजवाड्यातील आठवण करून देत असत. दरवाज्यावर चौकोनी आकृतीत असलेले गंधवत आणि त्यावर चिरण्याच्या आकारात असलेल्या पितळी फिरक्या, मध्ये एक भलं मोठं पितळेचं कडं आणि एक दणकट दिंडी दरवाजा की जो प्रत्येक व्यक्तीला वाकूनच प्रवेश करावा लागतो. इथेच नम्रतेचे दर्शन घडते.

या भल्या मोठ्या दरवाज्याच्या मागे एक अडसर असतो की जो बाहेरून कोणी काढू शकत नाही. उंबऱ्याच्या आत पाऊल टाकले की दोन्ही बाजूला ओसरी, कठडा दिसतो आणि जेवढ्या पायऱ्या बाहेरून



चढतो तेवढ्याच पायऱ्या आत उतरल्यानंतर लागते ते दगडवजा फरशीचे अंगण! (Open to sky) अंगणात प्रत्येकाचे स्वागत करणारे तुळशी वृंदावन, तिथूनच पुन्हा पायऱ्या चढल्यावर दिसते ती चौसोपी इमारत. भला लांबच्या लांब आणि रूंद असा सोपा, त्यात नांदणारं गोकुळ, मुलांचा गोंगाट, गाणी, हास्य, विनोदाने रंगलेल्या गप्पा. एकत्र कुटुंब पध्दतीचे हे विलोभनीय दृश्य! चौसोप्यात एका बाजूला हलकडीचा झोपाळा कुरकुरत आपलं अस्तित्व दाखवत असतो. झोपाळ्याच्या चारी बाजूंना कोपऱ्यावर पितळी फिरक्या आणि लोखंडी सळ्यांच्या आधाराने लाकडी झोपाळा दिवसभर कुई-कुई करत मुलांना रिझवत असतो, तर त्याच्या विरूध्द बाजूला तक्या, लोड, पानांचा डबा, पाण्याचे तांब्या-भांडे यांनी सजलेली भारतीय बैठक येणाऱ्यांना विसावा घेण्यासाठी असे. या चौसोपीच्या सभोवार ज्या खोल्या असतात त्यात स्वयंपाक घर, न्हाणी घर, देवघर, माजघर, शयनघर आणि कोठडी घर (स्टोअर रूम) असते. याशिवाय कोणी आले - गेले तर एक खोली, आजारपण, बाळंतपण अशांसाठी जादा खोल्या असतात की त्यामुळे कुणाला कोणाचा अडथळा होत नसे. इतक्या खोल्या असून ही इमारत बाहेरून चौरस, आकृतिबध्द आणि सुबक, सुडौल दिसते.घडविलेले दगड, चुना, वाळूत बसविल्याने दोन दगडांमधील चीरही दिसत नसे. ती पूर्णपणे बंद होते म्हणूनच चिरेबंदी वाडा होय! या वाड्याच्या भिंती जाड असून इमारत उंच असे. बाजेरील भिंतींना खिडक्या नसतात. त्यामुळे उष्णता वाढत नसे आणि अंगणातील हवा खेळती असल्याने वाडा थंडगार राहत असे की तिथे ना पंख्यांची गरज भासे ना फ्रीजची! चिरेबंदी वाडा म्हणजे एक एअरकंडिशनचा नमुना असे आणि श्रीमंतीही असे. पण आज याचा आस्वाद अनुभवायला मिळणे तर लांबच पण चिरेबंदी हा शब्दसुध्दा शब्दकोशातच वाचावा लागेल की, 'चिरेबंदी ओट्यावर' असे काव्यपंक्तीतच कोण जाणे!

खेडेगावात बोटावर मोजता येतील एवढेच जुने वाडे शिल्लक राहिले आहेत. काही जुने वाडे जमीनदोस्त झाले आहेत तर काही ओस पडते आहेत. काहीना पडझडीमुळे अवकळा आली आहे. तर कांहीना वाडा म्हणण्याइतपतही अवस्था राहिली नाही. प्रचंड वाड्यांची डागडुजी करणेही अशक्य झाले आहे. त्यामुळेच साऱ्या घरांना आता घरघर लागली आहे.

पूर्वी गावच्या प्रमुखाचा वाडा मोठा असायचा. आता वाड्यांची संख्या नगण्य आहे. वाड्यांचे बांधकाम भक्कम असल्याने, दिमाखात उभे असल्याने गावच्या सौंदर्यात हे वाडे भर टाकत असत. हे वाडे पांढऱ्या मातीने, दगड-चुन्यांनी, घडीव दगडांनी बांधलेले असायचे. माणूस सहज झोपेल एवढी भिंतीची जाडी असायची तर छत माळवद करल असल्याने त्याला भक्कमपणा यायचा. अशा वाड्यांची आखणी सुबक पध्दतीने असे. या भव्य बांधकामासाठी उत्तम दर्जाच्या लाकडाचा प्रचंड प्रमाणात वापर केला जात असे. वाड्याचा दरवाजा त्याला कड्याकोयंडे मजबूत असून अंगणाच्या शेजारी जनावरांसाठी गोठा आणि त्याला लागूनच परस असे. या वाड्यांचा सर्वच ऋतूंत चांगला

उपयोग/फायदा होत असे.


गावप्रमुखाचे राहणीमान उच्च म्हणून त्याच पध्दतीने त्यांचे वाडे ही प्रचंड असायचे, वाडा म्हणजे गावचे वैभव असे, सौंदर्य असे. गावातील प्रत्येक वाडा पाटील, जोशी, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे असे त्याच्या नावानिशी ओळखला जायचा. पण आज घराचा पत्ता शोधायला भला मोठा पत्ता लागतो. आनंदी निवास, तिसरा मजला, रूम नं.१२, टिळक रोड, पंचमुखी मारूतीजवळ, हॉटेल अन्नपूर्णासमोर, कचराकुंडीलगत, विद्यानगर, नंतर गावाचे नाव .....! मनुष्य आपल्या आयुष्यात कुठे-कुठे निवारा शोधत जातो. आपण कुठे राहतो हे ओळखण्यासाठी किती खुणा! किती संदर्भ असे भरगच्च पत्ते पाहिल्यावर प्रश्न पडतो की यांच्याकडे जायचं का? पत्त्यासाठी शाळा, दवाखाना, ऑफिस, देऊळ, एखादे मैदान, उद्यान ठीक आहे हे! पण काय कचराकुंडी? ही काय पत्त्यासाठी खूण आहे? म्हणजे कचराकुंडी जेवढी प्रसिध्द आहे तेवढेही आपले अस्तित्व नसावं? उद्या नगरपालिकेने कचराकुंडी काढूनच टाकली तर? आपल्या अस्तित्वांच काय? कित्येक वर्ष एका गल्लीत राहूनही त्या गल्लीत ओळख नसावी असा अजब नमुना आणखी कोणता असू शकतो?

आपल्या घराची ओळख सांगताना ग. दि. माडगूळकर म्हणतात,

''चौकटीवर बाल गणपती,
चौसोपी खण स्वागत करती,
झोपाळ्यावर अभंग गाती,
सवे लागती कड्या कुरकुरत''

ही ओळख आणि हाच खरा पत्ता! पण आज परिस्थिती बदलली आहे. अनेक मालकांनी वाडे पाहून बंगले बांधले ठीक आहे! गाव सुसंस्कृत दिसेल. पण गावच्या वैभवात भर टाकणारे वाडे कुठे आहेत? वाडे नाहीसे झाले त्याचे काय?

शहरी भागातही पूर्वी वाडे होते. वाड्यातील



खोल्या भाड्याने दिल्या जायच्या! घरमालक भाडेकरू असं नातं असूनसुध्दा एकत्र कुटुंब असं वातावरण असायचं! खऱ्या अर्थाने तेच अपार्टमेंट होते. ज्याचे विभाग असून ही अपार्टमेंट अशी रचनाबध्द वाडा संस्कृती असायची. वाड्यातील प्रत्येक व्यक्ती एकमेकांच्या सुख-दु:खात सामील व्हायची. वाड्यात

कुणाच्याही घरी लग्न, मुंज, जावळ, बारसं, डोहाळजेवण, दिवाळी काहीही असले तरी पूर्ण वाडा आनंदाने न्हाऊन निघायचा! कुणाच्याही घरचा पाहुणासुध्दा पूर्ण वाड्याचा पाहुणचार घेत असे. कुणाच्याही घरी आजारपण, संकट आले तरी सर्वजणच एकमेकांना साथ देत असत. एखादी व्यक्ती निधन पावली तर साऱ्या वाड्याला सुतक आल्यासारखे वाटायचे. उन्हाळी कामे सांडगे, पापड, शेवया, कुरडयासारखे एकत्र येऊन वार- वेळ ठरवून करत असत. सायंकाळी गप्पा मारण्याचे ठिकाण म्हणजे अंगण! एकत्र कुटुंब पध्दतीचं खेळीमेळीच्या वातावरणाचे अनोखे दर्शन घडवणारी अशी वाडा संस्कृती होती.

आज चौसोपी वाड्यांची जागा आता अपार्टमेंटनी घेतली आहे. एकत्र कुटुंबपध्दतीचे गोकुळ जाऊन, विभक्त एकच मूल प्रत्येक घरात नांदत आहे. मुलांच्या गोंगाटाची जागा स्मशानशांततेने घेतली आहे. जीवघेणी स्पर्धा, अभ्यासाचं ओझं यात मुलांचं बालपण पार हरवून गेलंय! त्यातच दूरदर्शनचे आक्रमण! त्यामूले अभ्यासाव्यतिरिक्त जो मुलांना गोंधळ घालायला मिळायचा तो. ही वेळ दूरदर्शनने काबीज केलीय. अपार्टमेंटपध्दतीमुळे मैदाने संपुष्टात आली आहेत. त्यामुळे मुलांचे मैदानी खेळ कमी झाल्यामुळे, टी.व्ही. मध्ये गुरफटून बसली. विभक्तपध्दतीच्या संकल्पनेमुळे हास्य, विनोद, गाणी, गप्पा यांना फाटाच मिळाला आहे. जागेअभावी वृध्दांना वृध्दाश्रमाची वाट दाखवली गेली तर अगदी लहान मुलांनी पाळणाघराचा आसरा घेतला. त्यामुळे प्रत्येक घरात इन मीन तीनच माणसं! काय करणार? गंभीर विषय, परिस्थितीचा ताण, महागाईचा बकासुर, त्यातच दोघांचीही नोकरी. दमलेले, थकलेले, असल्या अवसानाने कसा तरी दिनक्रम रेटायचा असे दृश्य असताना, कुठून येणार सुसंवाद? कोणत्या विषयावर करायची चर्चा? कोणत्या विषयावर मारायच्या गप्पा? विनोदाचा तर थांगपत्ताच नसतो, अर्थहीन गाणी ऐकण्याचा मूड नसतो. पण हास्य ही मावळलेले असते. म्हणूनच तर नकली हास्यक्लब उद्याला आले.


एकत्र कुटुंबपध्दतीतील सासू-सासरे, दीर-जावा, नणंदा वगैरे अशा नात्यांच्या माणसांनी भरलेलं घर आज दृष्टीस पडणे ही कौतुकाची बाब आहे. तीन-चार माणसांनी भरलेली फ्लॅट संस्कृतीतली ही घरे बंद दाराच्या आत मुकी होत चालली आहेत. वेळेअभावी या घरातील हसणं खिदळणं पार मावळून गेलंय! काळाच्या ओघात ही घरं घुसमटून गेली आहेत. हसऱ्या गोकुळाची जागा आता मुक्या घरांनी घेतली आहे.

चौसोपी वाडा, चिरेबंदी वाडा, ही सारी घरे लयाला गेली अन् अपार्टमेंट संस्कृती उदयास आली. अपार्टमेंटच्या उंच उंच इमारती गगनाला भिडल्या आणि घरं रसातळाला गेली! पूर्वीचा 'वाडा संस्कृती' आणि आजची 'फ्लॅट संस्कृती' याची तुलना करायची म्हटलं तर कुठे तो इंद्राचा ऐरावत आणि कुठे ती शाम भटाची तट्टाणी असं म्हणावं लागेल.

एकेरी विटांच्या भिंतीत सिमेंटनी बांधलेली घरं, वनरूम किचन, टू रूम किचन अशा स्टायलीश नावात राहिलेली कुटुंबं, संकुचित मनाची, कूपमंडूक प्रवृत्तीची,

रेशमी किड्याप्रमाणे स्वत:लाच गुरफटून घेऊन घुसमटून जाणारी माणसं दुसऱ्याचे दु:ख काय जाणणार ?

मोजक्या मापात राहणाऱ्यांना आकाशाची उंचीच कळली नाही तर त्यांना 'तुका आकाशा एवढा म्हणजे काय,' कसे कळणार ? तुका सदेह वैकुंठाला गेला पण शेजारी एखादी व्यक्ती सदेह जमिनीवर पडलेली असली तरी आपल्याला काय त्याच्याशी देणं-घेणं ? आपण भले की आपलं काम भले ! फ्लॅटमधील कुटुंबाच्या आक्रोशानासुध्दा लक्ष्मणरेषा असते.त्यांचा आवाज उंबरठ्यापर्यंतसुध्दा पोहोचत नाही. कारण त्यांचा आक्रोशसुध्दा मुकाच असतो, तो कंठातच अडकतो. शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मानगुटीवर घड्याळाची टांगती तलवार असल्याने, त्यांना पोटाची खळगी भरण्यासाठी शेजारधर्म व्यवहार, प्रेम, माणुसकी यांना धाब्यावर ठेवून पैशाच्या मागे धावायचं असतं. महागाईच्या वणव्याने त्यांच्या डोळ्यांतील पाझर आटलेलाच असतो. त्यामुळे दोन थेंब गाळण्याची तसदीही घ्यावी लागत नाही. अशी ही हृदयस्पर्शी परिस्थिती असते.



ज्या व्यक्तीजवळ आपल्या कुटुंबातील माणसांना स्टँडवर पोहोचविण्यासही वेळ नसतो, अर्थात हे काम रिक्षावाले करतात ! तर ती व्यक्ती शेजाऱ्याला स्मशानभूमीत पोहोचवायला वेळ कुठून आणणार ? पण आज शववाहिकेने आणि विद्युत दाहिनेने ही जबाबदारी स्वीकारली असल्याने सर्वांचाच प्रश्न मिटला आहे. त्यामुळे शेजारधर्म, व्यवहार वगैरे किस झाड की पत्ती ! काय असेल ते .......उंबरठ्याच्या आत ! आपल्या शेजारी कोण राहतो हेच जर माहीत नसेल तर कुठला शेजार अन् कुठला धर्म !

निसर्गापासून माणूस लांब चाललाय. लोकसंख्यावाढीमुळे जंगलांचं सांस्कृतिक जीवन सौंदर्यहीन करून या block system घरांनी, अपार्टमेंटनी माणसा-माणसांत भीती निर्माण करून माणुसकीच्या मुसक्याच बांधून टाकल्या, तर

''पाडू चला रे भिंत मध्ये आड येणारी,
मनामनातून बांधू या एक वाट
जाणारी !''

असं फक्त कवितेतच म्हणायचं ! प्रेम, जिव्हाळा या भावना उरल्या नाहीतच, पण कुणाचं कुणाशी बोलणंही नाही, विचारपूस नाही, सुख-दु:खाचा लवलेशही नाही. पूर्वी गरजेसाठी तरी शेजारधर्म पाळला जायचा पण आज कुणाला कशाची गरजच नसते. गरजेलाच गरज नाही तर माणसाला कुठून असणार ? सध्या माणसाला गरज आहे ती फक्त पैशाची ! म्हणून तो त्याच्यामागे धावतो आहे. त्यामुळे त्याला वेळ नसतो. 'माणूस हा सहवासप्रिय प्राणी आहे' हे मानसशास्त्रातले तत्त्व खोटे ठरते की काय ? अशी शंका वाटू लागली आहे.

फ्लॅटमधील बंद दारांची कुटुंबं संकुचित बनली आहेत. तशीच त्यांची मनं आणि प्रवृत्तीसुध्दा संकुचितच बनली आहे. पती-पत्नीच्या अर्थार्जनासाठी होणाऱ्या

परवडीत 'एक मूल' कुटुंबाची कुचंबणा होते आहे. एकटं मूल चिडचिडी, एक्कलकोंडं बनतंय. प्रेमाअभावी, सहवासाअभावी ते त्रागा करते, कुढत राहते. वेळेअभावी आणि माणसाअभावी कुटुंबच मुकी बनत चालली आहेत. पैशाच्या मागे धावाधाव करताना दमल्या भागल्यावेळी त्यांच्या दिमतीला टी.व्ही. असतोच. त्यामुळे बोलणे बंदच आणि अगदीच महत्त्वाचे कारण असेल तर आपले म्हणणे थोडक्यात सांगा याचे पालन करणारा दूरध्वनी असतोच. त्यामुळे तोंडातून शब्दच नव्हे तर वाफसुध्दा वाया जात नाही, नव्हे नव्हे, तर जाणारच नाही याची जणू शपथच घेलतेली असते. ना नातेवाईकांच्याकडे जाणे-येणे, ना मित्रमैत्रिणींशी संबंध ठेवणे, ना शेजाऱ्यापाजाऱ्यांशी गप्पा मारणे, काही-काही नाही. सारं कसं उदास-उदास आणि शांत-शांत वातावरण बनलंय्! त्यामुळे पालक आणि बालक दोघेही एकलकोंडे बनलेत. त्यामुळे बालकांच्या मनांत मनमिळावूपणाच राहिला नाही तर भारतीय संस्कृतीनुसार एक तीळ सात जणांत कसा वाटून खाणार ? सिमेंटच्या भिंतीना फक्त विकृतीच माहीत आहे. प्रकृतीला तर थाराच नाही आणि संस्कृती हा शब्द तर शब्दकोशातच बंद आहे. म्हणूनच माणूस माणसालाच पारखा झालाय तर माणसांनी माणसाशी माणसासारखं वागावं असं म्हणण्यात तरी काय अर्थ आहे ?

माणसांनी किती अलिप्त राहावं याला ही काही सीमा नाही. तो राहत असलेल्या अपार्टमेंटमधील एखाद्या व्यक्तीचा फ्लॅट विचारला तर तो नावाचा फलक दाखवतो. तोंडाने बोलतसुध्दा नाही. तर एखाद्याने जर

''बांधीन तेथे घरकुल चिमणे स्वर्गाचे
ते रूप ठेंगणे, शृंगाराचे कोरीव लेणे,
पहावयाला येशील कां ऽऽ ?''

असं कुणाला म्हणायचं आणि कसं म्हणायचं ? कुणाजवळ वेळ आहे आमचं वैभव पहायला आणि कौतुक करायला ? जो तो आपल्यापुरताच असतो.

लोकसंख्येच्या वाढीमुळे जागा अपुरी पडायला लागली. त्यामुळे निवारा शोधण्यात फ्लॅट संस्कृती उदयाला आली आणि ती अनेक मजली बनल्याने माणसाला शोधणंही कठीण झालंय् या फ्लॅट संस्कृतीत! वाडे पाडले, अन् फ्लॅट झाले. लोकांची राहण्याची सोय झाली खरी, पण जुन्या घरांना मात्र मुकावं लागलं. वाईट वाटते ते याचेच! वाड्याच्या नंदनवनात फ्लॅटचं बंधनवन झालंय, त्यामुळेच की काय कोण जाणे पण माणसं आणि घरं मुकी बनत चालली आहेत, हे मात्र खरं!

## हसू नका बरं!

### भाडे का वाढवता?

भाडेकरू- मालक,तुम्ही दरवर्षी भाडे वाढवता याचे कारण सांगाल का ?


मालक- होय,सांगतो, दरवर्षी महागाई वाढते म्हणून भाडे वाढते.महागाई कमी झाली की मी स्वतःहून भाडे कमी करेन.

भाडेकरू- अहो, मग स्पष्टच सांगाना भाडे कमी होणार नाही ते!

**-सुरेश देहेरकर**

# विमानाला जलसमाधी

**नि. श. गुळवणी**



''बोईंग ७४७ चालविणं अगदी सोपं आहे बरं का. एखादी रोल्स रॉयल्स चालविल्यासारखंच समजा ना,'' प्रशिक्षणाला सुरुवात करताना एल्सी मानेला नाजूक झटका देत थोडेसे पुढे आलेले केस मागे उडविण्याच्या प्रयत्नात वैमानिक श्रोत्यांचं लक्ष वेधताना म्हणाली, ''रचनाकर्त्यांनी सहज उडविता येण्यासारखी ह्याची सुंदर रचना केलेली आहे बरं. कॉकपीटमध्ये घुसल्यानंतर तुम्हाला सर्वप्रथम वाटेल की किती ही गुंतागुंत! खरंच तीस हजार फुटावर हे मोठं धूड तरंगत राखणं फार म्हणजे फारच कठीण असणार, होय ना?''

''होय, मलाही सर्वप्रथम तसंच वाटलं होतं,''अनुभवी वैमानिक हसन म्हणाला. ''परंतु मॅडम, तुम्ही त्याला धूड म्हणालात, ते धूड नाही. एखाद्या सुंदर कमनीय कॅब्रे नर्तकीसारखं मस्त, डोळ्याचं पारणं फेडणारं विमान आहे हे.'' आणि तीथं हास्याची एक लकेर उठली.

''अगदी बरोबर,'' पुन्हा एकदा तोऱ्यात केस मागे उडविताना एल्सी म्हणाली ''अगदी असंच,'' तिच्या त्या अदावर फिदा होताना हसन म्हणाला, ''तुमच्या सारखंच देखणं विमान आहे हे बरं का.''

एल्सीला तो शुध्द आगाऊपणा वाटला. तिचा चेहरा उतरला. श्रोत्यांनीही थोडीशी नापसंती दाखविली.

''एकदा का तुम्ही उंचीवर स्थिर करून त्याच्या स्वयंचलित वैमांनिकाकडे सुपूर्द केलंत की ते इतंक स्थिर आणि सहजसुंदर उडत राहतं की तुमच्या पोटातलं पाणी किंचितही हालणार नाही. वातावरणाच्या आणि ढगांच्या वर, शांत निद्रिस्त आकाशाखाली ते एखाद्या योगीपुरूषासम् स्थिरगतीने चाललंय असंच वाटतं. जणू जमिनीचाच एक स्थिर तुकडा आकाशात उडता ठेवलाय की काय अशीच तिथं शंका यावी.''

''स्वयंचलित वैमानिकाचं ठीक आहे. परंतु काही कारणास्तव आम्हां वैमानिकांना ते आपल्या नियंत्रणात घ्यावं लागलं तर...'' एक तरुण वैमानिकानं साशंकतेने विचारलं.

''सांगते. मी त्याच मुद्याकडे येणार होते,'' एल्सी म्हणाली, ''तुमच्या हातांनीही ते तितक्याच सहजपणे उडविता येते हीच खरंतर ह्या रचनेची विशेषता म्हणायला हवी.''

''अशा सुंदर रचना बोटांनीच हाताळाव्या लगतात,'' हसनने आणखी एक लैंगिकतेचा वास येणारा हिणकस शेर मारला आणि स्वत:च्या विनोदावर स्वत:च मोठ्याने हसला पण कोणीही त्याच्या त्या कोटीला दाद दिली नाही.

''तुम्ही नियंत्रण चावीवरील हात दूर केलात आणि त्याला त्याच्या मर्जीवर सोडलं तरी आणि तरीही ते किंचित कललेलं, थोडंसं डचमळल्यासारखं वाटेल, थोडंसं खाली उतरताना पुन्हा एकदा स्थिर होईल बस्स!'' ती ठसक्यात म्हणाली. तरुण वैमानिकांना दिलासा देण्यासारखंच ते असल्यानं तिनं त्याच्या विशेष भर दिला होता. ''अर्थात तुम्ही प्रशिक्षित वैमानिक तसा प्रयत्न करणार नाही हे सांगायलाच नको परंतु आपत्काळात तशी परिस्थिती उद्भवलीच तर....तर रचनाकर्त्यांनी त्याचाही ह्या अप्रतिम रचनेत व समावेश केला आहे ''ती पाण्याचा घोट घेताना म्हणाली. ''बस्स अशा वेळी ते थोडं खाली उतरू लागलं तर त्याचं नाक थोडं वर उचलून हलकं खाली दाबा आणि हातावर हात धरून आरामात बसून रहा. ते मूळस्थितीत आरामात मार्गक्रमण करीत राहील. इतकंच नव्हे तर तुम्ही त्याची इंजिन बंद केलीत किंवा भाररहित केलीत तरीही ते एखाद्या मोठ्या पतंगासारखं किंवा हवाई छत्रीसारखं हवेत तरंगत राहिलं आणि ते ऐकून श्रोते सुखावले.''

पण ते सारं आपत्कालीन परिस्थितीत ठीक आहे. अन्यथा तुम्हाला प्रशिक्षण दिलेल्या पध्दतीनुसारचं काटेकोर विमान चलन करावयाचे आहे. तीस हजार फूट हवेत कोणत्याही नियमांचे उल्लंघन करावयाचे नाही. कोणताही प्रयोग करावयाचा नाही बस्स विमान उड्डाणाच्या साऱ्या नियमांचे डोळ्यांत तेल घालून पालन करावयाचे हेच तुमचे आद्यकर्तव्य आहे. लक्षात ठेवा, अडीचशे जिवांची जीवनरेषा तुमच्या सक्षम हातात तेव्हा बांधलेली असेल त्याच्याशी कोणताही, कसलाही आणि दुरान्वयेही खेळखंडोबा करू नका.

''ह्या एल्सीबरोबर उडायचा अनुभव घ्यायला हवा,''हसन बाजूच्याच तरुण वैमानिकाच्या कानात कुजबुजला. कॉकपीटमध्ये बस्स मी आणि एल्सी!

''समोर तुम्हा वैमानिकांना प्रशस्त काचेमधून सुंदर आकाश, खाली सागर, भूमी, नयनरम्य प्रदेश



सारं काही छान न्याहाळता येईल. ही वसुंधरा खरंच खूप सुंदर आहे आणि तिचं ते अवर्णनीय सौंदर्य, ती हिमाच्छादित शिखरं, ते देदीप्यमान पिरॅमिडस्. ती शीतल चंद्रमावरूनही लक्ष वेधून घेणारी चीनची अभेद भिंत– सारं सारं काही न्याहाळण्याचं परम्भाग्य तुम्हा वैमानिकांच्या ललाटी लिहिलेलं आहे.'' एल्सीचं निसर्गप्रेम बोलून गेलं.

''कॉकपीटमध्ये एल्सी असल्यानंतर बाहेर बसायला मी तिला वेडा वाटलो की काय?''हसन पुन्हा वाकड्या वाटेला शिरताना कुजबूजला.

एल्सी एक धंदेवाईक प्रशिक्षक होती. ती वैमानिकांना त्या अवाढव्य विमानाच्या भारांचा रचनेचा आणि विशेषत: नियंत्रण कक्षातील विविध तबकड्यांचा परिचय देत राहिली. मध्ये मध्ये प्रश्न विचारून, शंकांचे निरसन करताना ते सार त्या वैमानिकांना व्यवस्थित समजल्याची खातरजमा करीत राहिली. वेळोवेळी तीस हजार फूट उंचीवर चालणाऱ्या त्या साऱ्या त्यांच्या क्रियांचं महत्त्व ती त्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करीत राहिली.

''तुम्हाला विमान धावपट्टीवरून उडविताना आणि धावपट्टीवर असताना विशेष खबरदारी घेणं आवश्यक ठरतं. बहुसंख्य विमान दुर्घटना ह्या अशावेळीच होऊ शकतात. अर्थात विमान उड्डाणाची कार्यकृती तंतोतंत अमलात आणल्यास अशा दुर्घटना होऊच शकत नाही. आधुनिक विमानात मागील सर्व दुर्घटनांचा विचार करून रचनेत आवश्यक ते बदल केले गेले असल्याने रचना अधिक परिपूर्ण ठरते.''

''खराब हवामानाचाही उड्डाणांवर परिणाम होते, होय ना?'' एका तरुण वैमानिकाने विचारले.

''अगदी बरोबर, धावपट्टी धुक्यात झाकोळली असेल, बर्फ पडत असेल तर अशी परिस्थिती कशी हाताळावी याचे आम्ही आपल्याला सखोल प्रशिक्षण देऊ. विमानावर साचलेले बर्फ वेळीच साफ न केल्याने अनावस्था प्रसंग ह्यापूर्वीही उद्भवलेले आहेत. अशा साऱ्या विपरीत परिस्थितीशी कसा मुकाबला करायला हवा ह्याचे आम्ही पुढील काही दिवसांत उदाहरणासह विस्तृत माहिती देऊ. ह्यापूर्वी घडलेल्या साऱ्या विमान दुर्घटनांची तुम्हाला सचित्र माहिती दिली जाईल आणि अशा परिस्थितीशी मुकाबला करतांना वैमानिकांनी कोणत्या चुका केल्या ह्याचे विश्लेषणही तज्ज्ञ करतील. लक्षात ठेवा, तेहतीस टक्के विमान दुर्घटना ह्या फक्त आणि फक्त वैमानिकांच्या निष्काळजीपणामुळे घडून आल्या आहेत असा विमान दुर्घटना इतिहास सांगतो.''

''यंत्रबिघाडामुळेही अपघात घडून आले आहेत. होय ना?''

''होय, अशा साऱ्या यंत्रसंबंधी अपघातांचे रचनाकार सखोल विश्लेषण करून रचनेत आवश्यक ते फेरबद्ल करून चाचण्या घेतात आणि पुन्हा तसे बिघाड हे प्रवाशांच्या जिवावर उठणार नाहीत याची संपूर्ण खबरदारी घेतात. पूर्वी अशा बिघाडांमुळे होणाऱ्या अपघातांचे प्रमाण अधिक होतं परंतु आधुनिक विमानात ती शक्यता खूपच कमी झालीय. शून्यच समजा ना,'' ती तरतरीत स्त्री म्हणाली, ''विमानाचं ठरावीक तास उड्डाणानंतर सखोल परीक्षण केलं जातं, तेल–पाणी

केलं जातं, जोड आवळले जातात आणि ते सारं खास प्रशिक्षित तंत्रज्ञ करतात, त्यांच्या चुकीमुळेही अपघात होऊ शकतात.''ती स्त्री अखंड भान हरपून बोलत राहिली आणि श्रोतेगण एकटक ऐकत राहिला.

''इथं वर्गात सारी माहिती दिल्यानंतर तुम्हाला प्रशिक्षणाकरिता बनविलेल्या बोईंग ७४७ च्या कॉकपीटमध्ये प्रशिक्षण दिलं जाईल. तुम्हाला इथं जमिनीवर बसून उंच उड्डाणाचा अनुभव घेता येईल.हे सारं गणकयंत्राच्या साहाय्याने नियंत्रित केलेलं आहे. विमानानं धावपट्टी सोडणं, धावपट्टीवर उतरणं इतंकंच काय उंचीवर विविध परिस्थितीचा सामना कसा करायचा त्या साऱ्यांचा सराव तुम्हाला इथ करता येईल. ही थेट मूळ विमानाची जमिनीवर उड्डाणसदृश परिस्थिती निर्माण करणारी प्रतिकृती आहे. तुम्ही त्याच्यावर मनसोक्त सराव करू शकता.''

''एखादा वैमानिक त्याच्या मर्जीनुसार विमानाला अपघात घडवून आणू शकतो का ?''हसननं विचारलं आणि सारे त्याच्याकडे वळून पाहत राहिले.

''तसा प्रयत्न एखादा वेडा इसमच करू शकतो आणि वैमानिकांची निवड करताना ह्या साऱ्या गोष्टी विचारात घेतल्या जातात. शिवाय तिथं एक अनुभवी वरिष्ठ वैमानिम कॅप्टन ह्या नात्यानं उपस्थित असतो आणि दुसरा साहाय्यक वैमानिकही असतो. हे विमान उडवायला खरंतर एक वैमानिक पुरेसा ठरतो. ते उडवायला सहजसोपं ठरतं. परंतु क्वचित प्रसंगी निर्माण होऊ शकणाऱ्या विपरित परिस्थितीचा विचार करता दोन वैमानिक त्याचं चलन करतात.''

एल्सीचा तास संपला आणि पांगापांग झाली. तरुण वैमानिक गटागटाने रमतगमत भोजन कक्षाकडे रवाना झाले.

''एल्सी पाण्यावर विमान कसं उतरवायचं ह्याच्याबद्दल मला थोडी तुझ्याशी चर्चा करायची आहे.'' हसन एल्सीला दरवाजातच गाठताना म्हणाला.

''हसन, तुम्हाला उड्डाणाचा बराच अनुभव आहे. तुम्हाला ते चांगलंच अवगत असायला हवं. तुमचं हे पुन: प्रशिक्षण आहे. तरीही मी वर्गात दुपारच्या तासाला त्याबद्दल स्पष्टीकरण देईन.''

''नाही तसं ते मला माहीत आहे. तरीही एकदा तुझ्याकडून समजावून घ्यायला आवडेल एल्सी,'' एल्सीच्या डोळ्यात पाहताना हसन म्हणाला आणि लागलीच एल्सीनं त्याच्या नजरेतील पुरुषी वासना वाचली. ''व्हॉट अबाऊट डिनर ? तिथचं आपल्याला त्याबद्दल अगदी सऽऽविस्तर बोलता येईल.'' तो सविस्तरमधला 'स' खेचताना सूचक म्हणाला आणि हसला.

''सॉरी मिस्टर हसन. तुमचा प्रस्ताव साफ नामंजूर आणि त्याच्याकडे न पाहता ती ताडताड निघून गेली.''

''अस्सं ! सौंदर्याचा एवढा गर्व ? तुला लावतो कामाला. हसन म्हणतात आपल्याला.'' तो पाठमोऱ्या एल्सीकडे एकटक पाहत तोऱ्यात म्हणाला.

★ ★ ★

न्यू यार्क – कैरो उड्डाण. मध्यरात्र असल्याने रंगेल हसन हॉटेलात स्वैर भटकत होता. बराच वेळ

तो जलतरण तलावात मनसोक्त पोहणाऱ्या युवतींना न्याहाळत राहिला. ही सायंकाळ एखाद्या मदमस्त साथीदारासोबत घालवायला मिळाल्यास किती मजा येईल ह्या दिवास्वप्नात तो हरविला होता. त्यानं स्मितहास्यातून काही जलपऱ्यांना तसा इशाराही करून पाहिला परंतु त्यांनी त्याची मुळीसुध्दा दखल घेतली नाही. काठावर मासिक चाळत पहुडलेल्या सुंदरीशी परिचय करून घेण्याचाही त्यानं प्रयत्न केला परंतु तिथंही त्याची डाळ शिजली नाही. चेहरे चेहऱ्याआडचं गुपित उघडं करतात हेच खरं आणि त्या साऱ्या तरूणींना लागलीच त्याच्या मनात चाललेली उथळफूथळ लक्षात यायची. तो दिसायलाही थोडासा राकट, ओबडधोबड असल्याने अपरिचित स्त्रियांना तर त्याच्यामध्ये मुळीच रस नसे आणि ते तो चांगलं ओळखून होता. सौंदर्याची उणीव अधीमधी त्यानं डॉलरचा वापर करून पुरी केली असल्याने तो तशा गरजू मुली शोधण्याकरिता तिथून सटकला. तरणतलावावरल्या उच्चभ्रू पोरींपुढे नोटांचं आमिष काम करू शकणार नव्हतं.

तो त्याच्या खोलीवर परतला आणि त्यानं पाण्याच्या निमित्तानं सर्व्हिस गर्लला रूममध्ये बोलावलं.

''एस सर,'' तिला पढविल्याप्रमाणे तिनं दरवाज्यातून हसतमुखानं विचारलं.

''मला एक ग्लास पाणी दे,'' तो तिच्याकडे आशाळभूत नजरेने पाहत म्हणाला.

''होय सर,'' ती उत्साहाने म्हणाली. खरंतर अशी छोटी काम गिऱ्हाईकं स्वत:च करतात. त्यानं केवळ ते निमित्त पुढे करीत तिला तिथं बोलाविल्याचं तिच्या लक्षात आलं. परंतु त्यांना चेहऱ्यावर नाराजी दाखविण्याची परवानगी नव्हती. गिऱ्हाईकांशी नेहमीच सौजन्याने, हसतमुखानेच वागायला हवं हे त्यांनी तिच्या मनावर पक्कं बिंबवलं होतं. ती दरवाजा कटाक्षाने उघडा ठेवताना खोलीत शिरली.

''हे बघ माझ्याकरिता एक कडक डिंक्स मागव,'' तिची पाठमोरी आकृती न्याहाळताना तो म्हणाला.

''मी तसं रेस्टॉरंट विभागाला सांगते सर,'' ती नम्रपणे म्हणाली.

''मी मागवतो ना फोनवरून. तुझ्याकरिताही एक मागवतो,'' तो आशाळभूत नजरेने तिला न्याहाळतांना म्हणाला.

''नको सर, आपण घ्या,'' ती नम्रपणे म्हणाली.

''बैस गं. पार्टी करू. मासे खाऊ कसे ?''

''आम्हाला तशी परवानगी नाही सर,'' ती निघण्याच्या तयारीत म्हणाली.

''कोणाला काही कळणार नाही. मी दरवाजा बंद करून घेतो. बाहेर डू नॉट डिर्स्टबचा फलक टांगूया.''

''नको सर,''ती लगबगीने दरवाजात जाताना म्हणाली. ''आणखी काही हवं असल्यास तसा फोन करा सर.''

''हे बघ मी तुला शंभर डॉलर्स देतो, मग तर झालं ?''तो तिच्याजवळ सरकताना म्हणाला.

''मी तशातली मुलगी नाही,'' ती झटकन खोलीबाहेर पडताना म्हणाली, ''गूड डे सर !''आणि

ती झटकन् अदृश्यही झाली.

त्यानं  ती सायंकाळ चडफडत घालविली. मध्यरात्री उड्डाणातील इतर सहकार्याबरोबर विमानतळाकडे रवाना झाला. तिथं ऑफीसात त्याचा वरिष्ठ मुश्रीफ त्याचीच वाट पाहत थांबला होता.

''मिस्टर हसन मला आपल्याशी काही महत्त्वाचं बोलायचं आहे.''

''बोल. मी ऐकतोय.'' हसन बेफिकीरपणे म्हणाला.

''उड्डाणाची वेळ जवळ आल्याने मी सरळ मुद्याचं बोलतोय. तुझं वर्तन चांगलं नाही. तुला त्यामध्ये सुधारणा करावी लागेल.''

''व्वा रे व्वा! हा तर धडधडीत खोटा आरोप करतो आहेस,'' हसन उसळून म्हणाला. ''मी साफ अमान्य करतोय.''

''हे बघ, तुझ्याबद्दल तक्रारी आलेल्या आहेत. स्त्रियांशी  तू सौजन्याने वागत नाहीस,'' तो म्हणाला. ''ह्या पूर्वीही मी तशी समज दिली होती. हे चालणार नाही!''

''अस्सं! हे आणि तुला कुठल्या नटवीने सांगितलंय?''

''कोणी सांगितलंय हे तितकसं महत्त्वाचं नाही. परंतु वेगवेगळ्या ठिकाणाच्या वेगवेगळ्या महीलांकडून तशा तक्रारी इथं आलेल्या आहेत.''

''त्या साऱ्यांना माझ्यासमोर येऊन बोलायला सांग. मग बघतो एकेकीला,''तो फणकाऱ्यात म्हणाला.


''हे बघ, आपण दुसऱ्या देशात आहोत. पोलिसात त्यांनी तक्रार केली तर तुझ्यावर कारवाई होईलच आणि आपल्या कंपनीचीही बदनामी होईल.''

''कशी होईल. मी काही केलेलंच नाही.''

''हे बघ, आम्हाला आमची आंतरराष्ट्रीय प्रतिमा जपावीच लागेल. आम्ही त्यामध्ये कोणतीही तडजोड करणार नाही.''

''बर मग?''तो चढ्या आवाजात म्हणाला.

''तुझं हे शेवटचं आंतरराष्ट्रीय उड्डाण राहील. ह्यापुढे तुला फक्त देशांतर्गत काम करावे लागेल किंवा कदाचित ते



।

''हे फारच होतंय. तुम्ही जाणूनबूजून माझं आधिक नुकसान करताय. मी ते कदापिही सहन करणार नाही.''

''हे बघ, व्यवस्थापनातं तो निर्णय होईल. मी माझा अहवाल सादर करीन.''

''हे खरंच फारच होतंय. मला तुम्ही कॅप्टन पद दिलं नाही. इतकी वर्षे मी इथं काम करतोय आणि आता थेट माझ्या आंतरराष्ट्रीय उड्डाणांनाही कात्री लावताय ती लावताय. वरती आणि हकालपट्टीची धमकी?'' तो उसळून म्हणाला.

''माझा नाईलाज आहे. मलाही तुझ्याबरोबर तिकडं बोलवलंय. तू मांड तूझी बाजू. पण ते आता कठीण आहे.''

''अस्सं! हे माझं शेवटचं आंतरराष्ट्रीय उड्डाण आहे तर?''

''होय!''मुश्रीफ ठासून म्हणाला. ''हे तुझं शेवटचं आंतरराष्ट्रीय उड्डाण आहे.''

''मग तुझंही ते शेवटचं उड्डाण आहे, समज.''


आणि हसन कॅप उचलत भर्रकन केबिनमधून बाहेर पडला.

★ ★ ★

हवाई अड्याच्या नियंत्रण कक्षात बऱ्यापैकी शांतता होती. जगातील एक सर्वाधिक वर्दळीच्या विमानतळापैकी ते केनेडी विमानतळ होते. वर्षाकाठी लाखो प्रवासी तिथून जगभर ये-जा करतात. शेकडो उड्डाणांचं रोज तिथं नियंत्रण केलं जातं. मध्यरात्री मात्र वर्दळ कमी असते. त्या पाळीची पर्यवेक्षक सेरेना जोन्स ही अनुभवी स्त्री होती. उड्डाणाकरिता फक्त सहा विमानं रांगेत उभी असल्याने ती तशी निर्धास्त होती. समोरील रडार पडद्यावर विमानांची स्थितीचे आकलन होत होते. तो तसा गजबजलेला विमानतळ असल्याने गर्दीच्या वेळी पर्यवेक्षकांना डोळ्यात तेल घालून पहारा द्यावा लागत असे. थोडीशीही चूक झाल्यास कैक प्रवाशांच्या जिवावर बेतणार होतं. एकामागोमाग एक विमानं उड्डाणाकरिता सज्ज असल्यानं आणि प्रत्येकाला त्याचं उड्डाण सर्वप्रथम घेतलं जावं असं वाटत राहिल्याने पर्यवेक्षकावर सतत दबाव असे. बऱ्याच परदेशींच्या वैमानिकांना मोडकं-तोडकंच इंग्रजी येत असल्याने संभाषणाच्या बाबतीत त्यांना फारच काळजी घ्यावी लागे. त्यांना संभाषणाचं खास प्रशिक्षणही दिलं गेलं होतं. त्यांना त्यांच्याशी नेहमीच सौजन्याने वागताना वाद टाळावे लागत असत. ती सारी तारेवरची कसरत सरावाने ते धंदेवाईकपणे पार पाडत असत. त्यापूर्वीही नियंत्रण कक्षातील त्रुटींमुळे चुकीच्या धावपट्टीवरून विमान उडविलं गेल्यानं दुसऱ्या विमानाशी टक्कर झाल्याच्या घटना अन्यत्र घडल्या होत्या आणि त्या साऱ्या घटनांची इत्थंभूत माहिती प्रशिक्षणादरम्यान देताना त्यांनी तशा त्रुटी कशा टाळाव्यात ह्याचंही प्रशिक्षण दिलं गेलं होतं. विमान दुर्घटनांमध्ये आतंकवाद हा एक मोठा घटक असल्याने असे आंतकवाद्यांनी हवाई अड्डयांकडे वळविलेल्या आगंतुक विमानांना कसं हाताळायचं हेही सउदाहरण त्यांना विस्तारपूर्वक शिकवलं गेलं होतं. त्या साऱ्यांना सर्वसाधारण आणि आपात्कालीन परिस्थितीशी कशी झुंज द्यायची ह्याचं प्रशिक्षण देऊन नंतरच्या कठीण परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतरच तिथं वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची परवानगी दिली जायची. परंतु आकाश शांत असल्याने सेरेना निर्धास्त होती. ती तिच्या कर्तव्यात मुळीसुध्दा कसूर होऊ देत नव्हती. पण वर्दळ कमी असल्याने नेहमीची धावपळ नव्हती.

तिनं इजिप्तच्या विमानाला मुख्य धावपट्टीवरून उडण्याची अनुमती दिली आणि मग आणखी एक पांढरा ठिपका रडारवरील आकाशात चमकू लागला. तेव्हा सहा ठिपके नकाशावर सरकत होते. इजिप्तचे

विमान तेहतीस हजार फुटांवर स्थिर झाले आणि तिने सुस्कारा सोडला. आता ती तिच्या टेबलवरील काही कागद पूर्ण करण्याचा विचारात हरवली. खरंतर काटेकोर नियमानुसार तशी परवानगी नसे परंतु रात्रपाळीत कामाचा ताण पाहून मॅनेजर पर्यवेक्षकांना तशी परवानगी द्यायचे. त्या कागदपत्रांवर पर्यवेक्षकांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक असायच्या आणि ते काम रात्रपाळीत शक्य होई. अर्थात ते सारे धंदेवाईक पर्यवेक्षक एक डोळा रडारवरच्या पडद्यावर ठेवूनच ती सारी कागदापत्रांसंबधीची कामे आटोपत असत. सेरेना नेमकं तेच करीत होती. पुढली काही मिनिटं उड्डाण नसल्याने तिनं तिच्या कागदपत्रांवर तिचं



लक्ष केंद्रित केलं. ती ते सारं भराभर नजरेखालून घालत होती. तीनं सहाव्या मिनिटाला रडारवरील नकाशाकडे तिरपा कटाक्ष टाकला तिथं आता पाचचं ठिपके होते! कोणतं विमानं रडारच्या कक्षेपलीकडे गेले हे पाहण्याकरिता ती पडद्याजवळ आली.

इजिप्तचे विमान कक्षेबाहेर गेल्याचं पाहून तिची भुवई उंचावली. हे कसं शक्य आहे ? हे विमान काही मिनिटांपूर्वीच हवेत उडालं आणि ते इतक्या झटपट कक्षेबाहेर कसं गेलं. तिनं पुन:पुन्हा तिचं निरीक्षण बरोबर असल्याची खात्री करून घेतली आणि तिच्या वरिष्ठाला लागलीच माहिती दिली. तो धावतचं नियंत्रण कक्षात दाखल झाला. हे असं कसं झालं ? विमानाच्या रडार यंत्रणातच काही बिघाड झाला की काय ? त्यांनी लागलीच नजीकच्या लष्करी हवाईतळावर त्यांच्या रडारवरील सद्यस्थितीबद्दल विचारलं. त्यांनाही रडारवर पाचचं विमानं आढळली. सहावं इजिप्तचं विमान पडद्यावरून गायब झालं होतं।। काही दुर्घटना ? त्या विचाराबरोबर ते दोघं घामाने डबडबले. इजिप्तच्या विमानात तब्बल दोनशे सतरा प्रवासी आणि चार वैमानिकांसोबत नेहमीचे कर्मचारी होते. तसं काही झालंच तर हवाई अड्ड्यावरील संभाषणाची, माहितीची कसून तपासणी केली जाणार होती. त्यांच्या त्या वेळेतील प्रत्येक कृतीचे विच्छेदन केले जाणार होते आणि त्यांच्याकडून हवाई अड्ड्यांच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचं आढळल्यास..... ? ते दोघे हादरले. इजिप्तचे विमान उडून एव्हाना अर्धा तास झाला होता. एव्हाना ते अटलांटिक महासागरावर हवे. ते त्यांच्या रडारकक्षातून निसटले असता मार्गावरील पुढल्या रडारकक्षात यायला हवे. परंतु त्या पडद्यावरही ते प्रकट न झाल्याची त्यांना माहिती मिळाली आणि ते अधिकच गोंधळले. त्यांनी लागलीच तिथूनच उडणाऱ्या फ्रेंच विमानाला एखाद्या दुर्घटनाग्रस्त स्थितीचे, आगसदृश स्थितीचे आकलन करावयास सांगितले, पण व्यर्थ! फ्रेंच वैमानिकांना तसं कोणतंही दृश्य नजरेत आलं नाही. नक्कीच हे विमान



भरकटलं पाहिजे.

सेरेना तिच्या सैरभैर होऊ पाहणाऱ्या मनाला काबूत ठेवण्याचा प्रयत्न करताना तिचं नित्याचं काम व्यवस्थित पार पाडण्याचा प्रयत्न करीत होती. ती सहा मिनिटं दुसऱ्या कामात व्यस्त असता अचानक ते विमान पटलावरून गायब झाल्याने तिच्या अंतरीची घालमेल वाढली होती.

आणि त्या रहस्याचा उलगडा झाला. विमान अटलांटिकच्या तळाशी पोहोचलं होतं! एका व्यापारी जहाजानं विमानाचे अवशेष आणि धुराचे लोट सर्वप्रथम पाहून बातमी दिली होती.

ते इजिप्तकडे चाललेले प्रवासी विमान होते. विमान दुर्घटनांच्या इतिहासात आणखी एक काळे पान जोडले गेले! विमानाचा शोध तर लागला होता परंतु त्या उत्तराने कैक नव्या प्रश्नांना जन्म दिला होता. वातावरण इतकं शांत असताना, निरभ्र आकाश शांत पहुडले असताना हे स्थिर चाललेले विमान एकाएकी कोसळले कसे? आणखी एक आतंकवादी हल्ला...... ?

★ ★ ★

पाणबुड्यांच्या साहाय्याने मृतदेहांबरोबर विमानाचे भग्न अवषेश काढण्याचं काम वेगाने हाती घेण्यात आलं. विमानाच्या अपघातामागील कारणमीमांसा जाणून घेणं महत्त्वाचं होतं. आंतरराष्ट्रीय राजकारणात त्याचे पडसाद उमटू शकणार होते. दोन्ही देशांचे तज्ज्ञ त्या कामात जोडले गेले. घातपाताची शक्यता ग्रहीत धरून अमेरिकन पोलीस दलानं स्वतंत्रपणे चौकशीला आरंभ केला. भग्न अवशेषांचं निरीक्षण करता स्फोटसदृश कोणतीही परिस्थिती विमानात निष्पन्न झाली नसल्याचं निर्देशनात आलं. कोणताही आवरणाचा व इतर भाग स्फोटानं मोडून तोडून पडला नव्हता. विमान डुबण्यापूर्वी काही क्षण आधी स्फोट होऊन विमानाचे भाग इतस्तत: विखुरले नसल्याच्या अनुमानावरही शिक्कामोर्तब झालं काही मोडतोड तिथंच त्या स्थळी विमान येत असल्यानेच काय ती घडून आल्याचंच ते सारे भग्न अवशेष कथन करीत होते. देशी-विदेशी प्रवाशांची यादी व त्यांचे पोलिसी अहवाल कसून तपासण्यात आले. त्यांच्यापैकी कोणीही संशयित यादीत नव्हता. केनेडी विमानतळावर त्या मध्यरात्री चढविण्यात आलेल्या सामानांचीही कसून छाननी करण्यात आली. कोणतीही संशयास्पद वस्तू त्या विमानाच्या सामान कक्षात नजरचुकीने गेली नसल्याचंच निदर्शनास आलं. ते सारे क्ष-किरण अहवाल तेच कथन करीत होते.

तरीही विमान कोसळलं होतं आणि तेही त्या रात्रीच्या निरभ्र आकाशासारख निखळ, निरस स्वच्छ असंच एक सत्य होतं!

विमानात आटोक्यात न येऊ शकलेला एखादा यांत्रिक बिघाड उद्भवला की काय ? आणि ते तपासण्याचं काम त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचं होत पोलिसांचं काम संपल होतं आणि विमान अपघातातील तज्ज्ञमंडळींनी सूत्र त्यांच्या हातात घेतली. दोन्ही देशीचे तज्ज्ञ त्या कामात गढले.

सर्वप्रथम दोन्हीही कृष्णापेटिकांचा समुद्रतळाशी शोध सुरू झाला. कॉकपीटमधील त्या काही मालाच्या क्षणांची सारी उथलफुथल त्या दोन पेटिकांमध्ये बंद झालेली होती. गुरुत्वाकर्षणाच्या चौतीसशे पट भार सोसू शकेल अशा त्या कृष्णापेटिका विमान अपघातातील असाधारण धक्क्यांना पुरून उरताना सुरक्षित हाती लागू शकणार होत्या. कॉकपीट व्हाइस रेकॉर्डर अर्थात सीव्हीआर पेटिका विमान दुर्घटनाग्रस्त होण्यापूर्वीच्या अर्ध्या तासात विमानात झालेल्या संभाषणावर प्रकाश टाकू शकणार होती. तर फ्लाईट डाटा रेकॉर्डर अर्थात एफडीआर त्या काळात विमानातील महत्त्वाच्या यांत्रिकी भागांच्या कार्याविषयी माहिती देऊ शकणार होती.

अशा शांत वातावरणात वैमानिकांची चूक होण्याची शक्यता नगण्य वाटत होती. व्यवस्थित उड्डाण झाल्यानंतर विमान एका ठरावीक उंचीवर स्वयंचलित वैमानिकाच्या साहाय्याने मार्गक्रमण करीत राहते आणि तशा त्या उंचीवर त्या रात्री कोणतेही अडथळे संभवत नव्हते. बोईंग ७४७ च्या शेकडो विमाने जगभर उड्डाणे करत राहिल्याने अशा कोणत्याही यांत्रिक बिघाडाचं रचनाकारंही खंडण करीत होते.

आणि तरीही विमान अपघातग्रस्त झालेच होते. कशामुळे वैमानिकाच्या त्रुटीमुळे की यंत्रातील बिघाडामुळे ?

कृष्णा पेटिकांचं अध्ययन सुरू झालं. एकाएकी एखाद्या व्हिडीओ गेमच्या थाटात क्षणात तेहतीस हजार फुटांवरून अठरा हजार फुटांवर सरळ खाली झेप घेतली होती. केनेडी विमानतळावरील रडार यंत्र तेच दर्शवीत होती. विमान जोरदार मुसंडी मारीत खाली येत पडद्यावरून अदृश्य झालं होतं. शांत पहुडलेल्या त्या आकाशात एकाएकी विमानानं दिशा बदलून ते थेट खाली का झेपावलं ? विमानतळावरील गणक यंत्राने त्रुटी दाखविताना उंचीच्या रकान्यात फुल्या दर्शविल्या ते शक्य नाही!

हे कसं शक्य आहे ? कोणत्या परिस्थितीत विमानत तितक्या टोकाच्या घडामोडी घडू शकतात ? इंजिन पूर्णपणे बंद झाली होती की विमानातील सारा विद्युत पुरवठाच खंडित झाला होता.

गणकयंत्राच्या साहाय्याने तशा सर्व शक्यतांचा अभ्यास कॉकपीटच्या प्रतिकृतीवर करण्यात आला, सयंत्राचे विविध भाग नाकाम झाल्याचं मानताना तज्ज्ञांनी तशी परिस्थिती निर्माण होऊ शकते का ह्याचा बारकाईने अभ्यास केला परंतु समाधानकारक उत्तर मिळू शकलं नाही.

विमान सयंत्रातील कोणताही बिघाड तशी कॉकपीटमधील विपरीत परिस्थिती निर्माण करू शकलं

नाही. विमानाचा कोणताही भाग आधीच तुटून वेगळा झालेला नव्हता. अपघात स्थळी सारे महत्त्वाचे संयंत्राचे भाग सापडले होते.

आता तज्ज्ञांनी त्यांचं सारं लक्ष वैमानिकांच्या घडामोडीवर केंद्रित करायचं ठरविलं. तशी ती टोकाची परिस्थिती का निर्माण होऊ शकली हे आता त्यांच्यामधील संभाषणातूनच काय ते स्पष्ट होऊ शकणार होतं.

★ ★ ★

दूरवरची अटलांटिक पलीकडील दहा तासांची ते उड्डान बोईंग ७४७ ने न्यूयॉर्कच्या आकाशात भरले तेव्हा वातावरण विमान उड्डाणाला आदर्श असंच होते. विमानात दोनशे सतरा प्रवासी होते. देशी-विदेशीचे ते सारे प्रवासी सहलीचा आनंद लुटण्याकरिता बाहेर पडले होते. काही अमेरिकन वृध्द जोडपी हे जग सोडून जाण्यापूर्वी भव्य-दिव्य असे ते सारे पिरॅमिड्स पाहण्याचं त्यांचं स्वप्न पूर्ण करण्याकरिता विमानात दाखल झाले होते. इ.स. पूर्व चारहजार वार्षांपूर्वी मानवानं रक्ताचं पाणी करून उभी केलेली ती महत आश्चर्य 'ह्याही देही ह्याही डोळा' पाहण्याकरिता ते सारे अगदी अधीर झाले होते. ऐतिहासिक नाईलही त्यांना खुणावत होती. उत्साहाला उधाण आलं होतं आणि मध्यरात्र झाली असली तरीही त्यांच्या चेहऱ्यावर झोपेचा लवलेशही नव्हता. नव्या जगाची हुरहुरी त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट झळकली होती. सहलीचा मुखवटा ओढल्यामुळे मोठेही लहान मुलांसारख्या हरकती करताना मुळीसुध्दा कचरत नव्हते त्यांचं बालपण त्यांना साद घालीत होतं. काही प्रवाशांनी बसल्या बसल्याच झोपेची आराधना सुरू केली होती. ते इजिप्तशियन असल्याने त्यांना पिरॅमिड्ची नवलाई उरली नव्हती. हास्य विनोदात, गाण्यात रमलेल्या त्या अमेरिकन जोडप्यांकडे त्रासिकपणे पाहत ते पुन्हा एकदा त्यांच्या झोपेला परत बोलविण्याचा प्रयत्न करीत होते. वेगवेगळ्या स्वप्नात हरवताना ते डोळे हळूहळू मिटू लागले. ते काही वेळातच कायमचे मिटणार आहेत ह्याची तेव्हा त्यांना मुळीसुध्दा कल्पना नव्हती. त्या साऱ्यांच्या भावभावनांवर, आशा आकांक्षावर नियतीचा जबरदस्त प्रहार होताना सारं काही अत्यंत क्रूरपणे अटलांटिकमध्ये स्वाहा होणार होतं. पराकोटीचे आनंदाचे क्षण वेचणारी ती सारी वृध्द जोडपी काहीच क्षणात पराकोटीचे यातनांचे क्षण अनुभवणार होती आणि तो सारा विरोधाभास कथन करायला त्यांच्यापैकी कोणीही मागं उरणार नव्हता. ते सारे काळजाच्या ठिकऱ्या उडविणारे भीषण असे मृत्यूपूर्वीचे काही क्षण त्यांच्या बरोबरच अटलांटिकच्या तळाशी अदृश्य होणार होते.

दूरवरच्या त्या उड्डाणामध्ये दोन अधिकचे वैमानिक आसनस्थ झाले होते. ते झोपेची आराधना करू लागले होते. पूर्ण विश्रांतीनंतर काही तासांनी त्यांना विमानाची सूत्र हातात घ्यावयाची होती. नियाझी लागलीच झोपी जात घोरूही लागला होता, तेव्हा विमानात प्रवाशांची ये-जा सुरूच होती परंतु त्याच्या बाजूला डोळे मिटून झोपेचं नाटक करणाऱ्या हसनच्या वरवर शांत वाटणाऱ्या चेहऱ्यामागे विचारांची त्सुनामी उठली होती. त्याचं सारं मन संतापाने जळत होतं. पुढच्या आसनावर मासिक चाळत बसलेल्या त्याच्या वरिष्ठाने त्याला खडे बोल सुनावले होते आणि त्याच्या

आंतरराष्ट्रीय उड्डाणांनाच कात्री लावली होती. हे म्हणे त्याचे शेवटचे आंतरराष्ट्रीय उड्डाण! ........ तर मग तुझेही हे शेवटचे उड्डाण !! मुठी घट्ट आवळून घेताना तो मनोमनी ओरडला. 'वरिष्ठपणाचा फार गर्व आहे ना ह्या ××× च्याला. तुझी मिजास संपवतोच. आयुष्य एकदाच मिळतं आणि एकदाच संपतं. वरिष्ठ झालास म्हणून काही तुला दोनदा जगायला मिळणार नाही हे लक्षात ठेव. माझ्याबरोबर तुझ्याही शरीराच्या ठिकऱ्या–ठिकऱ्या उडवून देतो. कसला वरिष्ठ अन् कसलं काय ?' संतापाच्या भरात हसन स्वत:शीच पुटपुटत राहिला.

कप्तान बुकादीरनं विमान उड्डाणाची घोषणा केली तेव्हा मध्यरात्रीचा एक वाजला होता. आकाश मोकळे होते, शांत होते. विमानतळावर तसा शुकशुकाट होता. क्वचितच एकाद्या विमानाचा आवाज आसमंतात घुमे. ते सारं उड्डाणाकरिता एकदम आदर्श वातावरण हेरून वैमानिकही सुखावले होते.

संपूर्ण धावपट्टीचा वापर करून पूर्ण वेग घेतच कॅप्टननं त्याचा सहकारी तरूण वैमानिक एल. शाकीरच्या साहाय्याने विमानाचं हवेत उड्डाण करवलं. अगदी सहज सुंदर मनाजोगं ते आदर्श उड्डाण पाहून दोघंही सुखावले.

''मजा आली कॅप्टन फारचं सुरेख!'' तरुण वैमानिक उद्‌गारला.

''उगाच हे केस कोरडे नाही झाले. माझी सारी उड्डाण अशीच चोख असतात.''

त्यांनी विमान तेहतीस हजार फुटावर टप्प्याटप्प्याने नेत स्थिर केलं. सारी माफक यंत्र विमान स्थिर आणि हवे तसेच मार्गक्रमण करीत असल्याचं दर्शवीत होती. रचनाकारंनी, तंत्रज्ञांनी त्याच काम शक्य तितकं सहज सोपं केलं होतं. विमान अटलांटिक महासागरावर तरंगू लागलं आणि ते स्वयंचलित वैमानिक प्रणालीच्या हवाली करून दोघं वैमानिक निर्धास्त गप्पा मारू लागले. वातावरणात मुळीसुध्दा तणाव नव्हता. ढगांच्याही वरती तितक्या त्या उंचीवर कसल्याच हालचाली होण्याची सूतरामही शक्यता नव्हती.

''उद्या कैरोत हॉटेल जलजीरात मस्त भोजन घेणार. एकदम झक्कास'' तरुण वैमानिक हरकून जात म्हणाला. ''आपल्याला हे अमेरिकन फूड नाही पसंत.''

''मला पुन्हा परती विमान न्यूयॉर्कला आणायचंय,'' कॅप्टन म्हणाला. ''गेल्या गेल्या मस्त ताणून देणार.''

''सर, काही हवंय ?'' कॉकपीटच्या दरवाज्यातून डोकावत हवाई सुंदरी म्हणाली.

''कॅप्टन, नाष्टा मागवू ?'' तरुण वैमानिक उत्साहाने म्हणाला.

''नको. मी कॉकपीटमध्ये कधीच काही खात नाही. नेव्हर ! हो कॉफी चालेल.''

काफीपान झालं. स्वयंचलित वैमानिक विमान अगदी स्थिर हाकत होता. सारं कसं शांत आणि सुरक्षित वाटत होतं आणि तेव्हाच मनाशी खूणगाठ बांधून हसन आसनावरून उठला. त्यानं त्याची जळजळीत नजर एकवार शांत पहुडलेल्या वरिष्ठाकडे वळविली आणि त्याचे शब्द खरे करायला तो चालला.

सूड!! होय त्याला त्याच्या वरिष्ठांवर सूड उगवायचा होता. त्याला आता दुसरं–तिसरं काहीच

दिसत नव्हतं. त्याला त्या महाकाय विमानातील इतर निरपराध प्रवाशांचा, कर्मचाऱ्यांचा पूर्ण विसर पडला. भावनांच्या हल्लकल्लोळात त्याला समोर फक्त त्याच्या वरिष्ठाचं छिन्नविछिन्न अवस्थेतील प्रेतच काय ते दिसू लागले. स्वत:च्या जिवाचं भयही त्याला तेव्हा शिवू शकलं नव्हतं. सुडाच्या टोकाच्या भावनेनं त्याची सारी सद्सद्विवेकबुध्दीच जणू गहाण पडली होती. त्याच्या कानावर लहानमुलांचे आवाज उमटतं नव्हते, हनीमूनला चाललेल्या जोडप्याची चेष्टामस्करी ऐकू येत नव्हती... बस्सं! त्याला फक्त त्याच्या वरीष्ठाचा निर्जीव देह आणि त्याकरिता विलाप करणारे त्याचे सगेसोयरेच काय ते दिसत होते.

''ए ऊठ. मला थोडं बसू दे. तू नंतर चालवं,'' तो कॉकपीटमध्ये शिरताना तरुण सहाय्यक वैमानिकाला म्हणाला.

''सर, अचानक हे काय आणि नवे ?'' तरूण वैमानिक हसत-हसत म्हणाला. ''मध्यरात्र आहे तुम्ही आराम करा.''

''तू आराम कर. जा ऊठ,'' हसन चढ्या आवाजात म्हणाला.

''पण मला आता झोप आलेली नाही,'' तरुण म्हणाला.

''चल ऊठ म्हणतोय ना. मी सांगतोय तसं कर.''

''शाकीर, जा मस्त झोप घेऊन ये. कंटाळा आला असेल त्याला. बसू दे त्याला,''समजाविण्याच्या स्वरात कॅप्टन म्हणाला ''

''बरं ,'' नाईलाजाने आसनावरून उठत तरूण म्हणाला. ''जशी आपली मर्जी''

''माझा ईश्वरावर विश्वास आहे,'' असं पुटपुटत हसन सहाय्यक वैमानिकाच्या खुर्चीवर आरूढ झाला.

''तू मला काही म्हणालास ?'' कॅप्टन कान त्याच्या थोडा जवळ नेत म्हणाला.

''नाही,'' त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करीत हसन म्हणाला. आता त्याचं सारं लक्ष विनाशावरच काय ते खिळलं होतं. त्याला आता दुसऱ्या कशाचंही भान उरलं नव्हतं. त्या शांत झोपलेल्या आकाशाखाली आता काही भयंकर घडणार आहे ह्याची त्याच्याखेरीज कोणालाही सूतराम कल्पनाही येणं शक्य नव्हतं. मृत्यू त्या साऱ्यांना अचानक गाठणार होता आणि काही क्षणातच पिसाट पिशाच्चासारखा क्रूर घाला घालू शकणार होता. रचनाकर्त्यांनी विमान-रचना अशा कुशलतेने केली होती की अपघाताची शक्यता नगण्य होती. परंतु ते सारं यंत्राच्या बिघाडाबाबतीच काय ते शक्य होतं. वैमानिकाचंच डोकं फिरलं तर मात्र ईश्वरही तिथं कोणाला वाचवू शकणार नव्हता. वैमानिक पाडू न शकणार हवाई जहाज जन्माला यायचं आहे. कितीही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बनविलेलं असलं तरीही ते एक शेवटी निर्जीव यंत्रच! पळ म्हटलं की पळणार, थांब म्हटलं की थांबणार, डूब म्हटलं की डुबणार! आणि हसनला नेमकं तेच करायचं होतं. ते कसं जमवायला हवं ह्याचा त्यानं अगदी काटेकोर डोक्याच्या चिंध्या करीत विचार केला होता. ते त्याला नुसतंच खाली पसरलेल्या अथांग अटलांटिकमध्ये


बुडवायचं नव्हतं तर त्याच्या वरिष्ठाला मृत्यूच्या अत्यंत भयानक, क्लेशकारक अनुभव देताना ह्या जगातून हाकलायचं होतं. त्याच्या मनात सूड थैमान घालीत होता.

''आता काही तास आपल्याला काहीच काम नाही असं दिसतंय,'' कॉफी संपवून आळस देताना कप्तान म्हणाला, ''हे स्वयंचलित वैमानिका, तुझ्या हातात आता सारी सूत्रं आहेत. तू अगदी पुस्तकातल्या आदर्श पध्दतींचा अवलंब करण्यात मुळीसुध्दा फरक करीत नाहीस. तुला त्यांनी तसा तयार करून बसविलाय, पुढे-मागे सगळीच सूत्रं आपल्या हातात घेत आम्हाला इथून हाकलून देशील. मॅन-फ्री, शंभर टक्के स्वयंचलित कॉकपीट, काय ?'' कप्तान हसनकडे पाहत म्हणाला आणि जोरजोरात हसला. ''त्या बेन्याला करू दे त्याचं काम. मी थोडा फ्रेश होऊन येतो.'' आणि कप्तान आळोखेपिळोखे देत उठला आणि कॉकपीटबाहेर पडला.

तो क्षण आला तर ! सूड पूर्ण करण्याची वेळ अखेर आली तर ! 'मी बाईलवेडा काय ? मी काय करायचं ते तू ठरविणार काय ? मला आदेश देतोस काय ? फार झेललं तुला. आता तुझ्या आत्तापर्यंतच्या सगळ्या दादागिरीचा तुला एकदाच असा दंड देतो की बस्स ! आयुष्यात खूप मजा मारलीस. आता भोग नरकयातना !' विचारांच्या निखाऱ्यांच्या ज्वाला बनत हसनच्या मनात थैमान घालू लागल्या.

'हा स्वयंचलित वैमानिक उद्या म्हणे आमच्या उरावर बसणार. गेलास उडत. तू माझा गुलाम आहेस लक्षात ठेव. माझ्या सूचना तंतोतंत पाळायच्या. सर्वप्रथम तुझी हकालपट्टी करतो,' तो स्वयंचलित वैमानिकाकडून नियंत्रण काढून घेताना म्हणाला. विमान हलकेच कललं आणि थोडं खाली उतरलं आणि स्थिर झालं. ''हे बेनं, प्रशिक्षणात सांगितल्यासारखंच वागतंय की पण मी आता करणार आहे ते प्रशिक्षणात नाही ते आता फक्त आपल्या ह्या दोन हातात आहे.''

विमानानं धावपट्टी



सोडून अर्धातास उलटला होता. मध्यरात्र आहे हे विसरून जात सहलीचा मुखवटा ओढलेले बरेच प्रवासी मस्तीत रमले होते. पुढल्या पिरॅमिड जगतातील अपरंपार आनंदाच्या क्षणाची झलकच त्याच्या चेहऱ्यावर तरळली होती. ते सारे मस्तीत असताना गात, हसत, गप्पा मारीत होते. काहींनी एव्हाना पहिला पेग रिझवला होता आणि ते दुसऱ्या पेगच्या तयारीत होते. झोपेची आराधना करीत होते. काही कानाला पिना टोचून संगीताचा आस्वाद घेण्यात गर्क होते. समोरील छोट्या पडद्यावर विमानाची दिशा, तो भयंकर वेग ते बाहेरचे उणे चौवीस डिग्री

सेंटीग्रेड तपमान ह्याची त्यांना तेव्हा उलट गंमत वाटत होती. चौवीस हजार फुटांवर आपण उडतोय ह्याचं त्यांना कौतुकही वाटत होतं. त्या सुखद चौकटीबाहेर काचेच्या अंधारात मृत्यू सदैव त्यांच्यावर क्रूरपणे घाला घालण्याकरिता दबा धरून बसलेला आहे ह्याची त्यांना तिथं किंचितही जाणीव होत नव्हती. तंत्रज्ञानाच्या आविष्कारातूनच ते सारं सुखद वातावरण तिथं निर्माण करण्यात आलं होतं.

......परंतु ते सारं काही क्षणातच पालटणार होतं. तिथं आवासून उभा राहिलेला मृत्यू त्यांचे क्रूरपणे लचके तोडणार होता. खाली अथांग सागर तो गिळंकृत करायला सज्ज होता. मृत्यूच्या अगदी काठावर ते सारे उभे होते आणि त्यांची त्यांना पुसटशी देखील जाणीव नव्हती. कोणी आता झोपेतच जीवनाचा निरोप घेऊ शकणार होतं, तर बहुतेक सारे त्यांच्या उघड्या डोळ्यांनी मृत्यूचं ते भयंकर तांडव पाहताना त्यानं मांडलेल्या त्या भीषण यज्ञात स्वाहा होणार होते. तिकडे कॉकपीटमध्ये त्यांनी विश्वासाने बसविलेला वैमानिकच त्यांचा अकस्मात मृत्यूची तयारी करण्यात गुंतला होता.

''माझा ईश्वरावर विश्वास आहे....होय आहे....,'' हसन विमानाची उंची कमी-अधिक करायच्या दांडीवर दोन्ही हात घट्ट रोवून धरीत पुटपुटत राहिला. ते काही निर्णायक क्षण होते. जीवनाकडे जायचं की मृत्यूकडे... ? मृत्यूकडेच ! त्याच्या मेंदूत रटरटणाऱ्या त्या सूडाच्या रसायनानं जीवनाचा मार्गच बंद करून टाकला होता...... आणि मग त्या मृत्यूकडील प्रवासाला आरंभ झाला. ''माझा ईश्वरावर विश्वास आहे.......'' तो निश्चयाने पुन्हा एकदा पुटपुटला आणि त्यानं पूर्ण शक्तिनिशी दोन्ही हातांनी ती दांडी पुढे ढकलली. एक निर्जीव यंत्रच ते. आदेशाचं पालन करीत झटक्यात दिशा बदलताना ते वेगाने थेट......अथांग जलाशयाकडे खाली झेपावलं. ते इतक्या वेगाने खाली येऊ लागलं की विमानात एकच हाहाकार उडाला. तो झटकाच इतका जबरदस्त होता की काही कमजोर मनाच्या माणसांनी सहन न होऊन त्यांनी लागलीच माना टाकल्या. काही क्षर्णाधात बेशुध्द होत.... तात्पुरते त्या भयंकर क्षणांच्या अनुभवातून मुक्त झाले. काही सुसाट पाण्याच्या दिशेने धावणाऱ्या विमानाचा वेग ध्वनीच्या वेगाशी स्पर्धा करू लागला आणि तिथलं गुरूत्वाकर्षण बळ क्षीण झालं. मोकळी माणसं आणि सामान हवेत उडू लागलं आणि त्या गोंधळात अधिकच भर पडली. त्या असाधारण वेगाचा ताण सहन न होऊन विमानाच्या वायू-वीजन नलिका तडातड मोडून पडू लागल्या. पॅनल तुटू लागले.

कप्तान सर्वशक्तिनिशी स्वच्छता खोलीतून तरंगत बाहेर येत महत्प्रयासाने कॉकपीटकडे चालला. प्रत्येक क्षण मोलाचा होता. विमानात काहीतरी भयंकर घडलं होतं, बिघडलं होतं. ते काय होतं ? त्याला तशा त्या भयंकर परिस्थतीत काही उमजणंही शक्य नव्हतं.

''काय झालं ?'' कसंबसं कॉकपीटमध्ये शिरत कप्तान जागेवर बसतांना म्हणाला.

''माझा ईश्वरावर विश्वास आहे.'' उत्तरार्थ हसन पुटपुटला.

कप्तानानं सर्व शक्तिनिशी खाली येणाऱ्या विमानाला सावरण्याकरिता दांडी वेगाने मागे खेचली.

विमान थोडं सावरल्यासारखं वाटलं.

''इंजिन का बंद झाले ?'' कप्तान किंचाळला. ''का ?'' तो चक्रावला. ''बापरे ! इंजिनाचं इंधनच बंद केलंय. तू केलंस हे गधड्या ?''

''माझा ईश्वरावर विश्वास आहे.''

काही कळायच्या आत पुन्हा एकदा विमान भेलकांडलं आणि वेगाने खाली येऊ लागलं. वेगाच्या त्या अतिरिक्त ताकदीने डाव्या इंजिनाचे खुट्टे तटातट तुटले आणि ते विमानापासून अलग होऊ लागले. कप्तानानं उरलेलं दुसरं इंजिन चालू करण्याचा प्रयत्न केला पण त्या साऱ्या घाणाघाती मोडतोडींमध्ये, प्रचंड ओढाताणीमध्ये इंधन इंजिनापर्यंत पोहोचणंच दुरापास्त झालं.

कप्तानाचे सारे प्रयत्न विफल ठरले. विमानाचं नाक पाण्याच्या दिशेने वेगाने चालले होते ते उचलून विमान स्थिर करण्याचे कप्तानाचे सारे प्रयत्न विफल ठरले.

प्रवासी ईश्वराचा धावा करू लागले. आधुनिक तंत्रज्ञानाच्याही खूप वरती कार्यरत अशी ती ईश्वरी शक्तीच आता त्यांना वाचवू शकत होती. बोटावर मोजता येण्याइतपत सदैव आशावादी जीवन जगणाऱ्या त्या मोजक्या मंडळींनी तशाही अत्यंत विपरीत परिस्थितीत जगण्याची आशा सोडली नव्हती परंतु इतर बहुतेक सारे भयानेच पंगू झाले होते. त्यांची असहाय्य तडफड अखंड सुरू होती.

विमान तीरासारखे थंडगार अटलांटिकच्या पाण्यात घुसले आणि मोठा ध्वनी उमटला. तो पाण्यावरील आघातच इतका भयंकर होता की त्या धक्क्यानेच बहुतेकांचे प्राण गेले. त्या साऱ्यांच्या स्वप्नांच्या, आशाआकांक्षाच्या क्षर्णाधात ठिकऱ्या उडाल्या. त्या साऱ्या भयंकर कृत्याचा कर्ता-करविता हसनने , 'माझा ईश्वरावर विश्वास आहे' हे शेवटच्या क्षणी पूर्ण करण्यासाठी मृत्यूने त्याचा लचका तोडला. त्यानंतर ती स्वत:ला भयंकर अशी मृत्यूची शिक्षा सुनावली होती, त्याच्या वरिष्ठाला मृत्यूपूर्वी 'तुझे ही अखेरचे उड्डाण असेल' हे त्याचे शब्द घुमले आणि.....ते सत्य उमजलं.....न उमजतं तोच त्याची प्राणज्योत माळवली, अटलांटिकच्या थंडगार पाण्यात खोलवर विमानाच्या मोडून तोडून पडलेल्या भागांबरोबरच त्यांचे मृतदेह तरंगू लागले. शेवटपर्यंत मोठ्या नेटाने जीवास जीव राखून कसेबसे तग धरण्याचा प्रयत्न करणाऱ्या धडधाकट तरुणांना त्या थंडगार पाण्यात हजारो इंगळ्या एकाएकी शरीरात शिरल्याचा भास झाला आणि काही क्षणातच त्यांचे श्वास थंडावले. प्राणांतिक धडपड, किंकाळ्या, आकांताची गेल्या काही क्षणामध्ये आलेली ती महाकाय त्सुनामी त्यांच्या श्वासांना क्रूरपणे शरीराबाहेर उचकटून काढून फेकून देत थंडावली.

अटलांटिक विमानाच्या साऱ्या भग्न अवशेषांसह त्या साऱ्यांना गिळंकृत करीत शांतपणे पहुडला. तिथं आता त्यांचा मागमूसही मिटल्यासारखं वाटत होतं.

★ ★ ★

रडार पटलावरून एकाएकी गायब झालेल्या त्या अपघातग्रस्त विमानाची माहिती दुसऱ्या दिवशी

सकाळी एका व्यापारी जहाजाने दिली. लागलीच हेलिकॉप्टरर्स घटनास्थळी रवाना करण्यात आली आणि त्यांनी बोईंग ७४७ कोसळल्याची पुष्टी केली. सारेच गमावले! कसं शक्य आहे! शांत आकाशात उंचीवर स्थिर चाललेलं हे विमान कसं कोसळलं ? नक्कीच हा घातपाताचाच प्रकार असला पाहिजे. तशा परिस्थितीत तेच काय ते प्रथमदर्शनी शक्य वाटत होतं. अर्थात तेही सिध्दं करावं लागणार होतं आणि ते काम पोलीस दलाचं होतं. त्यांना लागलीच अपघाताची माहिती देण्यात आली.

कोणी जिवंत मागे उरला असल्याची शक्यता नव्हतीच. अपघात होऊन सहा तास उलटले होते. तशा त्या जवळ जवळ बर्फासारख्या थंड पाण्यात कोणीही जिवंत राहणं दुरापास्त होतं. लागलीच पाणबुड्या मृतशरीरांच्या आणि विमानाच्या सांगाड्याच्या शोधार्थ खोल पाण्यात उतरल्या. मृत शरीरं बाहेर काढीत त्यांची ओळख पटविण्याचं काम सुरू झालं. आप्तेष्ट, नातेवाईकांना भावना आवरता येईनात आणि मग अश्रूंचे पूर वाहू लागले.

विमानाचे तुटलेले भाग लागलीच चाचणीकरिता बाहेत काढणं आवश्यकं होतं. ते का आणि कसं घडलं ह्याचं स्पष्टीकरण त्या निर्जीव तुकड्यांमध्ये तज्ज्ञ शोधणार होते. ते सारे पुरावे लवकरात लवकर हस्तगत करावे लागणार होते. दोन पाणबुड्या अखंड गस्त घालीत राहिल्या आणि सांगाड्यांचा एकेक अवयव बाहेर येऊ लागला.

पोलीस दलाचे विश्लेषक प्रत्येक तुटलेल्या भागाचे बारकाईने निरीक्षण करीत होते. त्यांना कुठं स्फोटाच्या खुणा आढळतात का हे शोधायचे होते. प्रत्येक तुटलेल्या भागांची छायाचित्रं घेऊन गणकयंत्रावर टाकली जाऊ लागली आणि त्यांचं अध्ययन केलं जाऊ लागलं. स्फोट आधी झाला असल्यास काही सुटाभाग विखरून दूरवर पडला असण्याचीही शक्यता होती. शोध सुरू झाला. ते काम मूलतः खूप कठीण होतं. खोलवर समुद्रातून ते सारे तुकडे शोधून काढणं हे महाकुंभात चुकलेल्या इसमाला शोधण्यासारखंच महाकठीण काम होतं. परंतु ते महत्त्वाचे होतं. घटनेचं स्पष्टीकरण त्याशिवाय अशक्य होतं. ते एक आंतरराष्ट्रीय उड्डाण होतं आणि त्याच्या कारणमीमांसेचे पडसाद आंतरराष्ट्रीय राजकारणात पडू शकणार होतं.

तुटलेल्या भागांच्या निरीक्षणावरून तिथं स्फोट घडून आला नसल्याच्या निरीक्षणाप्रत तज्ज्ञ आले. शिवाय कोणत्याही आतंकवादी संघटनेनं त्या अपघाताची जबाबदारी उचलली नव्हती. साऱ्या जगाचं आणि विशेषत: शक्तिशाली देशांच्या सरकारंच लक्ष वेधून घेण्याकरिता आतंकवादी संघटनात तशी भयंकर कृत्यं करून त्याचा डंका वाजविण्याची जणूकाही अहमहमिकाच काम ती लागते. परंतु इथं तीही जबाबदारी कोणीही स्वीकारली नव्हती.

ती आतंकवादी कारवाई नसल्याने पोलीसांनी सूत्रे अपघात विश्लेषकांकडे सोपविली. त्यांचं काम संपलं होतं. अपघात विश्लेषकांकरिता तो एक घातपाती प्रकार नसल्याने गुंतागुंत अधिकच वाढत होती. यंत्रात अचानक बिघाड की आणखी काही ? ती सारी गुंतागुंत

सोडवविण्याकरिता त्यांना कॉकपीट व्हाईस रेकॉर्डर ही कृष्णा पेटिका कॉकपीटमध्ये विमान कोसळण्यापूर्वी नेमकं वैमानिकांमध्ये काय संभाषण झालं हे समजून घेण्याकरिता शोधणं आवश्यक होतं. विमानत अचानक उद्भवलेल्या बिकट परिस्थितीचं आकलन या संभाषणातून होऊ शकणार होतं. सोबतच दुसरी 'फ्लाईट डाटा रेकॉर्डर' ही कृष्ण पेटिका संयंत्राच्या, विमान चलनाचं तत्कालीन स्थितीबद्दल भाष्य करू शकणार होती. विमान दुर्घटनांचं मर्म जाणून घेण्याकरिताच त्या अतिउच्च अपघातही झेलू शकणाऱ्या खास बनविलेल्या कृष्ण पेटिका सुरक्षित ठिकाणी बसविण्यात येतात. आग, पाणी, टक्कर, अपघात ह्या साऱ्या अपघातानंतरच्या प्रलयकारी संकटातून सहीसलामत राहू शकतील अशी त्यांची खास रचना केलेली असते.

तब्बल नऊ दिवस गस्त घातल्यानंतर पाणबुड्यांना त्या कृष्ण पेटिका सापडल्या. कुर्मगतीनं चाललेल्या विश्लेषण कार्याला आता मात्र वेग येऊ शकणार होता. दोन्ही पेटिका प्रयोगशाळेत त्यातील माहितीच्या विश्लेषणाकरिता धाडण्यात आल्या.

सयंत्रात की वैमानिकांची चूक... ? वैमानिकांनी एखादी अक्षम्य चूक करावी किंवा त्यांच्या हतून ती घडावी अशी कोणतीही अंतर्गत अथवा बाह्य परिस्थिती सकृतदर्शनी उद्‌भवल्याचं तज्ज्ञांना जाणवलं नाही. विमान एकाएकी दिशा बदलून सुसाट पाण्याच्या दिशेने का वळलं ?

आणि हे काय ? हा वैमानिक हसन बळेबळे विमानाचा ताबा घेतोय काय आणि हे काय तो वारंवार बडबडतोय: 'माझा ईश्वरावर पूर्ण विश्वास आहे.' प्रयोगशाळेच्या दालनात त्याचा तो स्वर वारंवार घुमत राहिला आणि तज्ज्ञ अधिकच चक्रावले. ते त्याच्या प्रत्येक कृतीची आणि उच्चारलेल्या शब्दांची त्या कृष्णा पेटिकेतील नोंदीद्वारे चिरफाड करण्यात रमले. विमान एखाद्या खेळण्यातील विमानाप्रमाणे खाली उतरले होते आणि ते कोणत्याही संयंत्रातील बिघाडामुळे शक्य नसल्याचं गणकयंत्राद्वारे प्रशिक्षणाच्या कॉकपीटमध्ये निर्माण करण्यात आलेल्या परिस्थितीमुळे तज्ज्ञांच्या लक्षात आलं. दोन्ही इंजिन बंद झालीच किंवा विमानातील संपूर्ण विद्युत प्रवाह खंडित झाला असला तरीही ते शक्य नसल्याचं लक्षात आलं. वैमानिकाने हस्तक्षेप केल्याखेरीज ते तसं काही विमानात घडू शकत नाही हे लक्षात येताच त्यांनी त्यांचा मोर्चा संशयित हसनकडे वळविला.

फलकावर हसनच्या कृती आणि विमानातील बदलणाऱ्या परिस्थितीचा तक्ता मांडण्यात आला. सोबत कप्तानाच्या कृतींचाही तक्ता मांडण्यात आला आणि अंतिमत: हसननेच ते घडवून आणले असावे ह्या निष्कर्षाप्रत तज्ज्ञ आले.

तो निष्कर्ष खूपच धक्कादायक होता. कैक प्रवाशांचा असा मोठा विश्वासघात करण्यासारखी कोणती परिस्थिती हसनवर ओढवली होती ? इतकी वर्षे वैमानिकाच काम करणारा हसन अचानक असं एखादं भयंकर कृत्य का करू धजला असेल ? विश्लेषण हसनवर दोषाचा ठपका ठेवून पूर्ण होणार नव्हते. त्याच्या मागील कारणमीमांसाही लक्षात घ्यावी लागणार होती.

मनुष्याच्या अंतरीचा थांगपत्ता लागत नाही हेच खरं! क्रौर्याची सीमा ते सहजगत्या ओलांडतात. त्यांना हवं तेवढंच ते पाहतात, इतकं सारं जग त्यांच्याकरिता धूसर होतं आणि त्याच्या त्या जहाल कृत्याची शिक्षा मात्र निष्पाप जिवांना भोगावी लागते.

★ ★ ★

विश्लेषकांची बैठक भरली. गेले काही दिवस त्यांनी प्रत्येक छोट्या-छोट्या बाबींचाही बारकाईने अभ्यास करून आपले निष्कर्ष मांडले होते. आता त्या निष्कर्षावर शिक्कामोर्तब केलं जात होतं आणि त्याकरिताच ती निर्णायक बैठक भरली.

''सर्व घटनांचा कृष्ण पेटिकांचा , परिस्थितीचा आणि सहाय्यक माहितीचा विचार करता आम्ही अशा निष्कर्षाप्रत आलो आहोत की - -'' आणि मुख्य विश्लेषक रिचर्डस बेली क्षणभर थांबला आणि त्यानं सर्वांवर नजरेचा एक चाबूक फिरविला.

''- - साहाय्यक वैमानिक हसनने हे सारं घडवून आणलं आहे.''

''आम्हाला हे अमान्य आहे,'' हसन समर्थक गटाचा प्रमुख लागलीच उत्तरला, ''तसा सबळ पुरावा नाही.''

''आम्ही विमानात उद्‌भवलेली परिस्थिती इथं गणकयंत्राच्या साहाय्याने कॉकपीटच्या प्रतिकृतीवर निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु आम्हाला ते शक्य होऊ शकत नाही.'' हसनविरोधी गटानं मुद्दा मांडला.

''दोन्हीही इंजिनं नाकाम झाली असतील.''

''तशाही परिस्थितीत इतक्या मोठ्या कोनातून वळत विमान थेट खाली येऊ शकत नाही.''

''विमानाच्या विद्युत प्रवाहात नक्कीच बिघाड झाला असला पाहिजे.''

''तीही शक्यता तपासून पाहिली.'' हसन विरोधक गट प्रतिनिधी म्हणाला, ''अशा साऱ्या परिस्थितीत विमान तरंगतांना एक विशिष्ट कोनातून हळूहळू खाली येऊ शकेल एकाएकी वेगाने नाही!''

''तो तसा कोणताही प्रयत्न करणं शक्य नाही. सोबत कप्तानही होता. हसन एकटाच नव्हता,'' हसन समर्थक प्रतिनिधी म्हणाला.

''तो काही क्षण कॉकपीटमध्ये एकटाच होता आणि तेव्हा पुन: पुन्हा पुटपुटत होता, माझ्या ईश्वरावर माझा विश्वास आहे आणि मग लागलीच त्या घटनाक्रमांना सुरूवात झाली.''

''अगदी बरोबर!'' एक हसन समर्थक किंचाळला. ''विमानातील तो बिघाड त्याच्या लक्षात येताच तो पुटपुटला असला पाहिजे, माझा ईश्वरावर विश्वास आहे. तशात ह्या संकटकाळात कोणीही सर्वप्रथम ईश्वराचाच धावा करतो. आणि त्यानं तेच केलं.''

''ह्या संदर्भात कप्तानाचं नोंद झालेलं एक विधान फार महत्त्वाचं आहे. बापरे! इंजिनांचं इंधनच बंद झालय? तू केलंस हे गधड्या? हे विधान सरळसरळ हसनकडेच अंगुलीनिर्देश करतंय''

''कधीकधी इंजिन बंद झाली असता वैमानिक असा प्रयत्न करतात. ती इंजिनं आधीच बंद झाली होती आणि ती पुन्हा चालू करण्याचाच शक्य तो

प्रयत्न हसन करीत होता.''

''बोईंग ७४७ च्या इतिहासात अशी दोन्ही इंजिनं एकाएकी बंद झाल्याची घटना घडलेली नाही. रोज शेकडो विमानं आकाशात झेपावतात पण कधीही अशी परिस्थिती इतर कोणत्याही विमानात निर्माण झालेली नाही हे इथं लक्षात घ्यायला हवं.''

''वैमानिकांनी विमान सावरताना केलेल्या चुकांमधूनही विमान तितक्या झटपट खाली येऊ शकत नाही,''हसन विरोधी गटाचा विश्लेषक पुन्हा एकदा सर्वांच्या चेहऱ्याकडे एकवार बारकाईने पाहत म्हणाला, ''केवळ आणि केवळ विमानाला भीषण अपघात घडवून आणण्याच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांद्वारेच ते शक्य आहे, अन्यथा नाही!''

''कसं शक्य आहे ?'' हसन समर्थक किंचाळला. ''गेली इतकी वर्षे तो ते काम करतोय. तो काही नवशिखा तरूण नाही.''

''आत्ताच इतक्या वर्षांनंतर त्याला ही दुर्बुध्दी व्हावी हे मानणं कठीणचं आहे.''

''होय, त्याचाही आम्ही मागोवा घेलताय,'' हसन विरोधक म्हणाला, ''त्याच्यावर स्त्रियांशी असभ्य वर्तन केल्याचा आरोप त्याच्या वरिष्ठानं केलाय.''

''उगाच पराचा कावळा करताय. अहो तो चार पोरांचा बाप आहे. उगाच त्याच्यावर तुम्ही ठपका ठेवताय.''

''नाही. आम्ही तसा सबळ पुरावा गोळा केलेला आहे. तो त्यापूर्वी राहिलेल्या हॉटेलामधून त्याच्याबद्दल तक्रारी केल्या गेल्या आहेत.''

''बरं क्षणभर मानूया की त्याच्याबद्दल अशा तक्रारी झाल्या . ह्याचा अर्थ तो स्वत:च आसनस्थ असलेले विमान असं समुद्रात बुडवू इच्छितो असा तर होत नाही ना ?''

''त्याचा वरिष्ठ ह्या विमानातून प्रवास करीत होता आणि अहवालानुसार त्यानं त्याच्यावर स्त्री वर्तनाबद्दल कडक शेरे मारताना त्यांचा आंतरराष्ट्रीय उड्डाणाला कायमची कात्री लावली होती.''

''आणि तुम्हाला म्हणायचंय की, हे कारण त्याच्या इतक्या टोकाची कृतीकरिता पुरेसं ठरतं ? कम ऑन बी प्रॅक्टिकल!''हसन समर्थक म्हणाला. ''त्याला लहान– लहान मुले आहेत तो एक उत्तम ग्रहस्थी आहे. विमानात आबालवृध्द, स्त्रिया, मुलं असताना असा एखादा संसारी पुरूष विमान निर्दयपणे समुद्रात बुडवितो हे मुळीच शक्य वाटत नाही! आम्ही ते कदापिही मानणार नाही.''

''चारचौघांसारखा सामान्य वाटणाऱ्या माणसांनी प्रसंगी असे गुन्हे घडवून आणलेत आणि ह्याला इतिहास साक्ष आहे. मानवाचं मनं सर्वच परिस्थितीत सारखंच काम करीत राहिलं असतं तर ते केवळ एक यंत्र ठरलं असतं. वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळी माणसं वेगवेगळा विचार करतात आणि ह्या साऱ्या विविधतेतूनच हे विविध कलाशास्त्र गुणांनी नटलेलं आधुनिक जग निर्माण झालं आणि त्याच विविधतेतून जगाचा रक्तरंजित इतिहास, आत्महत्यांचा त्रुटींचा, अपघातांचाही इतिहास लिहिला गेला हे आजच्या घडीचं निखळं सत्य आहे आणि ते आपण स्वीकारायला हवं.''

परंतु शेवटी ती एक आत्महत्या आणि दोनशे सतरा हत्या होत्या का ह्याच्यावर एकमत होऊ शकले नाही...

# थप्पड

गोपाळ गोरवाडकर



''अवो हनुमंतराव, वाईच थांबाकी''

हनुमंता बुचकाळयात पडला कारण चक्क त्याला हनुमंतराव म्हणून कोणीतरी हाक मारली होती. कारण हनम्या, हनू याशिवाय त्याला कोणी हाक मारत नव्हते. परंतु एकदम आदरार्थी प्रमोशन मिळाल्यामुळे त्याला आश्चर्य वाटले. कारण हनुमंत साधा हमाल होता.रोज चौकात उभे राहून खांदयावर पंचा आणि दोरी अशा थाटात कामाची वाट पहायचा. अंगात बंडी,पोटाचा नगारा,डोके भादरलेले, फक्त पुढे नारळाच्या नरोपीसारखे केस. दोन्ही कानांशी गुजगोष्टी करणारे मळकट आडवी टोपी. तोंडात तंबाखूचा बार असा एकूण हनुमंताचा थाट होता.

हनुमंता थांबला. मागे वळून पाहिले. भुसार गल्लीतला दत्ता भराभरा पावले टाकत त्याच्याकडे येत होता. दत्ता जवळ आला. हनुमंताच्या तट्ट फुगलेल्या दंडावर त्याने बुक्की मारली . आणि कौतुकाने म्हणाला ''वा पैलवान, काय बॉडी आहे''. मग एकदम चेहरा वाकडा करून तो म्हणाला ''पण काय उपयोग''

हनुमंताच्या डोक्यात काही शिरत नव्हते या दत्त्याला म्हणायचे तरी काय असा प्रश्न त्याला पडला होता.

अहो हनुमंतराव, गावातले समदे तुम्हांस्नी टरकतात.तुम्ही हात वर करून आवाज चढवला की,समोरच्या माणसाचे धोतर ओले होते.


मग त्याने निषेध म्हणून रस्त्यावर पचकन थुंकी टाकली.आणि म्हणाला, अहो हनुमंतराव दात वेंगाडत हात पसरून थेट लोकांच्या दुकानासमोर उभे राहता. १०,२० रुपये मिळाले की त्यांना सॅल्युट ठोकता. काय म्हणाव तुमच्या जिंदगानीला! दत्त्याने आपली नाराजी व्यक्ती केली.

''अरे दत्त्या, असा आडवाटेने बोलू नको काय सांगायचे ते सपष्ट सांग, ''ठीक आहे, दत्त्याने डोळे गंभीर केले. आणि म्हणाला, अरं, आपल्या देशात लोकशाही आहे. पण खरे तर ती ठोकशाही आहे कारण कोणी दादा उभा राहिला की लोक गुमान मत देतात.बळी

तो कान पिळी असे इलक्शन असतं. तुम्ही उभे रहा, तुम्ही फकस्त हो म्हणा, बाकी म्या बघतो.''

त्याचा तो विचित्र प्रस्ताव ऐकून हनुमंता बुचाकाल्यात पडला. वाटले हा हनुमंता आपली फिरकी तर घेत नाहीना ? परंतु दत्त्या खरंच गंभीर होता.हनमंताच्या पाठीवर थाप मारून तो म्हणाला ''हनमंतराव, डोक नसूदया पण एवढं आडमाप शरीर तर आहे ना. त्याचा काय वापर करा.''

दत्तू बुवा, भलतं काय सांगू नका, मी उभी राहिलो तर समदेच नाव ठेवतील मला. हसतील.



अरे, जे हसतील त्यांचे दात आपण घशात घालू. कोणीपण उभा राहू शकतो. तू छगन शेटच्या विरुध्द अर्ज भर. अरे, ही गाजराची पुंगी आहे.वाजली तर वाजली नाही तर खाऊन टाकली आणि तू जर माघार घेतली तर छगन शेट तुला दोन चार लाख देईल हा ना करता करता शेवटी हनमंत निवडणुकीचे बाशिंग डोक्याला बांधायला तयार झाला.

शुभस्त्रे शीघ्रम या न्यायाने दत्ताने लगेच हनमंताला जवळ जवळ खेचत एका ज्योतिषाकडे नेले. एक जुनाट वाडा होता. तळमजल्यावरील अंधाऱ्या खोलीत ज्योतिषाने आपले दुकान थाटले होते. एकमेकांना धरत दोघे कसेतरी आत शिरले आतमध्ये ज्यातिषाचार्य बंडोजी कुडमुडे अशी पाटी लावली होती. गादी गिरद्यांवर लोडाला टेकून ज्योतिषी बसले होते. त्यावर पंचांग आणि कुंडल्या पडल्या होत्या. मागच्या बाजूला गणपतीची तसबीर होती.दत्ताने त्यांना नमस्कार करून ओळखीचे स्मित केले. ज्यातिषाचार्यांने त्यांना समोर बसायचा इशारा केला. मग दत्ता हनमंताच्या कानात काहीतरी कुजबुजला तसे हनमंताने काही नोटा काढुन त्यांच्या टेबलावर ठेवल्या. ज्योतिषाचार्यांने टेबलाच्या फटीतून नोटा आत सरकावल्या आणि म्हणाले, 'यजमान काय समस्या आहे?' दत्ता हात जोडून नम्रपणे म्हणाला, 'गुरुजी मागच्यावेळी मी रामाभाऊ बेंडकुलेला घेऊन आलो होतो. तुम्ही तोडगा सांगितला आणि तो निवडून आला. आज आमच्या या हनमंतरावाला फस्ट क्लास तोडगा सांगा त्यांना पण निवडणूक लढवायची आहे.' ठीक आहे ज्योतिषी म्हणाले. त्यांनी डोळे झाकून काहीतरी ध्यान केले मग बंडाचार्यांनी आपल्या नजरेचा झाडू हनमंताच्या शरीरावर फिरवला आणि घडयाळाकडे बघून वेळ पाहिली.हनमंताला त्याचे पूर्ण नाव विचारले. प्रश्न

कुंडली मांडली आणि बोटांनी हिशोब करीत कागदावर लिहू लागले.त्यानंतर त्यांनी संगितले, हे बघा, प्रश्न कुंडली षष्टातला राहू वक्रीभावाने आठव्या घरातून राहूकडे बघत आहे. म्हणजे हा विपरीत सिध्दी योग आहे.म्हणजे याचा अर्थ काहीतरी अनिष्ट घटना घडली तर त्यातून यश मिळू शकते.

दत्ता म्हणाला गुरुजी याचा अर्थ काय , याचा अर्थ असा... हनमंतराव माईकवर निवडणूक भाषण करत आहेत. कोणीतरी उपटसुंभ येतो आणी शिवीगाळ करून थप्पड मारून पळ काढतो.

थोबाड रंगून विजय मिळवण्याची आयडिया हनमंताला तेवढीच रुचली नाही. परंतु दत्ताने टाळी देऊन सांगितले, हनमंतराव काम फत्ते. बाहेर पडल्यावर दत्ता आनंदाने म्हणाला, वा,गुरुजींनी काय सोपा सुटसुटीत आणि हमकास तोडगा सांगितला आहे.

पण असे कसे घडू शकले मला थप्पड मारायची हिंमत कोण दाखवणार ?

अरे, मोठमोठे पुढारी सभेमध्ये चप्पल जोडे खातात आणि निवडून येतात. आपल्या शरद पवारांना कशी थप्पड मारली पाहिली ना आणि ते प्रचंड मतांनी निवडून आले. केजरीवालने दिल्लीत थप्पड खाल्ली तो पण निवडून आला. चिदंबरमवर जोडा फेकला तो पण निवडून आला. थोडक्यात, ज्यांनी थप्पड आणि जोडा खाल्ला ते सगळे निवडून आले.

हनमंताने डोके खाजवून डोक्यात असलेल्या थोडयाफार अकलेचा शोध घेतला आणि दत्ताला म्हणाला, ''अर। पण मला थप्पड मारणार कोण ?''

अरे. त्याची काळजी तू करू नको. मी सुपारी देऊन थप्पड मारणारा उभा करतो. एकदा का सॉलिड थप्पड तुझ्या थोबाडात बसली की तुझा विजय पक्का.

दोन चार टोळभैरवांना जमा करून हनमंतरावांचा विजय असो, जितेगा भाई जितेगा, अशा घोषणा देत दत्ता हनमंताला घेऊन ऑफिसमध्ये फॉर्म भरायला निघाला वकीलामार्फत त्यांनी फॉर्म भरला.

ठिकठिकाणी हनमंतरायच्या आडमाप आणि बेसूर चेहऱ्याचे पोस्टर गावातून झळकले त्यावर 'हनमंतरावाची होणार जीत छगन शेट होणार चित' 'जो हमसे टकरायेगा मिट्टी मे मिल जायेगा' असा मजकूर होता. निवडणूक अधिकाऱ्यांनी हनमंताला दत्ताशी सल्लामसलत करून उजवी नाकपुडी हे चिन्ह निवडले. अर्जावर सहीची निशाणी अंगठा करून कार्यालयातून दोघे बाहेर पडले आणि तथाकथित पाठीराख्यांनी घोषणा देत हनमंताला घराजवळ सोडले.

दत्ताने पूर्वीचे पोस्टर बघून नापसंती व्यक्त केली. अरे, असा फोटो नसतो. खादीचा झब्बा, लेंगा, जॅकिट घालून हात जोडून हास्य मुद्राने हातं वर करीत फोटो काढावा लागतो. त्याप्रमाणे दत्ताने खादी भांडाऱ्यातून कपडे घेऊन हनमंताला नवरदेवासारखे सजवून स्टुडिओमध्ये आणले. आणि हात जोडून नम्रपणे कसे उभे राहायचे याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानुसार हनमंताची ट्रायल घेवुन त्याला कॅमेऱ्यासमोर उभे केले. फोटोग्राफरने कॅमेऱ्याभोवती असलेल्या काळया पडद्यामध्ये डोके घालून ''इस्माईल प्लिज''असे सांगितले. हनमंताला काही अर्थबोध झाला नाही. मग

दत्ताने त्याला हसण्याचा सल्ला दिला. मग खिंकाळणाऱ्या घोडयासारखा हनमंता भेसुरपणे हसला आणि त्याचा रौद्र रूपातील फोटो शेवटी बाहेर पडला. पुन्हा या नव्या छबी मधील हस्तपत्रिका दत्ताने ठिकठिकाणी वाटली. एकीकडे हनमंताचा भयानक फोटो आणि बाजूला उजवी नाकपुडी निवडणूक चिन्ह आणि त्याच्यापुढे घोषणा ''लक्षात ठेवा उजवी नाकपुडी उभारा विजयाची गुढी, हनमंतराव करतील चित उजव्या नाकपुडीची होईल जीत'' छापली होती.



दत्ताने गोळा केलेले भाडोत्री प्रचारात गल्ली बोळातून फिरू लागले.आणि उजव्या नाकपुडीवर हात लावीत हात जोडून येणाऱ्या जाणाऱ्याला ताई,भाऊ, आक्का कानपुडीवर मारा शिक्का एक उत्साही प्रचारक एस.टी.स्टॅण्डवर गेला तेथे एका बाकडयावर एक बाई बसली होती तिच्यासमोर उभा राहून उजव्या नाकावर टिचकी मारीत तिचे लक्ष आपल्याकडे वेधण्याचा तो प्रयत्न करीत होता.पण तिचे लक्ष दुसरीकडेच होते.त्याने चिकाटीने टिचकी मारणे चालू ठेवले. शेवटी तिचे लक्ष गेल्यावर डोळे मिचकावीत तो प्रचारक नाकपुडीवर टिचकी मारत त्या बाईला म्हणाला, अहो बाई, लक्षात ठेवा बरं का ,त्याचे डिळे मिचकावणे आणि नाकावर टिचकी मारणे पाहून ती बाई बिथरली. तिला वाटले हा काही तरी अश्लील चाळे करीत आहे. आणि त्याची गचांडी पकडत त्याला शिव्या देत ती ओरडुन म्हणाली, ''भाडया, तुला आई बहिणी नाहीत का? तिचा आरडाओरडा ऐकून स्टॅण्डवरच लोक जमा झाले आणि त्यांनी आपला हात साफ करून घेतला .आणि त्या प्रचारकाला पकडून हवालदारापुढे उभे केले. तो प्रचारक हात जोडून केविलवाण्या स्वरात म्हणाला, या बाईचा गैरसमज झाला आहे. त्यावेळी हवालदार खुर्चीत बसून झोप काढत होते. पण तो गलबला पाहून त्यांची झोप मोडली गेली. त्यामुळे ते वैतागले आणि त्यांनी ताडकन एक थप्पड त्या प्रचारकाला मारली मग त्याने त्या बाईला विचारले, काय प्रकार आहे? तीने तिखट मीठ लावून सगळे सांगितले. जमिनीवर आपला दांडू जोरात आपटीत हवालदार खेकसले. सभ्य बायकांशी असे चाळे करतो. तुला शोभते का? असे म्हणत हवालदाराने त्यांचा दांडू त्याच्या पोटावर टेकवला. तो प्रचारक गयावया करीत म्हणाला, मला दोन मिनिटे बोलू दया मग काय करायचे ते करा. त्याने खिशातून हॅण्डबिल काढले आणि हवालदाराला दाखवले त्यात हनमंतरावचा उजव्या नाकपुडीसहित फोटो होता. साहेब, मी नुसता प्रचार

करत होतो ते हॅण्डबील बघून हवालदार हसायला लागले. त्यांनी त्या बाईला आणि जमलेल्या लोकांना दाखविले आणि सगळे हसू लागले. सगळा समजुतीचा घोटाळा होता. त्याच्या मानेची पकड ढिली करत हवालदार म्हणाले, पुन्हा इकडे फिरकू नकोस आणि प्रचार करताना नाकावर टिचकी मारून प्रात्यक्षिक दाखवू नको. फक्त हॅण्डबिल वाट.

मान हलवीत प्रचारकाने तेथून पळ काढला.

असाच एक प्रकार गावातल्या एका गल्लीमध्ये घडला. तेथे दत्ता जातीने प्रचार करीत होता. एका घरासमोर झाडाच्या सावलीत एक म्हातारी खाटेवर बसली होती .तिच्या समोर दत्ता उभा राहिला आणि म्हणाला, आजीबाई लक्षात ठेवा आणि तो उजव्या नाकपुडीवर टिचक्या मारीत उभा राहिला. त्याची कृती बघून ती म्हातारी गडबडली आणि म्हणाली, मेल्या काय लाज लज्जा आहे की नाही, तुझं वय काय माझे वय काय ? असे म्हणत ती रागाने शिवीगाळ करू लागली पण तिच्या तोंडातून शब्दापेक्षा मुखरसच जास्त बाहेर पडत होता आणि शब्द गुळगुळीत होऊन बाहेर पडत होते.हे प्रकरण आपल्यावर चांगलेच शेकेल असे पाहून दत्ताने तेथून पळ काढला.

त्यानंतर हनमंताची भेट घेतली. ही भेट ऑपरेशन थप्पडच्या संदर्भात होती त्याने खिशातून सुपारी काढली आणी तो म्हणाला, पैलवान, सुपारी तयार आहे थप्पडबाज पण तयार आहेत पण त्याला बिदागी कोण देणार.फुकटात कोण थप्पड मारणार .हनमंताच्या पैलवानी भेजात काही शिरले नाही. प्रश्नार्थक नजरेने त्याने दत्ताकडे पाहिले.

मग दत्ताने त्याला सगळे समजावून सांगितले हे बघ, म्या सभेत थप्पडबाज उभा करणार आणि त्याने थप्पड मारली की , तुझे पाठीराखे त्याला घेरणार आणि तुडवणार म्हणजे दवापाण्याचा खर्च आला. सभेमध्ये हवालदार असणार, बंदोबस्त करताना त्याने थप्पडवाल्याला पकडले तर पोलीस केस होणार. वकील उभा करावा लागणार. म्हणजे त्याची फी आली.


दत्ताचे म्हणणे हनमंताला पटले होते. त्याने मान डोलावली आणि विचारले किती बिदागी ? दत्ता हसुन म्हणाला, जास्त नाय फक्त दहा हजार. हनमंताने लंगोटीतून नोटांची पुडकी काढली आणि दत्ताला म्हणाला, दत्ता भाऊ काम सॉलीड व्हायला पाहिजे.

पैलवान, त्याची चिंता करू नका, मी आहे ना. दत्ता म्हणाला, दत्ताच्या खिशात रोकड पडताच त्याने थप्पडबाजाची मोहीम सुरू केली. एका किराणा मालाच्या दुकानात एक शिकाऊ मुलगा नव्याने गावाहून येऊन लागला होता.त्याच्या जेवणाच्या सुट्टीत लाडे लाडे बोलत त्याची स्तुती करत दत्ताने त्याला हॉटेलमध्ये नेले भजी आणि कडक चहा पाजला. त्याला त्याची कामगिरी समजावून सांगितली. घाबरू नगस, समदं नाटक हाय, तू निसता गालाला हात टेकवायचा आणि काम फत्ते. ५०० रुपयाचा सौदा ठरला. २०० रुपये त्याच्या खिशात कोंबले. ३०० रुपये कामगिरी झाल्यावर द्यावयाचे होते.

शेवटी थप्पड मारण्याची मंगल घटिका आली. सभेचे स्टेज उभारण्यात आले होते. मागे पडदयावर

हनमंतरावाचा वाकून नमस्कार करणार फोटो आणि उजव्या नाकपुडीचे निवडणूक चिन्ह दाखविण्यात आलेले होते.आणि उजव्या नाकपुडीला प्रचंड बहुमताने विजयी करा असे लिहिले होते. हेडमास्तर खवडे गुरुजी मुख्य पाहुणे होते.कोणाची मौत असो किंवा वाढदिवस असो खवडे गुरुजी तिथे कुडमुडणार हे सगळयांना माहीत होते. गुरुजींना आज फारच मोठे व्यासपीठ त्यांच्या विचारांची अभिव्यक्ती करायला मिळाले होते. आज ते सभा जिंकणार होते.त्यांनी माईक हातात घेतला आणि भाषणाला सुरुवात केली.

नगरभूषण आदरणीय हनमंतराव मारकुटे, आमचे मित्र दत्ताराम आणि उपस्थित बंधू भगिनीनो, असे म्हणून त्यांनी डोळे मिटून जोराने ओम ओम असा आवाज पडला आणि मग एकदा श्वास कोंडून उजव्या नाकपुडीने आणि दुसऱ्यांदा डाव्या नाकपुडीने श्वास बाहेर सोडला आणि ते लोकांना म्हणाले, यांना इडा आणि पिंगला म्हणतात. हा प्राणायमाचा प्रकार आहे म्हणजे योग मार्गाची पहिली पायरी आहे. नाक म्हणजे केवळ शिंकरण्याचे साधन



नाही. आपले हनमंत राव भलेही अंगठे बाहादर असतील परंतु त्यामागे त्यांची महान विचारधारा आहे. आजच्या शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार बघून त्यांनी शाळेची पायरी चढणार नाही अशी भीष्मप्रतिज्ञा केली होती.आणि ती आज कायम आहे.(टाळयांचा कडकडाट) परंतु ते जीवन विद्येचे पद्वीधर आहेत (पुन्हा टाळया) असे म्हणून गुरुजींनी डाव्या नाकपुडीवर टिचकी मारली आणि नंतर 'स्वारी' म्हणुन पुन्हा उजव्या नाकपुडीवर टिचकी मारून हनमंतराव बोलायला उभे राहिले आणि दत्ताने बाजूला उभा असलेल्या थप्पडमाराला डोळे मारून ईशारा केला. हनमंतराव बोलू लागले. मंडळी इलेक्शन लढवायची कोणा हाऊस आहे ? मला वाटले, छगण्या निरोप पाठवील बसायचे दोन चार लाख देईल. आणि मग माघार घेऊन कसे काय तेवढ्यात दत्ताने सुपारी देऊन आणलेल्या तो पोरगा थप्पडबाज घाबरत घाबरत स्टेजवर चढला आणि आपला हात हनमंत रावाच्या गालापर्यंत न्यायचा प्रयत्न करू लागला आणि हनमंताचा चेहरा पाहून आणि आडदांड शरीर पाहून गालाला कसाबसा स्पर्श करण्याचा प्रयत्न करू लागला. दत्ताने त्याला मागून धरून वर उचलण्याचा प्रयत्न केला. कसाबसा हनमंतरावच्या गालाला त्याचा स्पर्श झाला आणि त्यानंतर घडले ते सगळे विपरीतच. त्या मुलाने डोळे फिरवले आणि फिट

येऊन तो स्टेजवर कोसळला. सभेत एकच गोंधळ सुरू झाला.

सभा संपल्यावर दत्ता हनमंताजवळ आला आणि त्याला टाळी देत म्हणाला, काम फत्ते झाले! तुम्ही नक्की निवडून येणार.

अरे, याला काय थप्पड म्हणतात काय, दाढी केल्यावर न्हावी हळूच गालावर हात फिरतो तसे झाले आहे.

शेवटी निवडणुकीचा दिवस उगवला. हनमंतरावाने मतदान केंद्राजवळ टेबल खुर्ची मांडली दोन चार भाडयाने तट्टु आणि दत्ता त्याच्या आजूबाजूला होते आणि येणाऱ्या मतदारांना हात जोडत होते.शेवटी मतपेटी फुटली तसा भ्रमाचा भोपळा पण फुटला. हनमंतरावाचे डिपॉझिट जप्त झाले होते. तोडगा फेल झाला होता.

दुसऱ्या दिवशी दत्ताने त्या थप्पडबाज मुलाला गाठले आणि विचारले, काय रे तुला थप्पड मारायला सांगितले की गाल चोलायला ? आणि त्याने त्याच्या गालात सॉलिड थप्पड मारली आणि म्हणाला याला थप्पड म्हणतात महाराजा.

कोणी मेल्यावर दारावर जातात अशा सुतकी चेहऱ्याने दत्ता हनमंताकडे गेला. त्याला सांत्वना देत तो म्हणाला, पैलवान, लय वंगाल झाले. काळजी करू नका. पुढच्या टाइमाला मी चांगला थप्पडबाज आणतो.


असे, असे म्हणत हनमंताने दत्ताच्या गालफडात अमरिश पुरीसारखी जोरात थप्पड मारली आणि म्हणाला, पुढच्या वेळी अशी थप्पड मारणारा घेऊन ये!

दत्ताने गाल चोळीत तेथून काढता पाय घेतला.

◆◆◆


*With Best Compliments from*

**Wood Plaza**



Jangid Heights, Near Cine Wonder, G.B.Road,
Thane (W) Tel : 022-25840061/62
Fax : 25840063 Website : www.woodplaza.in
Email : info@woodplaza.in

*With Best Compliments From*

# Laxmi Herecon Pvt. Ltd.

**Prop. Shrinivas**

# उडून जा पाखरा !

**भाग्यश्री ऐगळीकर**



''जन्मवरी मजसवे पहा ही तव चंचूची खूण!

विसर मला, परि अमर्याद जग राही नित्य जपून !पाखरा!''

अशी ही नि:स्वार्थ भावना फक्त आईचीच असू शकते!

रेव्हरंड टिळकांची ही कविता वाचून माझ्या जिवाची घालमेल झाली म्हणून सहज खिडकीतून बाहेर डोकावले, तर समोरील झाडाच्या फांदीवर, एक चिमणी घरट्याजवळ बसून सारखी 'चिव-चिव, चिव-चिव' करत होती. वास्तविक हे चिवचिवणे नित्याचेच होते पण माझ्या लक्षात येत नव्हते. आज मात्र मला ते जाणवले की, तिच्या घरट्यातील दोन पिल्लांपैकी, एक पिल्लू उडून गेले होते. खरंतर या गोष्टीला खूप दिवस झाले होते. तरी पण ती चिमणी त्या पाखराची सारखी वाट पाहत होती. ते पाखरू येणार नाही याची खात्री होती तिला! कारण ते स्वतंत्र उडू शकेल, इतके चांगले पंख फुटलेले होते. ते उडून गेले ते स्वच्छंदपणाने विहार करण्यासाठीच! पण आईचं मन ते, शांत राहत नव्हते! वेड्या आशेनी ती वाट पाहत होती की पाखरा येशील कां परतून? तिच्या चिवचिवाटातून तिच्या या भावना कळायला लागल्या. काही वेळा ती ओरडूनओरडून आकांतही करायची की पाखरू अजून आलं नाही, अजून आलं नाही. जणू ते कुठं तरी हरवलं आहे. पण काही वेळा, केविलवाणी चिवचिवायची की, पाखरा येशील ना रे घरट्यात सुखरूप!

खिडकीशेजारीच टेबल-खुर्ची असल्याने, चिमणाचा चिवचिवाट सुरू झाला की, तिच्या ओरडण्याकडे माझे लक्ष वेधले जायचे. आणि लक्ष केंद्रित झाले की, तिच्या भावना कळायच्या, हे नित्याचेच झाल्याने हळूहळू मला या भावनेतून भाषा उमगू लागली.

त्या चिमणीचे दुसरे पिल्लू, तिच्या जवळ घरट्यातच होते. वास्तविक ते स्वतंत्रपणे विहार करण्याइतके सक्षम होते. पण त्याचे पंख अखूड असल्याने ते लांब, उंच स्वच्छंदी झेप घेऊ शकत नव्हते, म्हणून ते घरट्यात परत यायचे. चिमणीच्या आसऱ्याची, उबेची त्याला गरज होती. एक तरी पाखरू जवळ आहे यात चिमणी समाधानी होती. ती त्याच्यासाठी

खूप करायची पण दुसऱ्या पाखराची आठवण झाली की, ती बेचैन व्हायची. पण तिची भावना कोण लक्षात घेतो! काही वेळा ती शांतपणे घरट्याजवळ फांदीवर बसून रहायची आणि इतर पक्ष्यांना न्याहाळायची. तिचं शांत बसणं लक्षात यायचं, ती इतर पाखरांत, आपलं पाखरू पहायची आणि दुधाची तहान ताकावर भागवायची!

रोज ठरलेल्या वेळी चिमणीच्या चिवचिवाटाची मला सवय झाली होती. एखाद्या दिवशी आवाज आला नाही तर, प्रश्न पडायचा की चिमणी कुठे गेली? असेच एके दिवशी तिचा आवाज येईना म्हणून मी सहज खिडकीतून पाहिले तर आवाज न करता नेहमीप्रमाणेच चिमणी घरट्याजवळ फांदीवर बसलेली होती. तिच्याजवळ एक अनोळखी पाखरूही बसलेलं होतं. ते पाखरू स्वतंत्र, स्वच्छंदी आणि सक्षम दिसत होतं. ते रस्ता चुकलं असेल का? पण नाही. ते रस्ता चुकण्याइतके लहान नव्हते. मग काय झालं असेल बरं? उत्तर जाणून घ्यायची मला उगाचच उत्सुकता लागली म्हणून समजून घेण्याचा प्रयत्न केला. 'जो न देखे रवि, वो देखे कवि,' या उक्तीप्रमाणे ती चिमणी आणि ते पाखरू जणू बोलताहेत असा मला उगाचच भास झाला आणि एकएक धागा उकलत, सारं समजू लागलं.



ते पाखरू खूप दूरवरून आलं होतं. हिरवंगार, दाट झाड पाहून त्याने विश्रांती घ्यायची ठरविले. फांदीवर बसून सहज आजूबाजूची घरटी न्याहाळली. बघताबघता एकांतात एक चिमणी दिसली म्हणून परिचय करून घेण्याच्या उद्देशाने ते जवळ येऊन बसले. आपण कुठून आलो? कसे आलो? असा परिचय करून देतदेत भावनेच्या आहारी जाऊन त्याने सारा आयुष्यघटच उलगडून दाखवला. त्यामुळेच त्या पाखराचा मनमोकळेपणा, लोभस स्वभाव, चिमणीला फार आवडला. त्या पाखराच्या खूप गोष्टी, घरट्यातील दूर उडून गेलेल्या पाखराशी मिळत्या-जुळत्या असल्याने चिमणीलाही खूप आनंद झाला. अन् ती त्याच्यात एकरूप होऊन गेली.

ते पाखरू सांगू लागलं की, ''एक दिवस खूप मोठं वादळ झालं अन् घरटं जोर जोरात हलू लागलं. घरट्यात आम्ही तीन पिले होतो. वादळाला घाबरून जीव वाचविण्यासाठी आम्ही तिघांनीही बाहेर झेप घेतली, अन् रस्ता दिसेल तिकडे धावत सुटलो. मी एकटाच इकडे आलो. कोण कुठे धावले, याचे भानच राहिले नाही. कुठे गेले असतील बरे ती दोघे? मागे वळूनही पाहिले नाही की, ती दोघे सोबत आहेत की नाहीत? ती दोघे मला शोधत तर नसतील ना? काय करू? कुठे शोधू मी त्यांना?''

चिमणीला त्याची तळमळ जणू समजली असावी. एकदाचं 'चिव-चिव' केले.अन् मला वाटले की चिमणी त्याला समजावते आहे, ''तू नको शोधू त्यांना, तीही तुझ्याइतकेच सक्षम आहेत, विहार करायला!

मग नको शोधू. तू आता स्वत:चं बघ. त्यांना शोधण्यात आयुष्यातला वेळ वाया घालवू नकोस.''ती असं ही समजावत होती की या जीवनात वेड्या नाही कुणी कुणाचे! जो तो आपलं आपलचं बघतो!

त्या पाखराला बहुतेक चिमणीची समजूत पटली असावी म्हणूनच ते तिथून दूर गेले नाही आणि कदाचित जाऊ इच्छितही नसेल! त्यालाही ऊबदार आसरा हवा होता आणि चिमणीलाही आपलं पाखरू गेल्याची खंत होती. कदाचित या रूपातच ते आले नसेल कशावरून? या जाणिवेने ती ही खुशीत होती. दोघांच्याही अशा समंजसपणामुळे अखेर पाखरू निवाऱ्याला घरट्यात आले. घरटं पुन्हा पूर्वीसारखे भरलेलं पाहून चिमणीला आनंद झाला.



चिमणीला वाटलं, आपल्या घरट्यात असणाऱ्या पाखराला एक सवंगडी मिळाला. दोघेही गुण्यागोविदांने नांदतील! असेच दिवस मजेत जात होते. पाखराला ऊबदार, प्रेमळ आसरा मिळाल्याने, घरट्यात ते लगेच सामावून गेले. त्याचाही लळा लागला. दाणापाणी टिपून घरट्यात आल्यावर कुणीतरी आपल्याशी दोन शब्द प्रेमाने बोलून, चौकशी करावी, असं त्याला वाटायचं! चिमणीनं हे ओळखलं, ती रोज विचारायची – ''पाखरा आलास? दमला असशील ना? शांत झोप. परत सकाळी दाणापाणी शोधायला जायचं आहे.''अशा दोन शब्दांनी त्याचा दिवसभराचा शिणवटा जायचा आणि खरंच शांत झोपी जायचं ते! सारं कसं छान चाललं होतं!

चिमणी विश्वासात घेऊन त्याला दिलासा द्यायची. रोज त्याला चांगले वाईट सत्य-कटू अनुभवाचे, बाळकडू द्यायची की जेणेकरून त्याला स्वतंत्रपणे निर्णय घेऊन दुनियेत वावरता येईल.

चिमणीचे विचार पटण्यासारखे तर होतेच पण तिची समजावून सांगण्याची पध्दतही त्याला खूप आवडायची, हळूहळू हे सारं त्याच्या अंगवळणी पडले



तरीही त्याला अनुभव सांगत असताना किंवा आपले विचार मांडताना, ती चारी बाजूंनी विचार करायची पण तरीही तिला वाटायचे की, ''त्याला आपले कळवळीचे सांगणे, आवडत तरी असेल ना? आपले विचार त्याच्यावर लादतो आहोत, असं तरी त्याला वाटत नसेल ना? आपल्या गोष्टीची त्याला जाणीव तरी असेल की नाही कोण जाणे! ते घरट्यात वेळेवर आलं नाही, काळजीपोटी तिला वाटायचं, जग चांगलं नाही, कोणी वाईट सवंगडी तरी भेटले नसतील ना? इथं ते नवीन आहे म्हणून कोणी त्याला फसवणार नाही ना? घरट्याचा रस्ता तरी चुकला नसेल? काय झालं असेल बरं?'' काळजीन ती वाट पहायची.

चिमणीचं वागणं शिस्तबध्द होतं जरूर, पण संकुचित नव्हतं! नि:स्वार्थ भावना होती. तरी पण

तिला वाटायचं की ''त्या पाखराला असं तरी वाटत नसेल ना, की आपण त्याला बंधनात ठेवतो आहोत!''

''नाही रे पाखरा! असा विचार ही मनात आणू नकोस! अरे, मला आदर वाटतो तो तुझ्या स्वातंत्र्याचा, तुझ्या स्वच्छंदीपणाचा, तुझ्या धाडसाचा, तुझ्या हुशारीचा, तुझ्या विचारांचा! तुझ्या मुक्तपणाला धक्का नाही लावायचाय मला! तुला बंधनात ठेवण्याचा विचार तर कधी मनात आणलाच नाही ते! मला प्रेमापोटी वाटते ती काळजी! तू नवीन आहेस, दुनिया खूप मोठी आहे. इतकी मोठी की, ज्याच्या विस्ताराला मर्यादाच नाही. दुनिया चाणाक्ष तर आहेच पण आडमुठीही आहे. तुझं स्वातंत्र, तुझ्या स्वच्छंदीपणा, त्यांना भावेल की नाही कोण जाणे! या अमर्याद जगात सुखदु:खाचे, लोभमोहाचे, क्रुरतेचेनिष्ठुरतेचे, लबाडी-खोटेपणाचे, भोंदुगिरी-फसवेगिरीचे, जे अनुभव जग देऊ शकतं ना, त्यालाही मर्यादा नाही. तुझ्या विषयी मायाममता, आपुलकी, नि:स्वार्थी प्रेमाची भावना असणारे साथी तुला भेटतील असं नाही! तू स्वतंत्र आहेस, स्वच्छंदी आहेस, दूरवर उडण्याइतका सक्षमही आहेस. तू इथे राहणार नाहीस, थांबणार तर नाहीच नाही हे मी पहिल्या दिवशीच स्वीकारलंय रे! मग सांगू तुला बंधनात कसं ठेवेन? पाखरा, तू जेव्हा इथून जाशील ना, तेव्हा इथले सर्व तू विसरून जा. मी तुला अडवणार नाही पण या अफाट जगात जपून रहा हं! खूप धोके आहेत रे या जगात! सांभाळून रहा इतकंच!''

असेच हळूहळू दिवस जात होते. पाखरूही खूप रुळलं होतं. त्याचं येणं-जाणं त्याचं किलबिलणं, आपल्याभोवती त्याचं असणं-नाचणं, त्याच्यासाठी ठेवलेला दाणा-पाणी सहज घेणं हे सगळं कसं लळा लावणारं होतं! घरट्यातून बाहेर जाताना चिव-चिव करून जाणं आणि घरट्यात आल्यावरसुध्दा आज या झाडावर गेलो, त्या झाडावर गेलो, हेसुध्दा न कंटाळता सागणं. तिथंही सवंगडी भेटले. त्यांचेही चांगले-वाईट गुणगान करून झोपी जायचं हे नित्याचं होतं.

असे काही दिवस जातात न जातात तोच त्याच्या सुखाला दृष्ट लागली. झाडावरील इतर पक्षी त्याला चोची मारण्याचा प्रयत्न करू लागले. त्यातच घरट्यातील पिल्लू ही सामील झालं होतं आणि दूरवरून आलेल्या पाखराची नाराजी दिवसेंन् दिवस वाढू लागली. कुणाला काय समजावयाचं, अशी तिची कुचंबणा होऊ लागली, अखेर घरट्यातील पाखरालाच विश्वासात घेऊन, त्याला समज दिली की, ''पाखरा, जरा समजून घे, इतक्या दूरवरून उडून आलंय म्हणजे त्याचे पंख बळकट आहेत. ते स्वतंत्र आहे. त्याला कोणी रोखणार नाही, टोकणार नाही, तसंच ते स्वच्छंदी पण आहे. तू आणि तुझे सवंगडी एका डबक्यात उड्या मारता आहात. तुम्हाला जगाची काय कल्पना? ते पाखरू समुद्रात पोहणारं आहे. दुनिया त्याने पाहिली आहे. तुमच्यापेक्षा लहान असून ते तुमच्यापेक्षा सरस आहे म्हणून तुम्ही त्याचा द्वेष करता? त्यापेक्षा त्याचा आदर्श ठेवा समोर! हे एकटं पाखरू, तुमच्यापेक्षा सरस आहे याचं तुम्हाला कौतुक वाटायला हव होतं! थोडासा विचार करून बघा की, आपणच त्याजागी असतो तर काय केलं असतं? त्याचा समजूतदारपणा, शांतपणा, त्याचा धाडसीपणा, त्याची हुशारी एकटं असून ही त्याचा नीटनेटकेपणा त्याचा आदर्श ठेवून तुम्हीही तसं बनायला



शिका! हे आपलं झाड सोडून दुसऱ्या झाडावर जाऊन बघा, तुम्हाला कोणी विचारतंय कां! निराधार म्हणजे काय हे डबक्यात उड्या मारणाऱ्याला काय कळणार ? जरा डबक्याच्या बाहेर येऊन बघा दुनिया किती मोठी आहे ती! जरा विचार करा आणि समोरील पाखराला समजून घेण्याचा प्रयत्न करा.''

आणि......... चिमणीच्या बोलण्याचा, काही तरी परिणाम झाल्याचा दिसून आला. सर्वच पाखरांनी त्याला मिसळून घेतलं. नाराज पाखराला आनंदित बघून चिमणीनं सुस्कार सोडला.

चिमणीला रोज वाटायचं की, ''या सुखी जीवनाला एक दिवस, त्याच्या जाण्याचा दु:खद धक्का बरणार आहे. स्वच्छंदीच पाखरू ते! कधी जाईल त्याचा नेम नाही. पण आजचा दिवस तरी आनंदित आहे! उद्याचे उद्या बघू.''

असे म्हणता-म्हणता तो उद्याचा दिवस उजाडला अन् बसायचा तो धक्का बसलाच! पाखरूच ते शेवटी भक्कम पंख असलेलं, एक स्वतंत्र-स्वच्छंदी जीव होता तो! केव्हा तरी उडून जाणारच! कारण एका जागी स्थिरावणारं नव्हतंच ते! चंचल होतं, गेलं निघून! परत येईल की नाही कोण जाणे!

पिल्लास पंख फुटता घर शून्य पाखराचे! पाखरू उडून गेलं!

त्या पाखराला चिमणीनं आसरा दिला. नि:स्वार्थी प्रेम दिलं, माया-ममता दिली, त्याला आपलं मानलं. तिला एकच समाधान होतं की, ते आता जगाच्या पाठीवर कुठेही राहू शकण्याइतके समर्थ झाले आहे. याचा चिमणीला आत्मविश्वास होता म्हणून निष्काळजीपणाने चिमणीने त्याला निरोप दिला , जा उडून जा पाखरा!

सालस, गोंडस, नाजूक आणि प्रेमळ असणारं पाखरू एक दिवस भुर्रकन उडून गेलं! चिमणी हताश झाली होती पण कदाचित नियतीला हेच मंजूर असेल! असे समजून चिमणी शांत बसली.

◆◆◆


**With Best Compliments from**


***Shree Sainath Properties***

**Prop. Mukesh Bhanushali**



Mob : 9820961383 / 9867622585
Email:mukesh6561@rediffmail.com
mukesh6361@hotmail.com
Website:www.shreesainathproperties.com

With Best Compliments From



# Suhas V. Bhave



# घर असावे सुंदर

घर असावे सुंदर, नीट नेटके छान,
येणाऱ्या जाणाऱ्यांना येथे सदा मिळो मान.
अन्नपूर्णा असावी गृहिणी चेहरा हसतमुख,
प्रेमळ स्वभावाने तिच्या सर्वांना मिळो सुख
बाल गोपाळ बागडती जेव्हा वाटे नंदनवन,
कुजबुजीनेही फरक ना पडो तृप्त राहो मन
सर्वांसाठी उघडे दार घराचे, सदा सगळे वेलकम,
सुख असो भरभरून नो थारा फॉर गम
असे असावे घर जेथे मिळो मन-शांती,
चार भिंती जरी स्वर्ग अवतरे धरतीवरी
हसऱ्या हया घराला देवही आशीष देतो
होईल सगळेच शुभ वास्तू तथास्तु म्हणतो.

**सेबिया आशेर नौगाँवकर**




# गोकुळ

फुले फुलदाणीतील, मुले घरकुलातील
बनविती ते उभय, घरकुल मनोहर
जन्मा येता तान्हं बाळ, पालटे घराचा नूर
जमणारे कधी नच, घरात होती एकत्र
त्यांच्या दुपट्याचा वास, वाटे साऱ्यांचा सुवास
त्यांचं क्षणांत हसणं, कधी क्षणात रडणं
घरातले सानथोर,त्याच्या भोवती जमत
छोट्या छोट्या गोष्टींसाठी,करिती त्यांचे कौतुक
असो पहिलं वळणं, असो पहिलं रांगणं
पहिलं उभं राहणं, पहिला बोबडा बोल
त्यांच चालणं-पडणं, नि दुडदुड धावणं
खाणंपिणं-उष्टावण नि जावळ वाढदिवस
शाळेत पहिलं जाणं नि रडारड करणं
भावंडाशी भांडण, कट्टीबट्टी-पुन्हा खेळ
बने असे घरकुल, मुलांमुळे ते गोकुळ

**डॉ.सुधीर मोंडकर**

# माझ्या माहेरचे घर

माझ्या माहेरचे बैठे घर
त्याला खिडक्या-दार भरपूर
पुढे-मागे जागा आहे फार
त्या जागेचा सारे करतात वापर ।।१।।



माझ्या माहेरचे घर
त्यात आहे मोठे माजघर
देवपूजेसाठी आहे देवघर
पाहुणे बसतात ओटीवर।।२।।

माझ्या माहेरचे घर
तिथे तुळशीवृदांवन आहे सुंदर
मागे आहे परसदार
परसदाराच्या पुढे आहे आवार।।३।।

माझ्या माहेरचे घर
तिथे नसते किरकिर
सारे आहेत खेळकर
कामे करतात भराभर।।४।।

माझ्या माहेरचे घर
आजी-आजोबांचे हक्काचे घर
आई-बाबांच्या मायेचे घर
आमच्यासाठी आपुलकीचे घर।।५।।

माझ्या माहेरचे घर
फ्लॅट-बंगल्याला नाही त्याची सर
जिथे जातो आम्ही वारंवार
सुख-दु:खाचा सारे सोसतात भार।।६।।

**सौ.सुनीता देहेरकर**

# एकेकाचे घर

गुहेतील वाघाची अंधारी गुहा
आत जाऊन पाहण्याची हिंमत आहे का ?
गरीब बिचाऱ्या गाईचा भला मोठा गोठा
अंगण सारवायला शेणाचा नाही तोटा ।।१।।

घोडयासाठी आहे छानसा तबेला
दीड पायावर उभा, घोडा तिथे अलबेला
चिमणी आणि कावळयाला घरटेच लागते
पण मेणाच्या घरात फक्त चिऊताई राहते ।।२।।

छोटयाशा उंदराला लपायला लागते बीळ
साप शिरला बिळात की बसते त्याची दातखीळ
पोपटाचा पिंजरा दिसायला किती छान
रानातल्या घरटयाची मात्र त्याला नाही शान।।३।।

साऱ्या पक्ष्यांना हवे असते राहण्यासाठी घरटे
त्यांना त्रास देते मात्र माणसाचे कारटे
प्रत्येकाच्या घराची आहे वेगवेगळी तऱ्हा
पशू आणि पक्ष्यांनो आपल्या घरी सुखी रहा ।।४।।

**सुरेश गोविंद देहेरकर**



# अशी ही स्त्री

अनेक नात्यांमधून स्त्रिया कुटुंबसेवा करिती
पत्नी, माता,भगिनी होऊनि प्रेमामृत वाटिती
मुलांवरी संस्कार करुनि उज्ज्वल भविष्य देती
स्वार्थत्याग करुनि सर्वा समाधानी ठेविती।।१।।

संसाराचा आधार होऊनि सर्वांना सावरती
प्रेमाच्या धाग्याने सर्वां बांधुनि त्या ठेविती
पुढे पतीची ज्योत होऊनि त्यांस मार्ग दाविती
होडी वल्हवून कुटुंबास त्या पैलतीरा पोहोचविती।।२।।

अनेक दु:खे पचवुनि ती चेहरा हसरा ठेवि
दुसऱ्याच्या दु:खात आपुले दु:ख विसरुनि जाई
सहन करुनि सारे अपुल्या अश्रुंना थोपवी
गिळूनि सारी दु:खे, राही खंबीर ती संसारी।।३।।

आपुली दु:खे चिंता साऱ्या देवाला ती सांगे
नवस बोलते सर्वांसाठी, स्वत:काही ना मागे
नवरा अपत्य भाऊबंध ती आपुले मानुन वागे
दु:खी पाहुनि कुटुंबास ती, रात्र रात्र जागे ।।४।।

**किरण भा. फाटक**

# चाळीचे दुःख

साठ वर्षे ज्या घरात राहिलो
ते घर माझ्याशी बोलू लागले
कुणाकडे दु:ख सांगता येत नसल्यामुळे
स्वत:शीच रडू लागले।।१।।

रात्रीच्या शांत वेळी
कानात आवाज घुमू लागला
घराचा प्रत्येक कोपरा
शांतपणे बोलू लागला।।२।।

साठ वर्षांपूर्वी भाऊंनी घरासाठी जमीन घेतली
छोटीशी चाळ बांधून वीस जणांची सोय केली
सगळे विश्वासातले अन् नात्यातले
गुण्यागोविंदाने कंठू लागले जीवन चाळीतले।।३।।

दोन वर्षांपूर्वी चाळीला आली ऑफर
जमीनदोस्त करून बांधून देऊ टॉवर
सर्व भाडेकरूंना देणार नवीन सुसज्ज जागा
मात्र कुणीही करू नये त्यासाठी त्रागा।।४।।

काहीना नको होती ही नवीन योजना
पण करू शकत नव्हते स्वत:च्या सूचना
त्यांना फायद्याच्या गोष्टी सांगितल्या नाना
अन् करून घेतले राजी क्षणात सर्वांना।।५।।

लवकरच चाळ कोसळू लागली
अंगावर घण सोसू लागली
म्हणता म्हणता चाळ जमीनदोस्त झाली
जुन्या बिऱ्हाडकरूंची सावलीच हरवली।।६।।

दोन वर्षांत नवी इमारत उभी राहिली
जुन्या लोकांना पहिल्या एवढीच जागा मिळाली
पण सर्वांच्या घरांचे दरवाजे बंद झाले
अन् आपापसातील पूर्वीचे प्रेम अंत पावले।।७।।

श्रीमंतासाठीच बांधला होता उंच टॉवर
गरीबांना एक खोली ,हेच त्यांचे आगर
ही दरी अशीच राहणार वर्षानुवर्षे
जोपर्यंत समाजात आहेत शोषणकर्ते।।८।।

**अरूण राजाराम दळवी**



# पोटमाळा

साठ वर्षांच्या दोन इमारती
समोरासमोर उभ्या ठाकती
अनेक बिऱ्हाडे ,अनेक जाती
वर्षानुवर्षे एकत्र राहती।।१ ।।

एका बिल्डिंगला भेटला बिल्डर
कानात म्हणाला, मी तुला लवकर
पुन्हा उभी करतो भरभर
ऐकून आली तिलाच चक्कर ।।२।।

कशी बशी ती तयार झाली
म्हणता म्हणता पडू लागली
अंगावरती घण सोसू लागली
अन् महिन्यातच जमीनदोस्त झाली।।३।।

दोन वर्षांत नटून उभी राहिली
पूर्वीपेक्षा छान दिसू लागली
जुन्या इमारतीस हिणवू लागली
श्रीमंतीला अंगावर खेळवू लागली ।।४।।

निरीक्षण न करणाऱ्याचा कुणी नाही वाली
जुनी इमारत नवीनला म्हणाली
माझ्याकडे आहे ते तुझ्याकडे नाही
नवीन म्हणाली, असे होणारच नाही ।।५।।


तुझ्याकडे आहे कुठे पोटमाळा
प्रत्येक घरात आहे तो एक मोठा गाळा
जुना कचरा घरातला सगळा
ठेवायचा मालकांना लागलाय चाळा ।।६।।

तुझा पोटमाळा म्हणजे एक लॉफ्ट
नव्हेच तो पोटमाळा ही एक फॅक्ट
बिल्डरची आहे त्यामध्ये टॅक्ट
अन् पैसा कमवायची हीच आहे नॅक ।।७।।

पोटमाळा म्हणजे जुन्या वस्तूंची जागा
कधीच नाही केला त्याने त्रागा
जपल्या आहेत त्याने प्रत्येकाच्या भावना
मालकाला देतो समाधान पुन्हा पुन्हा ।।८।।

तुझा लॉफ्ट फक्त पाण्याच्या टाकीसाठी
भावनांचा लोप झाला नव्या बिल्डिंगसाठी
जुने भाडेकरू निघून गेले पोटासाठी
नवी इमारत उभी आहे फक्त डौलासाठी ।।९।।

**अरुण राजाराम दळवी**



# आई

जन्म देऊनि अपत्यास ती नवा जन्म घेते
उमेद हदयी नवी ठेवूनि त्यांना ती पोसिते
उत्साहाने सारे करते, निराशा ना होते
अंधाराला दूर सारुनि, नवी पहाट होते ।।

ब्रम्ह बनुनि जन्म देतेस, विष्णू बनुनि पाळी
महेश बनुनि वाईट वृत्ती, प्रेमाने ती जाळी
दत्तस्वरुप असते माता, सदा सर्वकाळी
अशा आईची पायधूळ नेहमी लावा भाळी ।।

साऱ्या जगात आईसारखे दुसरे दैवत नसते
जन्म देऊनि अपत्यास ती आपुले आयुष्य देते
संस्कारांची दिव्य शिदोरी देतच ती राहते
वात्सलतेच्या पदराखाली शीतलता ती देते।।



आले जरी वृध्दत्व तरीही माया करित राहते
सर्वांना एकत्र बांधुनि कुटुंबास टिकविते
सुरकुतली काया जरी, ती मनात खंबीर असते
घडवुन आपले आयुष्य आई, दूर कधि ना जाते।।

**किरण भा. फाटक**

# सोनेरी खिडक्यांचे घर

अंगणामध्ये मी सहजची जाता
समोर पाहिले तर
दूरवरी मज दिसले एक
सोनेरी खिडक्यांचे घर ।।१।।

माझे घर ते साधे वाटे
त्या घरास पाहिल्यावर
पाहताक्षणी ते मनात भरले
जणू राजमहाल सुंदर ।।२।।

एकवार ते पाहून यावे
जवळ जाऊनी तर
मनामध्ये ते भरले माझ्या
सोनेरी खिडक्यांचे घर ।।३।।

एकवार गेले मी ते पाहण्या
एका सखीबरोबर
परी मला ना दिसले तेथे
माझ्या स्वप्नातले ते घर ।।४।।

तेथे होती धूळ जळमटे
वाळली पाने ती वाटेवर
हिरमुसली मी झाले,
ते घर सत्यात पाहिल्यावर ।।५।।

इतक्यात जाहली सांज
सोनेरी मज दिसले पुन्हा
सोनेरी खिडक्यांचे घर ।।६।।

दाखविले मी मैत्रिणीस ते,
हरखूनी गेले पाहूनी पुन्हा ते घर
पण मैत्रीण मज ती म्हणते
नीट पहा ते तुझेच आहे घर ।।७।।

**विनीता वासुदेव आगाशे**



# कधीच नसते

गमावलेल्या संधीची हुरहुर असते तोवर
हातातल्या संधीचे मोल कधीच नसते।
पण प्रत्येक क्षणाला महत्त्व असते तोवर
निराशेच्या अंधाराचं साम्राज्य कधीच नसते।

आयुष्यात सुखाचा वर्षाव होत असतो तोवर
जीवनाच्या वजाबाकीची खंत कधीच नसते।
पण दु:खाच्या सावलीचे सावट असते तोवर
नशिबाच्या बेरजांची आशा कधीच नसते।

मनात स्वप्न पाहण्याची आस असते तोवर
झोपेतून जागे होण्याची इच्छा कधीच नसते।
पण वास्तवाची खरीखुरी जाणीव असते तोवर
स्वर्गसुखाच्या फलाची अपेक्षा कधीच नसते।


विश्वासाच्या अतूट नात्याची ओढ असते तोवर
अविश्वासाने तडा जाण्याचे भय कधीच नसते।
पण शून्यातून उभे राहण्याची इच्छा असते तोवर
गरुडझेप घेणारे मन मात्र दुबळे कधीच नसते।

**विजया शिंदे**

# पाककृती

## वऱ्याचे लाडू

**साहित्य :** १वाटी शिजवलेली वरी, १वाटी ओल्या नारळाचा किस, १वाटी दाण्याचा कूट व १वाटी साखर, वेलची पावडर व १वाटी पिठीसाखर




**कृती :** १वाटी शिजवलेली वरी, १वाटी ओल्या नारळाचा किस, १वाटी दाण्याचा कूट व १वाटी साखर एकत्र करून मंद गॅसवर ठेवा. नंतर गोळा झाल्यावर खाली वेलची पावडर व १वाटी पिठीसाखर घाला व लाडू वळा हे लाडू खूप छान लागतात.

**विजया गोरे**

## पपईच्या पुऱ्या व वड्या

**साहित्य:** १)पपई २)साखर ३)कणिक ४)तेल ५)नारळ ६) बटाटे



**कृती**- पपईचा गर काढून तो मिक्सरमधुन बारीक करून घ्या .त्याचे दोन भाग करावे. पुऱ्या–पपईच्या एका भागात साखर व मोहन घालून त्यात कणिक चांगली मळून घ्यावी व त्याच्या पुऱ्या तळाव्यात, बिन पाकातल्या छान केशरी पुऱ्या तयार वडया–पपईच्या दुसऱ्या भागात एक नारळ खवून घालावा, दोन उकडलेले बटाटे कुस्करून घालावे. दीडपट साखर घालून सुंदर वड्या करता येतात.

**वसुधा गोसावी**

# रव्याचे आप्पे

**साहित्य**- पाऊण वाटी जाड रवा, पाऊण ते एक वाटी आंबट ताक, चवीपुरते मीठ, अर्धा टीस्पून जिरे ठेचलेले, तीन हिरव्या मिरच्या बारीक चिरून, ६-७ कढीपत्त्याची पाने बारीक चिरून, पाव कप कांदा बारीक चिरून, अर्धा टीस्पून आले पेस्ट,दोन चिमटी खायचा सोडा, पाव वाटी तेल

**कृती**- रवा आणि ताक तासभर भिजवून ठेवावे. नंतर त्यात जिरे, मिरच्या, कढीपत्ता, आलेपेस्ट, कांदा चवीपुरते मीठ घालून मिक्स करावे. आप्पेपात्र गॅसवर गरम करत ठेवावे. मिश्रणात चिमूटभर सोडा घालावा आणि मिक्स करावे.

आप्पेपात्रातील प्रत्येक अर्धगोलात तेल लावून त्यात भिजवलेले पीठ घालावे.

वरून झाकण ठेवून गॅसवर ४ ते ५ मिनिटे एक बाजू खरपूस भाजून घ्यावी.

काटयाने पलटून दुसरी बाजू थोडे तेल घालून खरपूस करून घ्यावी.

नारळाच्या चटणीबरोबर गरमच सर्व्ह करावे.आप्पे थंड चांगले लागत नाहीत.

**ओमनी फीचर्स**



# सोपे स्नॅक्स

**साहित्य**- सारण ३-४ उकडलेले बटाटे, १ बारीक चिरलेला कांदा, चिरलेली कोथिंबीर, मीठ, आमचूर, लाल तिखट आणि आवरणसाठी पापड.

**कृती**- उकडलेल्या बटाट्याच्या फोडी करून त्यात सारणाचं सर्व साहित्य घालून मिक्स करावं. एका पापडाचे दोन तुकडे करून ते ओल्या फडक्यात गुंडाळून ठेवावे. यामुळे ते मऊ पडतील. बटाट्याची भाजी त्या मऊ पापडात भरून त्यात त्रिकोण बनवावा. त्रिकोणाचे काठ चिटकवण्यासाठी काठाला मैद्याची पेस्ट लावावी, तेल तापवून हे भरलेले त्रिकोण मध्यम आचेवर तळून घ्यावेत.

**ओमनी फीचर्स**

# पायनॅपल रायत

साहित्य :- दीड कप अननसाच्या फोडी, दोन-तीन चेरीचे तुकडे, दोन कप दही, तीन टीस्पून साखर.

कृती :- पातेल्यात अननसाच्या फोडींना १ टीस्पून साखर लावून ५ मिनिटे झाकण ठेवून शिजवून घ्यावे.

बाऊलमध्ये दही घोटून घ्यावे. त्यात २ टीस्पून साखर आणि चेरीचे तुकडे घाला. साखर विरघळेपर्यंत ढवळावे.

शिजवलेल्या अननसाच्या फोडी थंड झाल्यावर दह्यात एकत्र कराव्यात. गरम फोडी घातल्या तर दही आंबट आणि पातळ होण्याची शक्यता असते.

अननसाची कोशिंबीर फ्रीजमध्ये ठेवून थंडगार खायला द्यावी.



# दही भेंडी

साहित्य :- शंभर ग्रॅम भेंडी, (अंदाजे २०-२५ भेंडी), एक कप दहा। पाव टीस्पून चाट मसाला, पाऊण टीस्पून साखर, पाव टीस्पून मीठ, एक दोन हिरव्या मिरच्या, पाव टीस्पून मोहरी, पाव टीस्पून हिंग, पाच-सहा कढीपत्ता पाने, फोडणीसाठी १ टेबलस्पून तेल, भेंडी तळण्यासाठी तेल.



कृती :- भेंडी धुऊन कापडाने कोरडी करून घ्यावीत. मग त्याचे मध्यम लांबीचे तुकडे करा. कढईत तेल गरम करावे आणि भेडी गोल्डन ब्राऊन रंगावर तळून घ्यावी. बाऊलमध्ये दही घोटून घ्यावे. त्यात मीठ, साखर चाट मसाला घालून मीट ढवळून घ्यावा. फोडणीच्या कढईत तेल गरम करावे. तेल कडकडीत तापले की मोहरी घालावी. मोहरी तडतडली की हिरवी मिरची कढीपत्ता आणि हिंग घालून दह्याला फोडणी द्यावी. खायला द्यायच्या वेळेस तळलेली भेंडी दह्यात घालून एकत्र करावे. आणि खायला द्यावे.

# शिंगाडयाच्या पिठाचे डोसे

**साहित्य:** २वाट्या शिंगाडा पीठ, १ चमचा तिखट, १चमचा मीठ , १/२ वाटी दाण्याचे कूट, १चमचा तूप.



**कृती-** २ वाट्या शिंगाडा पीठ, १चमचा तिखट, १चमचा मीठ, १/२ वाटी दाण्याचे कुट, जरा पातळसर भिजवा व तव्यावर १चमचा तुप पसरून पळीने ते पीठ पसरवा. त्यावर ताट झाकण ठेवा व नंतर दुसऱ्या बाजूने तूप लावून शेका. नारळाच्या किंवा दाण्याच्या चटणीशी खावे.

**विजया गोरे**